# मंत्रालयीन विभागांमधील महत्वाच्या विविध शासकीय योजनांची माहिती पुस्तिका

( कक्ष अधिकारी विभागीय परीक्षा(सुधारणा) नियम, २०१५ मधील प्रश्नपत्रिका क्रमांक ६ (भाग-२) )

---

**सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**

# प्रस्तावना

महाराष्ट्र राज्याच्या मंत्रालयीन दुय्यम सेवेमधील कक्ष अधिकारी पदावर पदोन्नती देण्यासाठी विभागीय परीक्षा नियम १९७७ विहित करण्यात आले आहेत. तसेच नामनिर्देशनाव्दारे नियुक्त कक्ष अधिका-यांसाठी मंत्रालययीन विभागातील कक्ष अधिकारी (विभागीय परीक्षा आणि प्रशिक्षण) नियम, १९९१ विहित करण्यात आले आहेत. सदरहू दोन्ही विभागीय परीक्षा नियमातील पाठयक्रमात (अभ्यासक्रमात) अनुक्रमे दिनांक ३१ जानेवारी, २०१५ आणि ७ फेब्रुवारी, २०१५ च्या अधिसूचनेव्दारे सुधारणा करण्यात आली आहे.

मंत्रालयीन विभागांमार्फत विविध प्रकारच्या महत्वाच्या शासकीय योजना राबविल्या जातात. त्या योजनांची माहिती मंत्रालयात नियुक्त होणा-या अधिकारी/कर्मचा-यांना होण्याच्या उद्देशाने सुधारित अभ्यासक्रमानुसार विहित केलेल्या प्रश्नपत्रिका क्र. ६ मधील भाग - २ मध्ये "विद्यमान महत्वाच्या अशा विविध शासकीय योजना(१० ते १५)" हा विषय समाविष्ट करण्यात आला आहे.

प्रस्तुत विभागीय परीक्षेच्या अनुषंगाने मंत्रालयीन विभागांकडून प्राप्त झालेल्या योजनांची माहिती एकत्रित करून परीक्षार्थ्यांना अभ्यास करणे सुलभ व्हावे केवळ या उद्देशाने शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यासोबतच अर्थसंकल्पीय अंदाज नियतवाटप व्यवस्थापन पध्दती (बीईएएमएस), राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, राज्य मानवी हक्क आयोग इत्यादी विषयांबाबतची माहिती संकलित करण्यात आली आहे.

वर नमूद विषयांच्या अद्ययावत तपशिलासाठी कृपया संबंधित अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके इत्यादींचे अवलोकन करावे.

**डॉ. भगवान सहाय,**
अपर मुख्य सचिव (सेवा),
सामान्य प्रशासन विभाग.

दिनांक:- १४ सप्टेंबर, २०१५.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विभागाचे नाव | योजनांचा पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | ग्राम विकास व जलसंधारण विभाग | १ - ३ |
| २. | आदिवासी विकास विभाग | ४ - ९ |
| ३. | कृषि व पदुम विभाग | १० - १७ |
| ४. | मराठी भाषा विभाग | १८ - २१ |
| ५. | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | २२ - २६ |
| ६. | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | २७ - २८ |
| ७. | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | २९ - ३२ |
| ८. | कौशल्य विकास व उद्योजकता विभाग | ३३ - ३७ |
| ९. | जलसंपदा विभाग | ३८ - ४४ |
| १०. | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | ४५ - ५० |
| ११. | गृहनिर्माण विभाग | ५१ - ५४ |
| १२. | सार्वजनिक आरोग्य विभाग | ५५ - ६३ |
| १३. | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | ६४ - ६७ |
| १४. | महसूल व वन विभाग | ६८ - ७२ |
| १५. | विधी व न्याय विभाग | ७३ - ७५ |
| १६. | सार्वजनिक बांधकाम विभाग | ७६ - ७८ |
| १७. | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | ७९ - ८३ |
| १८. | नगर विकास विभाग | ८४ - ८९ |
| १९. | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | ९० - ९३ |
| २० | महिला व बालविकास विभाग | ९४ - ९८ |
| २१ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ९९ - १०२ |
| २२ | सामान्य प्रशासन विभाग (महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५) | १०३ - १०५ |
| २३ | नियोजन विभाग | १०६ - १२१ |
| २४ | अर्थसंकल्पीय अंदाज नियतवाटप व्यवस्थापन पध्दती (बीईएएमएस) | १२२ |
| २५ | राष्ट्रीय मानवी हक्क आयोग / राज्य मानवी हक्क आयोग | १२३ - १२६ |
| २६ | शासकीय विधेयक व नियम यांचे मसुदा लेखन.<br>अशासकीय विधेयकांबाबतची कार्यपध्दती.<br>अधिनियम व नियम यांमध्ये सुधारणा करण्याबाबतची कार्यपध्दती. | १२७ - १३० |

# जलयुक्त शिवार अभियान

शासन निर्णय:- जलअ२०१४/प्र.क्र.२०३/जल-७, दिनांक ५ डिसेंबर, २०१४.

महाराष्ट्र राज्यातील पावसाची अनियमितता व पावसातील खंड यांचा पिकांच्या वाढीच्या काळात होणारा दुष्परीणाम व त्यामुळे सतत टंचाई सदृश परिस्थिती निर्माण होऊन त्याचा मोठा परिणाम कृषि क्षेत्रावर होत आहे. राज्यात मागील चार दशकात कोरडवाहू क्षेत्रातील पिकांच्या उत्पादनामध्ये मोठया प्रमाणावर चढ-उतार दिसुन येत आहे. या परिस्थितीस मुख्यत्वेकरुन पाण्याची कमी उपलब्धता कारणीभूत आहे. राज्यात जवळ जवळ ८२ टक्के क्षेत्र कोरडवाहू व ५२ टक्के क्षेत्र अवर्षण प्रवण आहे. सन २०१४-१५ मध्ये १८८ तालुक्यांमध्ये (२२३४ गावे) भूजल पातळीत २ मीटरपेक्षा जास्त घट झालेली आहे. तर २२ जिल्हयांतील १९०५९ गावांमध्ये टंचाई परिस्थिती जाहीर झाली आहे.

शाश्वत शेतीसाठी पाणी व पिण्याच्या पाण्याची उपलब्धता करुन देण्यासाठी जलसंधारणांतर्गत उपाययोजना करण्याच्या उद्देशाने जलयुक्त शिवार योजनेची संकल्पना पुढे आली. "सर्वांसाठी पाणी-टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९" हे उद्दीष्ट डोळयासमोर ठेवुन टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी एकात्मिक पध्दतीने नियोजनबध्दरित्या कृती आराखडा तयार करुन पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी "जलयुक्त शिवार अभियान" राबविण्यात येत आहे.

**योजनेचा उद्देश**:-

पावसाचे जास्तीत जास्त पाणी गावाचे शिवारातच अडविणे, भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे, राज्याच्या सिंचन क्षेत्रात वाढ करणे, शेती साठी संरक्षित पाणी व पाण्याच्या वापराच्या कार्यक्षेमतेत वाढ करणे, राज्यातील सर्वांना पुरेशा पाण्याची शाश्वता, ग्रामीण भागात बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजनांचे पुनर्जिवीकरण करुन पाणी पुरवठयात वाढ करणे, भूजल अधिनियम अंमलबजावणी, विकेंद्रीत पाणी साठे निर्माण करणे, पाणी साठवण क्षमता निर्माण करणे, अस्तित्वात असलेले व निकामी झालेल्या जलस्त्रोतांची पाणी साठवण क्षमता पुन:स्थापित करणे/वाढविणे, त्यातील गाळ लोक सहभागातून काढून जलस्त्रोतांचा पाणीसाठा वाढविणे, वृक्ष लागवडीस प्रोत्साहन देऊन जनजागृती करणे, पाणी अडविणे- जिरविणे बाबत लोकांना प्रोत्साहित करणे.

निधीची उपलब्धता :-

राज्यात जलयुक्त शिवार अभियान राबविणेसाठी विविध योजनांतर्गत उपलब्ध असलेल्या निधीचा वापर करण्याची तरतुद करण्यात आली आहे.

..........

# इंदिरा आवास योजना

शासन निर्णय:- इंआयो २०१०/प्र.क्र.१२८/योजना-१०, दिनांक २ जुलै, २०१०.

इंदिरा आवास योजना १९८९ पासून डिसेंबर, १९९५ अखेरपर्यंत जवाहर रोजगार योजनेची उपयोजना म्हणून राबविली जात होती. त्यानंतर दि.१.१.१९९६ पासून ही योजना स्वतंत्रपणे केंद्र पुरस्कृत योजना म्हणून राबविण्यात येत आहे. या योजनेच्या निधीच्या उपलब्धतेची पध्दत ७५:२५ प्रमाणे आहे. ( ७५% केंद्र शासन आणि २५% राज्य शासन )

या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील बेघर कुटूंबांसाठी घरकुल बांधणीसाठी अनुदान देण्यात येते. सदर योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी व्यक्तिचे नांव ग्रामसभेने मंजूर केलेल्या बेघर कुटूंबांच्या प्रतिक्षा यादीत असणे आवश्यक आहे. तसेच सदर योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार उपलब्ध निधीच्या ४० टक्के निधी बिगर अनुसूचित जाती/जमातीसाठी राखून ठेवण्यात येतो. अनुसूचित जाती/जमातीसाठी ६० टक्के निधी आरक्षित ठेवला जातो. अपंगांसाठी ३ टक्के आरक्षण ठेवण्यात येते. हे आरक्षण समस्तर असे असते. सन २००७-०८ पासून अल्पसंख्यांकांसाठी १५ टक्के आरक्षण ठेवण्यात येत आहे. दरवर्षी घरकुलांचे उद्दिष्ट केंद्र शासनाव्दारे निश्चित करण्यात येते. तसेच जिल्हा निहाय घरकुलांचे वाटप केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाकडून जिल्हयांना परस्पर करण्यात येते. त्यामध्ये राज्याला बदल करता येत नाही. केंद्र शासनाने निश्चित केलेल्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने इंदिरा आवास योजनेतील घरकुलांबाबतची कार्यवाही प्रकल्प संचालक, संबंधित जिल्हा यंत्रणा यांचेमार्फत पूर्ण करण्यात येते.

.............

# पर्यावरण संतुलीत समृध्द ग्राम योजना

शासन निर्णय:- व्हिपीएम २६१०/प्र.क्र.१/पंरा-४, दिनांक १८ ऑगष्ट, २०१०.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने राज्यातील गावांचा शाश्वत विकास (Sustainable village Development) घडवून आणण्याकरिता ग्रामोत्थान अभियान सुरु करण्यात आले आहे. भौतिक (Physical) सामाजिक (Social) व उत्पन्न साधने (Livelihood) या तीन क्षेत्रात शासनाच्या आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय सहकार्याने, लोकांच्या पुढाकाराने विकास अपेक्षित होणार आहे. भौतिक मुलभूत सुविधासाठीचा हा कार्यक्रम आहे. शाश्वत ग्रामविकास संकल्पनेत महत्वाचे तत्व असे आहे की, गावात एकीकडे उच्च प्रतिच्या भौतिक सुविधांची निर्मिती करतानाच यासाठी लागणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्तीचा विनियोग पर्यावरणाचा समतोल राखून कसा करता येईल याचाही प्राथम्याने विचार झाला पाहिजे.

दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत असून नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास होत आहे. त्यामुळे Global Warming सारखे अनेक विषय मूळ धरु पाहत आहेत. पर्यावरणाचे संवर्धन, जतन व संरक्षण करून समृध्द व संपन्न गावांची निर्मिती करणे ही काळाची गरज आहे. म्हणून शासनाने पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना सन २०१०-११ मध्ये सुरु केली. पर्यावरणीय संतुलन राखून गावांचा शाश्वत विकास करणे हा या योजनेचा मूळ उद्देश आहे. या योजनेची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत:-

१) पर्यावरण समतोल राखण्यासाठी उपलब्ध नैसर्गिक संसाधनांचा विकास करणे व त्यासाठी लोकसहभाग मिळविणे.

२) पर्यावरणाचे भान ठेऊन भौतिक सुविधा उपलब्ध करणे व इको व्हिलेजची संकल्पना राबवून समृध्द ग्राम निर्माण करणे.

३) यासाठी राज्य शासनाच्या विविध विभागांच्या ग्रामस्तरीय विविध योजनांची सांगड घालून योजनांचा समन्वय करणे व जेथे ही संकल्पना राबविण्यासाठी नव्या योजनांची , कार्यक्रमांची गरज आहे, ती पोकळी भरण्यासाठी तसे कार्यक्रम/ योजना ग्राम विकास विभागामार्फत कार्यान्वित करणे.

४) मोठया ग्रामपंचायतींना विकास केंद्र म्हणून विकसित करणे.

.............

# केंद्रिय अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना

शासन निर्णय क्र.न्युबयो-२०११/प्र.क्र.८७/का.७, दि.२१/०६/२०१३.

ही योजना शासनातर्फे सन १९८१-८२ पासून प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प आणि अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या नियंत्राणाखाली राबविण्यात येत आहे.

**योजनेचा उद्देश:-** ज्या योजना आदिवासी विकास किंवा कल्याणाच्या दृष्टीने स्थलकालानुरुप आवश्यक आहेत आणि त्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात नाही, अशा अभिनव स्वरुपाच्या स्थानिक महत्वाच्या योजना तांत्रिक औपचारिकतेमुळे दीर्घ कालावधीकरीता अडकून न पडता स्थानिक पातळीवर तातडीने आणि प्रभावितपणे कार्यान्वित करुन त्यांचा लाभ गरजू आदिवासींना प्रत्यक्ष मिळवून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

न्युक्लिअस बजेट योजनांचे खाली दर्शविल्याप्रमाणे ३ प्रमुख गट पाडण्यात आलेले आहेत:-

गट अ - उत्पन्न निर्मितीच्या किंवा उत्पन्न वाढीच्या योजना
गट ब - प्रशिक्षणाच्या योजना / कौशल्य विकास कार्यक्रम
गट क - मानव साधन संपत्ती विकासाच्या व आदिवासी कल्याणात्मक योजना.

न्युक्लिअस बजेट योजने अंतर्गत गट निहाय आर्थिक मर्यादा पुढीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | योजनेचा गट | आर्थिक वर्षात प्राप्त तरतुदीच्या |
|---|---|---|
| १ | अ | ५० टक्के |
| २ | ब | २५ टक्के |
| ३ | क | २५ टक्के |

न्युक्लिअस बजेट योजने अंतर्गत प्रत्येक आदिवासी व्यक्तिस / कुटुंबास लाभाची आर्थिक मर्यादा रु.५०,०००/- आहे. या योजनेंतर्गत २ किंवा ३ किंवा त्यापेक्षा अधिक आदिवासी लाभार्थी एकत्र आले तर सामुहिक प्रकल्प / कार्यक्रम सुध्दा मंजूर करता येतात. परंतु अशा प्रकल्पात एकूण कमाल मर्यादा रु.७,५०,०००/- राहील.

न्युक्लिअस बजेट योजनेंतर्गत कार्यक्रम मंजुरीचे वित्तीय अधिकार खालीलप्रमाणे असतील:-

| अ. क्र. | लाभार्थी / योजना | प्रति प्रकल्प प्रति योजना कमाल मर्यादा (रुपये) | मंजुरी देणारे सक्षम अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक किंवा सामुहिक लाभाच्या योजना. (प्रत्येक गटासाठी एकुण मंजुर तरतुदीच्या कमाल २५ टक्के रकमे येवढया परंतू कमाल रु ५.०० लक्ष प्रतिगट योजनांना प्रकल्प अधिकारी मान्यता देतील आणि त्यापेक्षा जास्त रक्कमेच्या योजनांना प्रकल्प अधिकारी यांनी मंजुरी देवू नये.) | ५,००,०००/- | प्रकल्प अधिकारी, यांचे अध्यक्षते खालील निर्देश समिती |
| २ | वैयक्तिक किंवा सामुहिक लाभाच्या योजना. | २०,००,०००/- | अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या अध्यक्षते खालील निर्देशन समिती |
| ३ | रु.२०,००,०००/- पेक्षा जास्त रकमेच्या वैयक्तिक किंवा सामुहिक योजना | ४०,००,०००/- | आयुक्त, आदिवासी विकास |
| ४ | रु.४०,००,०००/- पेक्षा जास्त खर्चाच्या वैयक्तिक किंवा सामुहिक योजना | --- | सचिव, आदिवासी विकास विभाग. |

न्युक्लिअस बजेट योजनेंतर्गत योजना राबविण्यासाठी प्रत्येक प्रकल्पास स्वतंत्र निर्देश समितीची निर्मिती करण्यात आली आहे. सदर समितीचे प्रकल्पस्तर व अपर आयुक्तस्तर असे दोन स्तर आहेत. प्रकल्प अधिकारी हे प्रकल्प स्तरीय निर्देश समितीचे तर अपर आयुक्त हे अपर आयुक्त स्तरीय निर्देश समितीचे अध्यक्ष आहेत.

.................

# खावटी कर्ज योजना

शासन निर्णय क्र.:- खाकवा-२००४/प्र.क्र.९६/भाग-२/का.८, दि. २०/७/२००४ अन्वये शासनाने खावटी कर्ज योजना राबविण्याकरिता सुधारित धोरण लागू केलेले आहे.

आदिवासी भागात सावकार व व्यापाऱ्यांकडून होणारी आदिवासी लोकांची पिळवणूक थांबविण्यासाठी महाराष्ट्र आदिवासी आर्थिक स्थिती (सुधारणे) अधिनियम, १९७६ अन्वये सावकारी प्रथा बंद करण्यात आली. तसेच पावसाळ्यात जून ते सप्टेंबर या कालावधीत आदिवासींची उपासमार होऊ नये म्हणून सन १९७८ पासून खावटी कर्ज योजना सुरु करण्यात आली आहे. सदर योजना महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांच्यामार्फत राबविली जाते. यासाठी शासनाकडून आदिवासी विकास महामंडळास निधी उपलब्ध करुन दिला जातो.

आदिवासी भागातील ५ संवेदनशील व उर्वरित १० जिल्ह्यांसह आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील जिल्ह्यातही खावटी कर्ज वाटप करण्यात येते.

**योजनेच्या ठळक बाबी :-**

१) खावटी कर्ज हे ३०% अनुदान व ७०% कर्ज स्वरुपात आहे.

२) खावटी कर्जाचे वाटप ५०% रोख व ५०% वस्तुरुपात करण्यात येते.

३) खावटी कर्ज वाटपाचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे:-

अ) कुटुंबातील व्यक्तींची संख्या १ ते ४ असल्यास अशा कुटुंबास रु. २,०००/-

ब) कुटुंबातील व्यक्तींची संख्या ४ ते ८ असल्यास अशा कुटुंबास रु. ३,०००/-

क) कुटुंबातील व्यक्तींची संख्या ८ पेक्षा अधिक असल्यास अशा कुटुंबास रु. ४,०००/-

रोख स्वरुपातील रक्कम लाभार्थी कुटुंबातील महिलेच्या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये बचत खाते उघडून त्यात R.T.G.S. द्वारे भरण्यात येते. ज्या ठिकाणी १० कि.मी.पर्यंत कोणतीही राष्ट्रीयीकृत बँक नाही तेथे सहकारी बँकेत खाते उघडून खावटी कर्जाची रक्कम चेकने देण्यात येते. लाभार्थी कुटुंबात महिला सदस्य नसेल तरच पुरुष सदस्याचे नावाने बचत खाते उघडावे अशीही तरतूद सदर शासन निर्णयात करण्यात आलेली आहे.

खावटी कर्जाच्या ७०% रक्कमेची परतफेड केल्यानंतर सदर लाभार्थी पुन्हा खावटी कर्ज मिळण्यास पात्र ठरतो. आदिवासी लाभार्थी हा अतिदुर्बल घटक असून त्यांची आर्थिक परिस्थिती इतकी हलाखीची असते की, ते कर्जाची परतफेड करु शकत नाहीत. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील दुष्काळसदृश परिस्थिती, पाणी टंचाई यामुळे शेतीमधील कमी उत्पादन तसेच आदिवासी समाज हा कामाच्या शोधात भटकंती करीत असल्यामुळे कर्जाची वसुली होणे दुरापास्त आहे. आदिवासी महामंडळाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांमार्फत कर्जाच्या वसुलीसाठी पाठपुरावा करुनही कर्जाच्या वसुलीचे प्रमाण नगण्य आहे.

....................

# ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम

शासन निर्णय क्र.:- टिएसपी-२००४/प्रक्र २३/का. १४, दि. ०३.०६.२००४
शासन निर्णय क्र.:- आवसु-२००६/प्रक्र १४/ का. १४, दि. ०२.०२.२००६

**योजनेचा उद्देश** :- सामाजिक न्याय विभागातर्फे राबविण्यात येणा-या दलित वस्ती कार्यक्रमाच्या धर्तीवर शासनाने "ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम" या योजनेला मंजूरी दिली असून ही योजना सन २००४-०५ पासून राबविण्यात यावी, असे ठरविले आहे. या कार्यक्रमांतर्गत आदिवासी गावांना / वस्त्यांना सामुहिक विकासाच्या सुविधा तसेच वैयक्तिक / कौटुंबिक तथा सामुहिक लाभाच्या योजना राबवावयाच्या आहेत.

**योजनेची माहिती** :- आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रमात प्रामुख्याने आदिवासींना विविध प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देणे, ग्राम स्वच्छता अभियान राबविणे इत्यादी बाबींचा समावेश आहे. परंतु ग्रामीण विद्युतीकरण, मार्गदीप बसविणे, पिण्याच्या शुध्द पाण्याची सोय करणे, आरोग्य विषयक जनजागृती, जोडरस्ते, अंतर्गत रस्ते, ग्राम सफाई, शिक्षणविषयक सोयी, समाज मंदिरे, घरकुल बांधणे इत्यादी सुविधा शासनाच्या विविध प्रशासकीय विभागामार्फत राबविण्यात येत आहेत. आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रमाद्वारे जी कामे घ्यावयाची आहेत, ती कामे वेगवेगळया अंमलबजावणी अधिका-यांमार्फत राबविल्यास कामे विशिष्ट कालमर्यादेत पूर्ण होणार नाहीत. परिणामी, या योजनेचा मूळ उद्देश सफल होणार नाही. ही बाब लक्षात घेऊन तसेच या योजनेसंबंधी एकछत्री कार्यप्रणाली असावी म्हणून हा कार्यक्रम आदिवासी विकास विभागामार्फत राबविल्या जाणा-या "मागासवर्गीयांचे कल्याण" या उपविकास शिर्षाखाली अंतर्भूत करुन त्याची अंमलबजावणी, संनियंत्रण याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रकल्प अधिका-यांची राहील. प्रकल्प अधिकाऱ्यांनी संबंधित विभागाच्या स्थानिक अधिका-याच्या मदतीने संबंधित कामाची अंमलबजावणी करावी. विहित व प्रचलित कार्यपध्दतीनुसार प्रशासकीय व तांत्रिक बाबी संबंधी योग्य त्या पातळीवर निर्णय घेण्यात यावा. या योजनेच्या पर्यवेक्षणाची जबाबदारी संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचेवर राहील, तर या योजनेवर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे थेट नियंत्रण राहील.

..............

## नव संजीवन योजना

शासन निर्णय क्र.: -टिएसपी१०९५/प्र.क्र.६/कार्यासन-६, दि. २२ जून, १९९५.

आदिवासी लोकांसाठी असलेल्या पाणी पुरवठा, आरोग्य सुविधा इत्यादी सारख्या निरनिरळया योजनांची एकात्मिकपणे व समन्वयाने अंमलबजावणी करणे आणि त्यांना बळकटी देणे हे नव संजीवन योजनेचे उद्दिष्ट आहे. या योजनेचा योग्यरितीने समन्वय सुनिश्चित न करताच पूर्वी विविध स्तरावर निरनिराळया अभिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यात येत असे.

सध्या नवसंजीवन योजनेमध्ये खालील योजनांचा समावेश करण्यात आलेला असून त्याची एकाच अधिपत्याखाली अंमलबजावणी करण्यात येत आहे:-

१. रोजगार कार्यक्रम -
   अ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

२. आरोग्य सेवा -
   अ) प्राथमिक आरोग्यविषयक सुविधांची तरतूद करणे
   ब) शुध्द व स्वच्छ पिण्याचे पाणी पुरविणे

३. पोषण कार्यक्रम -
   अ) एकात्मिकृत बालविकास योजना
   ब) शालेय पोषण कार्यक्रम

४. अन्नधान्याचा पुरवठा -
   अ) रास्त भावाच्या दुकानामार्फत अन्नधान्याचे वितरण
   ब) सुधारित सार्वजनिक वितरण पध्दती
   क) द्वार वितरण पध्दती

५. खावटी कर्ज योजना -

६. धान्य बँक योजना -

नवसंजीवन योजनेची आदिवासी उपयोजना क्षेत्र, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र, मिनीमाडा क्षेत्रखंड आणि राज्यातील क्षेत्रखंड यामध्ये अंमलबजावणी करण्यात येत आहे.

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे नवसंजीवन योजनेचे मुख्य अंमलबजावणी अधिकारी म्हणून देखील कार्य करतात आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी व एकात्मिकृत आदिवासी विकास प्रकल्पाचे (आयटीडीपी) प्रकल्प अधिकारी या योजनेत सक्रीय सहयोग व सहभाग असतो. वैयक्तिकपणे या योजनांची अंमलबजावणी करणारे अधिकारी हे नवसंजीवन योजनेच्या यशस्वी व प्रभावी अंमलबजावणीस जबाबदार असतात.

या योजनेत समावेश करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांचा जिल्हाधिकारी दरमहा आढावा घेत असतात. त्यांनी आपल्या जिल्हयातील जोखमीची /संवेदनक्षम क्षेत्र / क्षेत्रखंड / गांवे निश्चित करायाची असतात. जिल्हाधिकाऱ्यांनी अशाप्रकारचे क्षेत्र / क्षेत्रखंड / गांवे ठरविताना पुढील मानके विचारात घ्यावयाची आहेत:-

(अ) अलिकडेच दुर्गम म्हणून घोषित करण्यात आलेली गांवे

(ब) गतकाळात ज्या गांवामध्ये क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणावर कुपोषण झाले आहे ती गांवे

(क) पावसाळयात दळणवळणाचा संपर्क तुटणारी गांवे

(ड) ज्या गांवामध्ये शुध्द आणि स्वच्छ पाण्याचा पुरवठा होत नाही अशी गांवे

(ई) प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रापासून खूप लांबवर असलेली गांवे

(फ) ज्या गांवांमध्ये रास्त भाव दुकाने नाहीत अशी गांवे किंवा अशा रास्त भावाच्या दुकानाच्या ठिकाणापासून लांब असलेली गांवे

(ग) पावसाळयात ज्या गांवामध्ये रोजगार मिळणे अवघड काम असते अशी गांवे

(ह) एकात्मिक बालविकास योजनेअंतर्गत ज्या गांवामध्ये अंगणवाडया नाहीत अशी गांवे

आरोग्य सेवा -

प्रादेशिक संस्थेच्या दृष्टीने आदिवासी क्षेत्र साधारणपणे दुर्गम भागात मोडते. त्यामुळे असे क्षेत्र वेळच्या वेळी आणि पुरेशा आरोग्य सुविधा मिळण्यापासून वंचित राहून जाते, असे दिसून येते. विशेषत: पावसाळयाच्या मौसमांत जेव्हा दळणवळणाच्या सेवांमध्ये खंड पडतो, त्यावेळी अति दुर्गम भागात आरोग्य सुविधा पुरविता येत नाही. या बाबींवर मात करण्यासाठी अशा दुर्गम भागात सन १९९६-९७ पासून पावसाळयाच्या कालावधीत आरोग्य सुविधा पुरविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. तसेच सन २००३-०४ या वर्षापासून मेळघाट पॅटर्न अंतर्गतच्या सर्व आरोग्यविषयक /पोषणविषयक योजना आदिवासी क्षेत्रातील सर्व जिल्हयात राबविण्याबाबतचा शासनाने निर्णय घेतला आहे. संवेदनशील आदिवासी भागात विशेष आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात.

.............

# राष्ट्रीय कृषि विकास योजना (RKVY)

शासन निर्णय क्र.:- समिती २००७/प्र.क्र.१/राकृवियो कक्ष, दि. २० सप्टेंबर, २००७.

**योजनेचे उद्दिष्टय :-** राष्ट्रीय विकास परिषदेने ( National Development Council ) दिनांक २९ मे, २००७ च्या बैठकीमध्ये एक विशेष अतिरिक्त केंद्रीय सहाय्य योजना ( राष्ट्रीय कृषि विकास योजना) राबविण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रीय कृषि विकास योजना ही राज्य योजना (State Plan Scheme)' असून योजनेकरीता १००% निधी केंद्र पुरस्कृत आहे. सदर योजनेच्या माध्यमातून पंचवार्षिक योजना काळात विकास दरामध्ये कृषि व कृषि संलग्न क्षेत्राचा विकास दर ४% गाठणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. सदर योजना ११ व्या पंचवार्षिक योजनेंतर्गत सन २००७-०८ पासून सुरु करण्यात आली आहे. केंद्र शासनाने माहे जानेवारी २०१४ मध्ये सदर योजनेकरीता सुधारीत मार्गदर्शक सुचना जारी केल्या असून सन २०१४-१५ पासून योजनेची या नवीन मार्गदर्शक सुचनांनुसार अंमलबजावणी करण्यात येत आहे. राष्ट्रीय कृषि विकास योजनेची प्रमुख उद्दीष्टे पुढीलप्रमाणे:-

१) कृषि व कृषि संलग्न क्षेत्रामध्ये सार्वजनिक गुंतवणूकीचे प्रमाण वाढविण्यासाठी राज्यांना उत्तेजन देणे.
२) कृषि व कृषि संलग्न क्षेत्राशी संबंधित योजनांच्या नियोजन व कार्यान्वयनामध्ये राज्यांना लवचिकता व स्वायतत्ता देणे.
३) स्थानिक हवामान, उपलब्ध तंत्रज्ञान आणि नैसर्गिक साधनसंपत्ती विचारात घेऊन जिल्हा आणि राज्याच्या कृषि क्षेत्राच्या वाढीसाठी प्रकल्पाधारीत कृषि आराखडा तयार करण्याचे राज्य शासनांना स्वातंत्र्य देणे.
४) स्थानिक गरजेनुसार पिके व प्राधान्यक्रमाचा विचार करुन त्यांना राज्यांच्या कृषि नियोजनामध्ये स्थान देणे.
५) महत्त्वाच्या पिकांना केंद्रीभूत ठेऊन वैशिष्टयपूर्ण उपाययोजनांद्वारे उत्पादनातील तफावत कमी करणे
६) कृषि आणि इतर संलग्न क्षेत्रामधील शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ करणे.
७) एकात्मिक उपाययोजनांद्वारे कृषि व कृषि संलग्न क्षेत्राच्या विविध घटकांच्या उत्पादन व उत्पादकतेमध्ये संख्यात्मकदृष्टया लक्षणीय बदल घडवून आणणे.

**योजनेची व्याप्ती** :- सदर योजनेंतर्गत कृषि व कृषि संलग्न क्षेत्रांचा समावेश आहे. सबब, या योजनेंतर्गत कृषि व फलोत्पादन विभागासह, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, जलसंधारण विभाग, सहकार, पणन, रेशीम तसेच सदर सर्व विभागांच्या अखत्यारीतील महामंडळ, मंडळे, स्वायत्त संस्था व कृषि विद्यापीठांचा सहभाग आहे. सदर सर्व सहभागी विभाग / यंत्रणांकडून अथवा त्यांच्या अधिनस्त सहकारी संस्था / खाजगी गुंतवणूकदार/कंपन्या इ. चे प्रकल्प राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मंजूरीस्तव सादर करण्यात येतात.

**योजनेंतर्गत राज्यांची पात्रता** :- १२ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये सन २०१४-१५ करीता राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत राज्यांची पात्रता निश्चिती करण्याकरीता पुढील दोन निकष निश्चित केले आहेत:-

**अ) राज्याचा कृषि क्षेत्रावरील खर्च किमान प्रमाण आधारभूत रेषेएवढा राखणे**:-

- सन २००९-१० ते २०११-१२ या ३ वर्षांमध्ये राज्यांनी प्रतिवर्ष एकूण वार्षिक योजनेंतर्गत 'कृषि व संलग्न क्षेत्रावर' प्रतिवर्ष केलेल्या खर्चाच्या (RKVY निधी वगळून) प्रमाणाची सरासरी ही त्या राज्याची प्रमाण आधारभूत रेखा (Base line) म्हणून गणली गेली आहे.
- ज्या राज्यांनी सन २०१३-१४ मध्ये त्यांच्या वार्षिक योजना खर्चामध्ये 'कृषि व संलग्न क्षेत्रावर' केलेला एकूण खर्च (RKVY निधी वगळून) हा किमान दर प्रमाण आधारभूत रेषेच्या पातळीऐवढा केला आहे केवळ अशीच राज्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून निधी मिळविण्यास पात्र ठरली आहेत.
- सदर प्रमाण आधारभूत रेखा (Base line) प्रतिवर्ष सरकती राहणार असून त्याकरीता चालू वर्षापूर्वीचे वर्ष वगळून त्यानंतरची लगत ३ वर्ष विचारात घेऊन प्रमाण आधारभूत रेषेची पातळी वेळोवेळी निश्चित केली जाणार आहे.

**ब) सर्वंकष जिल्हा कृषि आराखडा व राज्य कृषि आराखडा बनविणे** (C-DAP/C-SAP/SAIDP):-

राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत राज्यांनी 'सर्वंकष जिल्हा कृषि आराखडा व सर्वंकष राज्य कृषि आराखडा (Comprehensive District Agriculture Plan & Comprehensive State Agriculture Plan) तयार करणे बंधनकारक असून सदर आराखडयामध्ये समाविष्ट असणा-या प्रकल्पांनाच राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मान्यता देणे आवश्यक आहे.

प्रत्येक जिल्हयातील स्थानिक हवामान, उपलब्ध तंत्रज्ञान आणि नैसर्गिक साधनसंपत्ती विचारात घेऊन तसेच, जिल्हयाच्या कृषि व संलग्न क्षेत्राच्या सर्वांगीण विकासार्थ आवश्यक उपाययोजनांची निश्चिती करुन त्यांचा प्राधान्यक्रम ठरवून, राज्यातील प्रत्येक जिल्हयाकरीता प्रकल्पाधारीत 'सर्वंकष जिल्हा कृषि आराखडा (C-DAP) तयार करणे आवश्यक आहे. तसेच राज्य कृषि आराखडा तयार करणे अभिप्रेत आहे.

**राज्य कृषिविषयक पायाभूत सुविधा विकास आराखडा**:- राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत C-DAP/C-SAP मध्ये अंतर्भुत असणा-या प्रकल्पांपैकी पायाभूत सुविधा विकासाशी व मालमत्ता निर्मितीशी निगडित प्रकल्पांकरीता 'राज्य कृषिविषयक पायाभूत सुविधा विकास आराखडा (State Agriculture Infrastructure Development Plan)' तयार करणे अनिवार्य आहे. सदर आराखडा तयार करतेवेळी राज्यामध्ये सार्वजनिक, खाजगी अथवा सहकारी क्षेत्रामध्ये कृषिविषयक सद्यस्थितीत उपलब्ध असणाऱ्या पायाभूत सुविधांचा गुणात्मक व संख्यात्मक अभ्यास करुन राज्याच्या कृषि क्षेत्राकरीता आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांची निश्चिती करण्यात यावी. तदोपरांत, सदर उपलब्ध आवश्यक पायाभूत सुविधांमधील तफावत दुर करणेहेतू पायाभूत सुविधा विकासाचे तसेच उपलब्ध सुविधांच्या बळकटीकरणाचे प्रकल्प हाती घेण्यात यावेत.

**राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत निधी वितरण व अर्थसहाय्य** :- राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत केंद्र शासन १००% निधी उपलब्ध करुन देत असून राज्यास त्या-त्या वर्षीच्या मंजूर निधीच्या ५०% निधी पहिल्या टप्प्यामध्ये व उर्वरित ५०% निधी दुस-या टप्प्यामध्ये उपलब्ध करुन

देण्यात येतो. दुस-या टप्प्याचा निधी मिळविण्याकरीता राज्यशासनाने मागील वर्षाच्या निधीचे १००% विनियोग प्रमाणपत्र आणि चालू वर्षी पहिल्या टप्प्यामध्ये मंजूर केलेल्या ५०% निधीपैकी किमान ६०% निधीचा विनियोग केल्याचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

केंद्र शासनातर्फे राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत राज्यांना प्रत्येक वर्षी मंजूर केलेल्या एकूण निधीपैकी २०% मर्यादेपर्यंत निधी केंद्र शासनाच्या स्तरावर राज्यांकरीता निश्चित केल्या जाणा-या

'विशेष उप-योजनांकरीता राखीव ठेवण्यात येतो. सदर निधी केंद्र शासन संबंधित राज्यासाठी मंजूर करेल त्या उप-योजनांवर खर्च करणे राज्य शासनांवर बंधनकारक आहे. सदर २०% निधी वगळून उर्वरीत ८०% निधी 'सर्वसाधारण राकृवियो निधी (Normal RKVY Fund)' म्हणून गणण्यात येतो.

<u>पायाभूत सुविधा व मालमत्तेशी निगडित स्त्रोत</u>:- या स्त्रोतांतर्गत प्रामुख्याने राज्याच्या कृषि क्षेत्रास आवश्यक असणा-या पायाभूत सुविधा विकासाचे अथवा मालमत्ता निर्मितीशी (औजारे, ठिबक व तुषार सिंचन, पंपसेट इ.) निगडित प्रकल्पांना मंजूरी दयावयाची आहे. या स्त्रोतांतर्गत राज्यास राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या एकूण निधीपैकी (विशेष उप-योजनांचा २०% निधी वगळून) किमान ३५% मर्यादेपर्यंत निधी खर्च करणे बंधनकारक आहे (म्हणजेच सर्वसाधारण राकृवियो निधीच्या ४३.७५% निधी). तथापि, राज्य शासनास आवश्यक असल्यास या स्त्रोतांतर्गत मंजूर करण्यात येणा-या प्रकल्पांकरीता संपूर्ण सर्वसाधारण राकृवियो निधी (१००%) उपलब्ध करुन देण्याची मुभा राज्य शासनांना देण्यात आलेली आहे.

<u>पिक उत्पादन वाढीशी निगडित स्त्रोत</u> :- या स्त्रोतांतर्गत प्रामुख्याने प्रमुख पिकांच्या उत्पादन व उत्पादकता वाढीशी निगडित प्रकल्पांना मंजूरी दयावयाची आहे. या स्त्रोतांतर्गत राज्यास राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या एकूण निधीपैकी (विशेष उप-योजनांचा २०% निधी वगळून) कमाल ३५% मर्यादेपर्यंत निधी उपलब्ध करुन देता येतो (म्हणजेच सर्वसाधारण राकृवियो निधीच्या ४३.७५% निधी).

**<u>लवचिक स्त्रोत</u> :-** या स्त्रोतांतर्गत राज्यास राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या एकूण निधीपैकी (विशेष उप-योजनांचा २०% निधी वगळून) १०% निधी (म्हणजेच सर्वसाधारण राकृवियो निधीच्या १२.५०% निधी) उपलब्ध आहे. राज्याच्या कृषि क्षेत्राच्या आवश्यकतेनुसार सदर स्त्रोतांतर्गत प्राप्त होणारा निधी पायाभूत सुविधा व मालमत्तेशी निगडित स्त्रोतांतर्गत मंजूर प्रकल्पांना अथवा पिक उत्पादन वाढीशी निगडित मंजूर प्रकल्पांना उपलब्ध करुन दयावयाची मुभा राज्य शासनांना दिलेली आहे.

**विशेष उप-योजना स्त्रोत :-** केंद्र शासनातर्फे राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत राज्यांना प्रत्येक वर्षी मंजूर केलेल्या एकूण निधीपैकी २०% मर्यादेपर्यंत निधी केंद्र शासनाच्या स्तरावर राखीव ठेवण्यात येतो. केंद्र शासन कृषि क्षेत्राचे राष्ट्रीय प्राधान्यक्रम विचारात घेऊन राज्यांकरीता विशेष उप-योजनांची आखणी करते आणि सदर राखीव निधी संबंधित राज्यांकरीता निश्चित केलेल्या 'विशेष उप-योजनांच्या अंमलबजावणीकरीता राज्यांना उपलब्ध करुन देते.

**राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत प्रकल्प मंजूरीची कार्यपध्दती** :- राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत सर्व संबंधित अंमलबजावणी यंत्रणा/विभाग त्यांच्या प्रकल्पांच्या व्याप्तीनुसार तसेच

प्राधान्यक्रमानुसार प्रकल्पाचा संबंधित जिल्हा कृषि आराखडा वा राज्य कृषि आराखडयांमध्ये समावेश करुन सदर प्रकल्प कृषि विभागांतर्गत राकृवियो कक्षाकडे मंजूरीस्तव सादर केले जातात.

**<u>राज्यस्तरीय प्रकल्प छाननी समिती (SLPSC)</u>** :- राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार सर्व विभागांकडून प्राप्त होणा-या प्रकल्पांची सर्वंकष छाननी करुन निवडक प्रकल्प राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्याकरीता अपर मुख्य सचिव (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली 'राज्यस्तरीय प्रकल्प छाननी समिती (SLPSC)' गठीत करण्यात आली आहे.

**केंद्र शासनाचे अभिप्राय** :- राज्य स्तरीय प्रकल्प मंजूरी समितीच्या बैठकीपूर्वी, प्रथमत: केंद्रीय कृषि मंत्रालयाच्या राष्ट्रीय कृषि विकास योजना कक्षाकडे छाननी समितीने शिफारस केलेले प्रकल्प किमान १५ दिवस अगोदर प्राप्त होतील अशा रीतीने सादर केले जातात. सदर कक्ष सर्व प्रकल्पांची केंद्रीय कृषि मंत्रालयाच्या विविध विभागांमार्फत छाननी करुन त्यांचे अभिप्राय प्राप्त करुन घेते. छाननी समितीने शिफारस केलेले प्रकल्प व त्यावर केंद्र शासनामार्फत प्रकल्पनिहाय प्राप्त अभिप्राय विचारात घेऊन संबंधित प्रकल्प मंजूरीबाबत अंतिम निर्णय मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील गठीत करण्यात आलेली 'राज्य स्तरीय प्रकल्प मंजूरी समिती (SLSC)' घेते.

**<u>राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समिती (SLSC)</u>** :- राकृवियोंतर्गत मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील 'राज्य स्तरीय प्रकल्प मंजूरी समिती (SLSC)' गठीत करण्यात आली असून सदर समितीला राकृवियोंतर्गत प्रकल्पांना मंजूरी देण्याचे सर्वाधिकार प्रदत्त आहेत.

**<u>मोठे प्रकल्प मंजूर करण्याची कार्यवाही</u>** :- राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मंजूर करावयाच्या ज्या प्रकल्पांची प्रकल्प किंमत ₹ २५ कोटी वा त्याहून अधिक असेल असे प्रकल्प प्रथमत: संबंधित विभागांनी आपल्या केंद्र शासनाच्या संबंधित मंत्रालयाच्या विभागांकडे अभिप्रायार्थ पाठवावयाचे असून सदर अभिप्राय प्राप्त झाल्यानंतरच असे प्रकल्प राज्यस्तरीय प्रकल्प छाननी समितीपुढे मान्यतेस्तव सादर करावयाचे असतात.

**<u>मंजूर प्रकल्पांचे मुल्यांकन</u>** :- राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत प्रतिवर्ष मंजूर करण्यात येणा-या एकूण प्रकल्पांपैकी किमान २५% प्रकल्पांचे त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यांकन करणे आवश्यक आहे.

**<u>स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग</u>** :- कृषि विषयक स्थानिक गरजांना कृषि नियोजनामध्ये प्राधान्य देणेहेतू राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मंजूर करण्यात येणा-या एकूण प्रकल्पांपैकी किमान २५% प्रकल्प संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी शिफारस केलेले असावेत.

............

## खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थामधील व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तिबाबत.

शासन निर्णय क्र.:- संकीर्ण-२०१२/प्र.क्र.१६७/७अे, दि.१०.०७.२०१४ व शुध्दीपत्रक दि. २५.०८.२०१४

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग या विभागांच्या अधिपत्याखाली असणाऱ्या व्यावसायिक अभ्याक्रमांमध्ये खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमधील अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील विद्यार्थी केवळ निधीअभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांपासून वंचित राहू नये म्हणून एक सामाजिक बांधिलकी व घटनात्मक उत्तरदायित्व म्हणून राज्य शासनाने फी प्रतिपूर्ती करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून घेतलेला आहे.

**योजनेत लाभासाठीच्या अटी:-**

खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये महाविद्यालयाच्या कृषि व संलग्न विषयातील( पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी) अभ्यसक्रमासाठी व्यवस्थापन कोट्यातील प्रवेश वगळून इतर जागांवर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर सवलत लागू राहील.

सदरहू योजनेचा लाभ घेण्यासाठी विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गांच्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु १.०० लक्ष रकमेच्या आत असणे आवश्यक राहील.

आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना ५० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती शासनामार्फत करण्यात येईल.

अभिमत विद्यापीठांना ही सवलत लागू राहणार नाही.

अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना ही सवलत लागू राहणार नाही.

आर्थिक मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र हे संबंधित तहसिलदार यांचे असावे.

................

# एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (MIDH)
## (Mission for Intergrated Development of Horticulture)

शासन निर्णय क्र.:-एमआयडीएच/२०१४/प्र.क्र.८२/९अे, दि. ३० मे, २०१४.

**प्रस्तावना**:- महाराष्ट्र राज्याने फलोत्पादन क्षेत्रामध्ये दैदिप्यमान प्रगती केली आहे. राज्यातील शेतकरी अतिशय अभ्यासू, जिज्ञासू आणि नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करणारा आहे. राज्यामध्ये ८५ टक्के क्षेत्र कोरडवाहू आणि मोसमी पावसाच्या पाण्यावर अवलंबुन असताना देखील शेतकऱ्यांनी केलेली प्रगती वाखणण्यासारखी आहे. फलोत्पादन क्षेत्रामधुन शेतकऱ्यांना मिळणारा निव्वळ नफा हा इतर तृणधान्य, कडधान्य, तेलबिया, ऊस आणि कापूस या पिकांपेक्षा कितीतरी पटीने अधिक आहे.त्यामुळे राज्यातील शेतकरी दिवसेंदिवस फलोत्पादन क्षेत्राकडे वळु लागले आहेत.

राज्य शासनाच्या योजनांबरोबरच केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांना देण्यात येतो. व्यापारक्षम शेती प्रक्रियेने जागतिकीकरणाच्या धोरणात मुख्य स्थान मिळविले आहे. कृषि क्षेत्रात किती उत्पादन मिळाले, यापेक्षा किती अधिक नफा मिळविला हे आज महत्वाचे झाले आहे. आपणाकडे उपलब्ध असलेल्या विविध संसाधनांचा किफायतीशीर वापर करुन बाजारपेठांचा विचार करुन व व्यवसायिक तत्वावर शेती करण्यावर आज भर दिला जात आहे. याद्दष्टीने फळपिके, फुलपिके, भाजीपाला पिके, औषधी व सुगंधी वनस्पती, मसाला पिके तसेच त्यावर आधारित प्रक्रिया आणि निर्यात या क्षेत्रात फलोत्पादन पिकांना मोठा वाव आहे.

**योजनेची माहिती**:- सन २०१४-१५ पासुन राज्यात “एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान” राबविण्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. या अभियानाअंतर्गत विविध घटक राबविण्यात येत असुन सार्वजनिक क्षेत्र, खाजगी क्षेत्र आणि शेतकऱ्यांसाठी विविध घटकांतर्गत अर्थसहाय्याचे प्रमाण व मापदंड ठरविण्यात आलेले आहेत.

मागील काही वर्षापासून या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये आलेला अनुभव व अडचणी विचारात घेवून सन २०१४-१५ पासून केंद्र शासनाने काही घटकामध्ये वाढ करुन मापदंडामध्येही बदल केलेला आहे. यामुळे शेतकऱ्यांचा तसेच खाजगी क्षेत्रांचा यांस सकारात्मक प्रतिसाद मिळुन सदर कार्यक्रम मोठ्या प्रमाणांवर राबविणे शक्य होईल, असा विश्वास आहे.

तद्अनुषंगाने सन २०१४-१५ साठी “एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान” अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध घटकांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक सुधारित मार्गदर्शक सूचना मापदंडासह निर्गमित करण्यात येत आहे.

.............

# शेतकरी जनता अपघात विमा योजना

शासन निर्णय क्र.:- एनआयएस-१२०४/प्र.क्र.१६६/११अे, दि.१९.०८.२००४
शासन निर्णय क्र.:-शेअवि-२०१४/प्र.क्र.६९/११अे, दि.३०.१०.२०१४ (प्रशासकीय मान्यता)
शासन निर्णय क्र.:-शेअवि-२०१४/प्र.क्र.६९ /११अे, दि.३०.१०.२०१४ ( वित्तीय मान्यता )

**अ) योजनेचा उद्देश:-** राज्यात शेती व्यवसाय करताना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, विजेचा शॉक बसणे इत्यादी नैसर्गिक आपत्तींमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, वाहन अपघात तसेच अन्य कोणत्याही कारणामुळे होणारे अपघात यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांचा मृत्यू ओढवतो किंवा काहींना अपंगत्व येते. घरातील कर्त्या व्यक्तीस झालेल्या अपघातामुळे कुटुंबातील उत्पन्नाचे साधन बंद होवून अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघातग्रस्त शेतकऱ्यांस/ त्यांच्या कुटुंबियांस अर्थिक लाभ देण्याकरीता कोणतीही स्वतंत्र विमा योजना नसल्यामुळे शासनाने सन २००५-०६ पासून शेतकरी व्यक्तीगत अपघात विमा योजना सुरु केलेली आहे. सन २००९ मध्ये सदर योजनेचे नाव बदलून "शेतकरी जनता अपघात विमा योजना" असे करण्यात आले आहे.

**ब) योजनेची ठळक वैशिष्ट्ये:-**

अ) शेतकऱ्यांनी स्वत: किंवा त्यांच्या वतीने अन्य कोणत्याही संस्थेने या योजनेत पुन्हा स्वतंत्ररित्या विमा हप्ता रक्कम भरण्याची आवश्यकता नाही. शासनाकडून सर्व खातेदार शेतकऱ्यांचा विमा हप्ता भरण्यात येतो.

ब) यापूर्वी शेतकऱ्यांनी अथवा त्यांच्या वतीने अन्य कोणत्याही संस्थेने कोणतीही वेगळी विमा योजना लागू केली असल्यास अथवा विमा उतरविला असल्यास त्याचा या योजनेशी काहीही संबंध राहणार नाही. या विमा योजनेअंतर्गत मिळणारे लाभ स्वतंत्र असतील.

क) योजनेचा लाभ मिळण्यासाठी विहित केलेली प्रपत्रे/ कागदपत्रे वगळता अन्य कोणतीही कागदपत्रे शेतकऱ्यांनी सादर करण्याची आवश्यकता नाही.

शेतकरी जनता अपघात विमा योजनेंतर्गत मिळणारे लाभ खालीलप्रमाणे राहतील:-

| अ.क्र. | अपघाताची बाब | नुकसान भरपाई |
|---|---|---|
| १. | अपघाती मृत्यू | रु.१,००,०००/- |
| २. | अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन अवयव निकामी होणे | रु.१,००,०००/- |
| ३. | अपघातामुळे एक डोळा व एक अवयव निकामी होणे | रु.१,००,०००/- |
| ४. | अपघातामुळे एक डोळा अथवा एक अवयव निकामी होणे | रु. ५०,०००/- |

**क) लाभार्थी पात्रतेच्या अटी व त्यासाठी आवश्यक कागदपत्रे:-**

अ) महाराष्ट्र राज्यातील १० ते ७५ वयोगटातील महसूल नोंदीनुसार असलेला खातेदार शेतकरी.

ब) शेतकरी म्हणून त्याच्या नावाचा समावेश असलेला ७/१२ किंवा ८-अ नमुन्यातील उतारा.

क) ज्या नोंदीवरुन अपघातग्रस्त शेतकऱ्याचे नाव ७/१२ वर आले असेल अशी संबंधीत फेरफार नोंद (गाव नमुना नंबर ६-ड)

ड) शेतकऱ्याचे वारस म्हणून गाव कामगार तलाठ्याकडील गाव नमुना नंबर ६-क नुसार मंजूर झालेली वारसाची नोंद.

ई) अपघाताच्या स्वरुपानुसार विहित केलेली इतर कागदपत्रे.

**इ) विमा संरक्षणामध्ये समाविष्ठ बाबी**:-

क) रस्ता/रेल्वे अपघात
ख) पाण्यात बुडून मृत्यू
ग) जंतुनाशके हाताळताना अथवा अन्य कारणांमुळे विषबाधा
घ) विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात
च) विज पडून मृत्यू
छ) खून
ज) उंचावरुन पडून झालेला अपघात
झ) सर्पदंश व विंचूदंश
ट) नक्षलवद्यांकडून झालेली हत्या
ठ) जनावरांच्या खाण्यामुळे/चावण्यामुळे जखमी/मृत्यू
ड) दंगल
ढ) अन्य कोणतेही अपघात

**ई) विमा संरक्षणामध्ये समाविष्ट नसलेल्या बाबी**:-

क) नैसर्गिक मृत्यू
ख) विमा कालावधीपूर्वीचे अपंगत्व
ग) आत्महत्येचा प्रयत्न/आत्महत्या किंवा जाणीवपूर्वक स्वत:ला जखमी करुन घेणे
घ) गुन्ह्याच्या उद्देशाने कायद्याचे उल्लंघन करताना झालेला अपघात
च) अंमली पदार्थांच्या अमलाखाली असताना झालेला अपघात
छ) भ्रमिष्टपणा
ज) बाळंतपणातील मृत्यू
झ) शारीराअंतर्गत रक्तस्त्राव
ट) मोटार शर्यतीतील अपघात
ठ) युध्द
ड) सैन्यातील नोकरी
ढ) जवळच्या लाभधारकाकडून खून

**फ) वारसदार**:-

अ)मृत शेतकऱ्याची पत्नी/ मृत शेतकरी स्त्रीचा पती.
ब) मृत शेतकऱ्याची अविवाहित मुलगी
क) मृत शेतकऱ्याची आई
ड) मृत शेतकऱ्याची मुले
इ) मृत शेतकऱ्याची नातवंडे
ह) मृत शेतकऱ्याची विवाहित मुलगी

**ग) विमा प्रस्ताव सादर करण्याची पध्दत**:- शेतकरी/ वारसदारांनी विमा कालावधीत तलाठी यांच्या प्रमाणपत्रासह तालुका कृषि अधिकारी कार्यालयामार्फत परीपूर्ण प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाकडे पाठवावयाचा आहे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रस्तावांची नोंद घेऊन शासनाचे विमा सल्लागार यांच्या विभागीय कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवावयाचा आहे. विमा सल्लागार यांच्या कार्यालयाकडून प्राथमिक छाननी होऊन तो विमा कंपनीकडे मंजूरीसाठी पाठवावयाचा आहे.

................

## शासन व्यवहारात मराठीचा वापर- एतदर्थ मंडळाची मराठी भाषा परीक्षा

शासन निर्णय क्रमांक:- मभाप-१०८७/१४/सीआर-२/८७/२०, दि. ३०.१२.१९८७.
अधिसूचना क्रमांक:- मभाप- १०९७/१६५२/प्र.क्र.७२/९७/२०-ब, दि. ७.२.२००१.

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ मधील तरतुदीनुसार वर्जित प्रयोजने वगळता सर्व कामकाज मराठीतून करणे बंधनकारक करण्यात आले आहे. शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा १०० टक्के वापर करण्याचे शासनाचे धोरण आहे. सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना कमांक्र- मभाप-१०८७/१४/सीआर-२/८७/२०, दि.३०.१२.१९८७ नुसार भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकांराचा वापर करून आणि याबाबतीत काढण्यात आलेल्या आणि राज्यात किंवा राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेल्या सर्व विद्यमान नियमांचे आणि आदेशांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या (न्यायिक विभागातील कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त) मराठी भाषा परीक्षेच्या संबंधात महाराष्ट्र शासकीय कर्मचारी (न्यायिक विभागातील कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त) मराठी भाषा परीक्षा, नियम १९८७ निर्गमित करण्यात आले आहेत.

शासन सेवेत दाखल झालेल्या राजपत्रित/अराजपत्रित अधिकारी/कर्मचारी यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मराठी हा उच्चस्तर (१०० गुणांचा) विषय घेऊन उत्तीर्ण केली नसेल तर त्यांच्या नियुक्तीपासून ४ वर्षाचा कालावधी संपण्यापूर्वी त्यांनी एतदर्थ मंडळाची मराठी उच्चस्तर व निम्नस्तर भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे सा.प्र.वि.च्या दि.३०.१२.१९८७ च्या अधिसूचनेन्वये बंधनकारक करण्यात आले आहे. सदर परीक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण न झाल्यास संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनवाढी सदर नियमावलीतील नियम ५ नुसार रोखण्यात येतात. तथापि शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्याचे पद जर तांत्रिक किंवा कष्टाच्या स्वरूपाचे असेल ज्यासाठी मराठी भाषेत पत्रव्यवहार करण्याची आवश्यकता नसेल आणि सदर पद हे तांत्रिक असल्याबाबतचे आदेश संबंधित विभागाने सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित केले असतील तर त्या शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यास ही परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सदर नियमावलीतील नियम ४ (पाच) खालील परंतुकान्वये सूट देण्यात येते.

.................

# एतदर्थ मंडळाची हिंदी भाषा परीक्षा

शासन निर्णय क्र:- हिंभाप-१९७६-२८, दि.१०.६.१९७६.

शासन निर्णय क्रमांक:- हिंभाप-१०८०/१३१-वीस, दि.२५.५.१९८१.

शासन निर्णय क्रमांक:- हिंभाप-१०८३/१४४८/वीस, दि.१.१२.१९८

शासन सेवेत दाखल झालेल्या राजपत्रित/अराजपत्रित अधिकारी अथवा कर्मचा-यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा “हिंदी” हा विषय घेऊन उत्तीर्ण केली नसेल तर त्यांच्या नियुक्तीपासून ४ वर्षात यांना एतदर्थ मंडळाची “हिंदी” भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. सदर परीक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण न झाल्यास त्याच्या वेतनवाढी रोखण्यात येतात. सा.प्र.वि.च्या दि.१०.६.१९७६ च्या शासन निर्णयान्वये ज्या अधिकारी/कर्मचाऱ्याची वयाची ४५ वर्षे पूर्ण होतील त्याला सदर परीक्षा पास होण्यापासून सूट देण्यात येते.

इतर खाजगी संस्था/इतर राज्यांच्या व केंद्र शासनाच्या इतर अभिकरणामार्फत (एजन्सी) घेण्यात येणाऱ्या हिंदीच्या परीक्षा उत्तीर्ण कर्मचाऱ्यांच्या बाबतीत माध्यमिक शालांत परीक्षा हिंदी विषय घेऊन उत्तीर्ण होण्याचा निकष लावण्याबाबत व तसे नसल्यास एतदर्थ मंडळाची विहित परीक्षा उत्तीर्ण होण्याबाबत शासन निर्णय क्र.हिंभाप-१०८०/१३१-वीस, दि.२५ मे, १९८१ निर्गमित केला आहे.

माध्यमिक शालांत परीक्षा “हिंदी” हा संयुक्त विषय (हिंदी-संस्कृत, हिंदी-मराठी, हिंदी-उर्दू) घेऊन तसेच ५० अथवा १०० गुणांचा स्वतंत्र हिंदी विषय घेऊन परीक्षा उत्तीर्ण झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यास एतदर्थ मंडळाची हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देण्याबाबतचा निर्णय शासन निर्णय क्र.हिंभाप-१०८३/१४४८/वीस, दि.१.१२.१९८४ अन्वये घेण्यात आला आहे.

.................

# विविध पुरस्कार योजना

शासन निर्णयः-१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. साजीगौ-२०१०/ प्र.क्र.११६/ सां.का.३, दि.१३.४.२०१०.

२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. मवापू-२००७/प्र.क्र.३५९/ सां.का.३, दि.१५.३.२००७

३) समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. मवापु-१०९४/ प्र.क्र.३५०/सां.का.२, दि.१.७.१९९५.

४)मराठी भाषा विभाग, शा.नि. क्र.पुरस१०१२/प्र.क्र.१११/२०१२/भाषा-३,दि.३.३.२०१४.

**(अ)** **विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार योजना**:- महाराष्ट्र शासनाकडून मराठी साहित्य / वाङ्मय क्षेत्रात भरीव व मोलाची कामगिरी करणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिकास विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या पुरस्काराचे स्वरुप रु.५,००,०००/- ( रुपये पाच लक्ष मात्र ) रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

**(ब)** **श्री.पु.भागवत पुरस्कार योजना**:- साहित्य निर्मितीमध्ये मोलाचे कार्य करणाऱ्या प्रकाशन संस्थेस श्री.पु.भागवत पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या पुरस्काराचे स्वरुप रु.३,००,०००/- ( रुपये तीन लक्ष मात्र ) रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

**(क)** **स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना:-** मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीस राज्य पुरस्कार देण्याची योजना कार्यान्वीत आहे. या योजनेंतर्गत राज्यातील व राज्याबाहेरील ज्या लेखकांनी मराठी भाषेमध्ये वाङ्मय निर्मिती केली आहे अशा लेखकांकडून विविध वाङ्मय प्रकारातील (उदा.काव्य, नाटक, कादंबरी, लघुकथा, ललितगद्य इत्यादी) पुस्तके स्वीकारण्यात येतात व त्यामधून, या स्पर्धेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या परिक्षण समितीकडून एकूण ३५ विविध वाङ्मय प्रकारातील पुस्तकांची पुरस्कारांसाठी निवड करण्यात येते. या पुरस्काराचे स्वरुप रोख रक्कम (कमीत कमी रुपये पन्नास हजार व जास्तीत जास्त रुपये एक लक्ष), स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे आहे.

वरील पुरस्कार निवड समितीमार्फत ठरविण्यात आलेल्या निकष लक्षात घेऊन निश्चित केले जातात. सदर पुरस्कार २७ फेब्रुवारी रोजी "मराठी भाषा गौरव दिन" या दिवशी प्रतिवर्षी वितरित करण्यात येतात.

.................

## ग्रंथोत्सव

शासन निर्णय क्र.:- योजना-१०११/प्र.क्र.७६/२०११/भाषा-३, दि.२८.११.२०११

मराठी भाषेचा सर्वांगीण विकास व भाषा आणि साहित्य संस्कृतीची जोपासना / संवर्धन करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण - २०१० मध्ये अंतर्भूत केलेला ग्रंथोत्सव हा उपक्रम "महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या" वतीने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिपत्याखालील जिल्हा माहिती अधिकाऱ्यांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांच्या सहकार्याने दरवर्षी मुंबई व उपनगर वगळून राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये तसेच राज्याबाहेर गोवा व नवी दिल्ली येथे माहे डिसेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत ३ दिवसांचा "ग्रंथोत्सव" आयोजित करण्यात येतो. त्यासाठी शासनाकडून प्रत्येकी रू.१.५० लक्ष याप्रमाणे अर्थसहाय्य करण्यात येते.

प्रकाशक आणि ग्रंथ विक्रेते यांना ग्रंथ विक्रीसाठी आणि ग्रंथ प्रेमींना एकाच ठिकाणी विविध ग्रंथ प्राप्त व्हावेत यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देणे, हा या आयोजनेचा मुख्य उद्देश आहे.

..............

# सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

शासन निर्णय क्र. १) इबीसी२००३/ प्र.क्र.११६/मावक २, दि.२३ मे, २००३.
२) इमाव२००३/प्र.क्र.२०१/मावक ३, दि. २५ जुलै, २००३.

मागासवर्गीय मुलींचे प्राथमिक शाळांमध्ये गळतीचे प्रमाण अधिक आढळून येते. या गळतीच्या कारणांची कारणमिमांसा करता, मुलींच्या पालकांना रोजगारासाठी बाहेर जावे लागते. कुटूंबाची आर्थिक परिस्थिती हलाकीची असल्यामुळे पालक मुलांना रोजगारासाठी मदत म्हणून शेतावर व इतरत्र कामावर घेवून जातात. परिणामी शाळेतील गळतीचे प्रमाण वाढते. सबब मुलींना शिक्षण देण्याची प्रवृत्ती पालकांमध्ये वाढण्याच्या हेतूने इयत्ता ५वी ते ७वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना शिष्यवृत्ती देण्याचा शासन निर्णय दि. १२ जानेवारी, १९९६ रोजी निर्गमित करण्यात आला. याच धर्तीवर इयत्ता ८वी ते १० मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुलींसाठी “सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना” दि. २३ मे, २००३ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली. त्यानंतर इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील मुलींसाठी सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षापासून ही योजना दि. २५ जुलै, २००३ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली.

सदर योजनेंतर्गत अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत:-

१) उत्पन्न व गुणांची अट नाही.

२) विद्यार्थीनींची उपस्थिती नियमित असणे आवश्यक राहील.

योजनेचे स्वरुप -

| इयत्ता | शिष्यवृत्ती दर |
|---|---|
| ५ वी ते ७ वी | रु.६०/- द.म. |
| ८ वी ते १० वी | रु.१००/-द.म. |

.................

## अपंगांचे शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसन योजना

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ मधील कलम ६० अन्वये अपंग कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता शासन निर्णय दिनांक १९.८.२००० अन्वये स्वतंत्र अपंग कल्याण आयुक्तालयाची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच स्वतंत्र आयुक्तालयाची स्थापना होण्यापूर्वी सामाजिक न्याय विभागाच्या अपंग व्यक्तीसाठीच्या अपंगांचे शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसनाच्या योजना संचालक, समाज कल्याण,महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्फत राबविण्यात येत होत्या त्या संपूर्ण योजना या आयुक्तालयाकडे वर्ग करण्यात आल्या असून त्या योजनांची अंमलबजावणी अपंग कल्याण आयुक्तालयामार्फत करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्याची सन २०११ च्या सार्वत्रिक जनगणनेप्रमाणे अपंग व्यक्तींची एकूण संख्या २९६३३९२ ( १६९२२८५ पुरुष + १२७११०७ स्त्रीया ) इतकी आहे.

**शासकीय संस्थांमधून अपंगांचे शिक्षण व प्रशिक्षण**:- शासकीय संस्थांमध्ये ६ ते १८ वयोगटातील अंध, कर्णबधिर व अस्थिव्यंग अपंग विद्यार्थ्यांना विशेष शिक्षण पध्दतीने व विशेष शैक्षणिक साहित्याचा वापर करुन मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते. त्याच बरोबर निवास व भोजनाची विना मुल्य व्यवस्था करण्यात येते. तसेच १८ वर्षावरील अपंग व्यक्तींना रोजगार व स्वयंरोजगाराच्या दृष्टीने त्यांचे अपंगत्व विचारात घेवून अपंगत्वानुरुप विविध व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यात येते. त्यांच्या निवास व भोजनाची विनामुल्य व्यवस्था करण्यात येते. राज्यात एकूण २२ शासकीय संस्था आहेत.

**स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या संस्थांमधून अपंगांचे शिक्षण व प्रशिक्षण**:- स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळेमधून वय वर्षे ६ ते १८ वयोगटातील अंध, कर्णबधिर, अस्थिव्यंग व मतिमंद अपंग विद्यार्थ्यांना विशेष शिक्षण पध्दतीने व विशेष शैक्षणिक साहित्याचा वापर करुन मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते. निवास व भोजनाची विना मुल्य व्यवस्था करण्यात येते. त्याच बरोबर १८ वर्षावरील अपंग व्यक्तींना रोजगार व स्वयंरोजगाराच्या दृष्टीने त्यांचे अपंगत्व विचारात घेवून अपंगत्वानुरुप विविध व्यवसायाचे अपंग कर्मशाळांमध्ये प्रशिक्षण देण्यात येते. त्याचप्रमाणे त्यांच्या निवास व भोजनाची विना मुल्य व्यवस्था करण्यात येते.

**शालांत परिक्षा पुर्व शिक्षणासाठी अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती**:- अपंग शाळेतील अनिवासी विद्यार्थी तसेच सामान्य शाळेतील इयत्ता १ ली ते १० पर्यंत अपंग विद्यार्थ्यांना उत्पन्नाची अट न लावता शालेय शिक्षणासाठी शालांत पुर्व शिक्षणासाठी अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते.

**शालांत परिक्षोत्तर (मॅट्रीकोत्तर) शिक्षणासाठी अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती** :-

अंध, अधूदृष्टी, कुष्ठरोगमुक्त, कर्णबधिर, अस्थिव्यंग, मतिमंद व मनोरूग्ण विद्यार्थ्यांना इयत्ता १० वी नंतरचे महाविद्यालयीन व्यवसायिक, तांत्रिक व अभियांत्रिकी शिक्षणासाठी त्यांच्या अभ्यासक्रमाच्या दर्जाप्रमाणे अभ्यासक्रमाचे गट करून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीची रक्कम देण्यात येते. त्याचबरोबर अंध विद्यार्थ्यांना वाचक भत्ता तसेच सर्व अंपग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीबरोबर शैक्षणिक शुल्क, प्रकल्प टंकलेखन खर्च, अभ्यासदौरा खर्चाची रक्कम दिली जाते.

**अपंगांच्या क्रीडा स्पर्धा** :- अपंगांच्या क्रीडा गुणांना वाव मिळावा म्हणून प्रतिवर्षी राज्यस्तरीय अपंग क्रीडा स्पर्धाचे आयोजन करण्यात येते.

**अपंग विद्यार्थ्यांना गुणवत्ता पारितोषिके**:- प्रत्येक विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामधून, इयत्ता १० वी व १२ वी उत्तीर्ण होणाऱ्या प्रथम तीन क्रमाकांच्या प्रत्येकी तीन अपंग विद्यार्थ्यांना रूपये १०००/- रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येत.

**अपंग कल्याण राज्य पुरस्कार**:- उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या अपंग कर्मचारी / स्वयंउद्योजक, अपंगांचे नियुक्तक यांना राज्य पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात येते.

| क्र. | पुरस्काराचा प्रकार | पुरस्कारांची संख्या | पुरस्काराचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १. | उत्कृष्ठ अपंग कर्मचारी व अपंग स्वयंउद्योजक | १२ | रोख पुरस्कार रूपये १०,०००/- शाल, श्रीफळ, प्रशस्तीपत्रक व प्रमाणपत्र |
| २. | अपंगांचे नियुक्तक | २ | रुपये २५०००/- रोख व मानचिन्ह, शाल, श्रीफळ, प्रशस्तीपत्रक व प्रमाणपत्र |

**मतिमंद बालगृहे**:- बालहक्क (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० व सुधारीत नियम २००६ अन्वये महिला व बाल विकास विभागाच्या नियंत्रणाखाली कार्यरत असलेली १४ अनुदानित व ०५ विना अनुदानित अशी एकूण १९ मतिमंद बालगृहे महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय दिनांक ३० मे २०१२ व दिनांक १० मे २०१३ अन्वये दिनांक १.४.२०१३ पासून सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरीत झाली आहे.

..................

# विशेष सहाय्य कार्यक्रम

शासन निर्णय क्र.:- विसयो २०१०/प्रक्र.१७५/विसयो-२, दि. २६ ऑक्टोबर, २०१०.
शासन निर्णय क्र.:- आआवि२००७/प्र.क्र.३५६/विसयो, दि. १६ ऑक्टोबर, २००७.
शासन निर्णय क्र.:- राकुला२०१२/प्र.क्र.२७७/विसयो-२, दि.१२ मार्च, २०१३.

## (अ) राज्य पुरस्कृत योजना:-

### (१) संजय गांधी निराधार अनुदान योजना:-

या योजनेतंर्गत ६५ वर्षाखालील निराधार पुरुष व महिला, अनाथ मुले, अपंगातील सर्व प्रवर्ग, क्षयरोग, कर्करोग, एड्स, कुष्ठरोग यासारख्या आजारामुळे स्वत:चा चरितार्थ चालवू न शकणारे पुरुष व महिला, निराधार विधवा ( आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवासह ), घटस्फोट प्रक्रीयेतील व घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळालेल्या, अत्याचारित व वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला तृतीयपंथी, देवदासी,३५ वर्षावरील अविवाहीत स्त्री, तुरूंगात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची पत्नी, सिकलसेलग्रस्त या सर्वांना लाभ मिळतो. या योजनेमध्ये दारीद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असणे अथवा रुपये २१,०००/- पर्यंत कौटुंबिक वार्षिक उत्पन्न असणे आवश्यक आहे. या योजनेखाली पात्र होणा-या कुटूंबात एक लाभार्थी असल्यास रुपये ६००/- प्रतिमहा तर एका कुटूंबात एकापेक्षा जास्त लाभार्थी असल्यास, रुपये ९००/- प्रतिमहा इतके आर्थिक सहाय्य दिले जाते.

### (२) श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना:-

गट (अ):- ६५ व ६५ वर्षावरील व दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव समाविष्ट असणाऱ्या व्यक्तीना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना गट (अ) मधून रु.४००/- प्रति महिना निवृत्तीवेतन देण्यात येते याच लाभार्थ्याला केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेचे रु.२००/- प्रतिमहा प्रति लाभार्थी निवृत्तीवेतन दिले जाते.

गट (ब):- या योजनेतंर्गत ज्या व्यक्तीचे वय ६५ व ६५ वर्षावरील आहे व ज्यांचे कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न रुपये २१,०००/- च्या आत आहे, अशा वृध्दांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना (गट- ब) मध्ये रुपये ६००/- प्रतिमहा प्रतिलाभार्थी निवृत्तीवेतन राज्य शासनाकडून देण्यात येते.

## (ब) केंद्र पुरस्कृत योजना:-

### (१) इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना:-

या योजनेमध्ये ग्रामीण भागाकरिता सन २००२ च्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या सर्वेक्षणानुसार व शहरी भागासाठी नगर विकास विभागाने दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या घेतलेल्या सर्वेक्षणानुसार फक्त दारिद्रय रेषेखालील ६५ व ६५ वर्षावरील सर्व व्यक्ती पात्र होतील. या लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून रु.२००/- प्रतिमहा प्रति लाभार्थी निवृत्तीवेतन देण्यात येते. याच लाभार्थ्यांना राज्य शासनाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेमधून गट (अ) रु.४००/- प्रतिमहा निवृत्तीवेतन मिळते. यामुळे या लाभार्थ्यांना राज्य शासनाकडून रुपये ४००/-प्रतिमहा व केंद्र शासनाकडून रुपये २००/- प्रतिमहा असे एकूण रुपये ६००/-प्रतिमहा प्रति लाभार्थी निवृत्तीवेतन मिळते. केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना राज्य शासनाने शासन निर्णय दि.१३ जुलै,२०१० नुसार राज्यात लागू केलेल्या आहेत.

**(२) इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना:-**

दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नोंद असलेल्या ४० ते ६५ वर्षाखालील वयोगटातील विधवा, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र असतात . पात्र लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून रु.२००/- प्रतीमहा व राज्य शासनाकडून संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत रु.४००/- प्रतीमहा असे एकूण रु.६००/- प्रतीमहा निवृत्तीवेतन अनुज्ञेय आहे.

**(३) इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना :-**

दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नोंद असलेल्या अपंग लाभार्थ्यांपैकी फक्त १८ ते ६५ वर्षाखालील वयोगटातील ८०% हून जास्त अपंगत्व असलेले किंवा एक किंवा एका पेक्षा जास्त अपंगत्व असलेले किंवा बहू अपंगत्व असलेले (दोन किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल) लाभार्थी इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेंतर्गत निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र असतात .पात्र लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून रु.२००/- प्रतीमहा व राज्य शासनाकडून संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत रु.४००/- प्रतीमहा असे एकूण रु.६००/- प्रतीमहा निवृत्तीवेतन अनुज्ञेय आहे.

**(४) राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना :-**

दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील १८ ते ५९ वयोगटातील कमावत्या व्यक्तीचा अपघाती अथवा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियास एक रकमी रक्कम रु.२०,०००/- चे अर्थसहाय्य देण्यात येते. वरील सर्व योजना उणे पध्दतीवर आणण्यात आलेल्या आहेत.

संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना या योजनेखालील पात्र अर्जदाराची माहिती व अर्ज छाननीसह तहसिलदार किंवा अन्य संबंधित अधिकाऱ्यांनी तयार करुन ती माहिती व अर्ज संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीसमोर ठेवण्यात येते. सदर समितीला त्यावर निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत.

**(क) <u>आम आदमी विमा योजना</u>:-**

ग्रामीण भागातील १८ ते ५९ वयोगटातील भूमिहीन शेतमजूरांना तसेच २.५ एकर पेक्षा कमी बागायती व ५ एकर पेक्षा कमी जिरायती शेतजमीन धारण करणाऱ्यांना या योजनेंतर्गत लाभ देण्यात येतो. वार्षिक विम्याचा हप्ता रु.२००/- इतका असून केंद्र शासनामार्फत रु.१००/- व राज्य शासनामार्फत रु.१००/- इतका विम्याचा हप्ता भारतीय आयुर्विमा महामंडळाला देण्यात येतो.

या योजनेंतर्गत लाभार्थ्याच्या नववी ते बारावी इयत्तेत शिकणाऱ्या दोन मुलांना रु.१००/- प्रतिमहा प्रति विद्यार्थी शिष्यवृत्ती देण्यात येते.

.................

# सामूहिक प्रोत्साहन योजना- २०१३

शासन निर्णय( इंग्रजी ) क्र.:-पीएसआय२०१३/सीआर ५४/ उद्योग८,दि.१ एप्रिल,२०१३

राज्यातील मुंबई, पुणे व ठाणे या औद्योगिक पट्टयातील उद्योगांचे विकेंद्रीकरण करण्याकरीता व राज्यातील औद्योगिकदृष्टया विकसनशील व मागास भागात उद्योग आकर्षिक होण्याकरीता तसेच त्यामधून रोजगार निर्माण व्हावा याकरीता राज्य शासनामार्फत सन १९६४ पासून राज्यात "सामूहिक प्रोत्साहन योजना" राबविण्यात येत आहे.

दिनांक १/४/२००७ ते ३१/३/२०१३ या कालावधीत राज्यात सामूहिक प्रोत्साहन योजना, २००७ राबविण्यात आली आहे. शासनाने दिनांक २२/२/२०१३ रोजी नवीन औद्योगिक धोरण-२०१३ जाहिर केले आहे. त्यानुसार सामूहिक प्रोत्साहन योजना, २००७ चा कालावधी संपुष्टात आणून दिनांक १/४/२०१३ पासून राज्यात सामूहिक प्रोत्साहन योजना, २०१३ लागू करण्यात आली आहे. सदर योजनेचा कालावधी दिनांक ३१/३/२०१८ पर्यंत आहे.

सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत उद्योगांना प्रोत्साहने देण्यासाठी राज्यातील तालुक्यांचे त्यांच्या औद्योगिक विकासाच्या आधारे अ, ब, क, ड, ड + आणि विना उद्योग जिल्हा, असे वर्गीकरण करण्यात आले आहे. सामूहिक प्रोत्साहन योजना, २०१३ मध्ये या वर्गीकरणासह नक्षलप्रभावीत क्षेत्र असे देखील वर्गीकरण करण्यात आले आहे.

शासनाने जून, २००५ मध्ये विशाल प्रकल्प धोरण जाहीर केले आहे. सदरचे धोरण सामूहिक प्रोत्साहन योजना, २००७ व २०१३ मध्ये कायम ठेवण्यात आले आहे. शासनाने दिनांक २२/३/२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये विशाल प्रकल्प धोरणानुसार विशाल प्रकल्पांच्या निकषामध्ये सुधारणा केली आहे. सदरचे निकष साप्रोयो, २०१३ मध्ये कायम असून ते खालीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र | तालुक्यांचे वर्गीकरण | विशाल प्रकल्पासाठी निकष |
|---|---|---|
| १ | अ व ब वर्गीकृत तालुके | रु. ७५० कोटी गुंतवणूक किंवा १५०० व्यक्तींना रोजगार |
| २ | क वर्गीकृत तालुके | रु. ५०० कोटी गुंतवणूक किंवा १००० व्यक्तींना रोजगार |
| ३ | ड व ड+ वगीकृत तालुके | रु. २५० कोटी गुंतवणूक किंवा ५०० व्यक्तींना रोजगार |
| ४ | विना उद्योग जिल्हे व नक्षल प्रभावीत क्षेत्र | रु. १०० कोटी गुंतवणूक किंवा २५० व्यक्तींना रोजगार. |

शासनाने सामूहिक प्रोत्साहन योजना, २०१३ मध्ये अतिविशाल प्रकल्प असा सवंर्ग निर्माण केला असून त्यामध्ये रु. १५०० कोटी किंवा त्यापेक्षा जास्त गुंतवणूक किंवा ३००० व्यक्तींना रोजगार उपलब्ध करुन देणाऱ्या प्रकल्पास अतिविशाल प्रकल्प असे संबोधण्यात येईल.

सामुहिक प्रोत्साहन योजनेनुसार वस्तुंचे उत्पादन करणाऱ्या उद्योग घटकांना योजनेच्या पात्रतेनुसार व तालुक्याच्या वर्गीकरणानुसार सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे प्रोत्साहने/ सवलती अनुज्ञेय आहेत.

१) घटकाने भरणा केलेल्या मुल्यवर्धीत करावर आधारीत विहित कालावधीकरीता भांडवली गुंतवणूकीच्या काही प्रमाणात औद्योगिक विकास अनुदान,

२) विद्युत शुल्क माफी,

३) मुद्रांक शुल्क माफी,

४) जकात कर परतावा, (साप्रोयो, २०१३ मध्ये वगळण्यात आले)

५) विदर्भात स्थापन होणाऱ्या उद्योगांना स्वामित्वधन परतावा, (साप्रोयो, २०१३ मध्ये वगळण्यात आले)

६) राज्य कामगार विकास योजना व भविष्यनिर्वाह निधीमध्ये भरलेल्या अंशदानापोटी केलेल्या खर्चाच्या २५ टक्के मर्यादेपर्यंत रक्कम, ५ वर्षाकरीता (कमी मानवी निर्देशांक जिल्हयात स्थापन होणा-या उद्योगांना) (साप्रोयो, २०१३ मध्ये वगळण्यात आले)

राज्यात नव्याने अथवा विस्तारीकरणाव्दारे गुंतवणूक करणाऱ्या विशाल प्रकल्पांना अधिकाधिक विशेष प्रोत्साहने/सवलती किती व कोणत्या स्वरुपाची द्यावीत, याबाबत प्रकरणनिहाय निर्णय घेण्यासाठी मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती स्थापन करण्यात आली आहे. तसेच धोरणापेक्षा अधिकची प्रोत्साहने देय करण्याचे अधिकार मा. मुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली दिनांक २४/१/२००४ च्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेल्या मंत्रीमंडळ उपसमितीस आहेत.

सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ नुसार विदर्भातील नागपूर शहर “ड” वर्गीकृत व इतर सर्व तालुके ड+ वर्गीकृत म्हणून घोषीत करण्यात आले आहेत. तसेच संपूर्ण गडचिरोली व गोंदिया जिल्हे व चंद्रपूर, भंडारा व यवतमाळ या जिल्ह्यातील काही तालुके नक्षल प्रभावीत क्षेत्र म्हणून घोषित असून सामूहिक प्रोत्साहन योजना, २०१३ मध्ये अ, ब, क वर्गीकृत तालुक्यात स्थापन होणाऱ्या उद्योगांच्या तुलनेत ड, ड+ व नक्षलग्रस्त भागात स्थापन होणाऱ्या सुक्ष्म, लघु, मध्यम, मोठे, विशाल व अतिविशाल उद्योगांना/प्रकल्पांना अधिकचे औद्योगिक विकास अनुदान व सवलती तसेच इतर प्रोत्साहने अनुज्ञेय करण्यात आली आहेत.

.............

# जागतिक बँक सहाय्यीत महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प(एमएसीपी)

## (Maharashtra Agricultural Competitiveness Project)

शासन निर्णय क्र.:-बासप्र२००८/प्र.क्र.४५/२१स, दि.९ मे, २०११.

जागतिक बँक सहाय्यीत या प्रकल्पाची प्रकल्प किंमत रु. ७०८ कोटी आहे. या प्रकल्पामध्ये जागतिक बँकेच्या अल्पव्याजदरावरील कर्जाचा रु. ४६१ कोटी वाटा असणार असून राज्य शासनाचा रु. ५२ कोटी वाटा असणार आहे आणि उर्वरित रु. १९५ कोटी रक्कम लाभार्थ्यांमार्फत उभारली जाणे अपेक्षित आहे. ६ वर्ष कालावधी असणाऱ्या या प्रकल्पांतर्गत १०० कृषि उत्पन्न बाजार समित्या, ३०० आठवडी बाजार आणि २४ जनावरांच्या बाजारामध्ये पायाभूत सुविधांचे बळकटीकरण आणि आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. त्याशिवाय या प्रकल्पांतर्गत ४०० शेतकऱ्यांच्या सामुदायीक सुविधा केंद्रांच्या उभारणीस प्रोत्साहन देण्यात येणार आहे आणि गोदाम पावती सुविधा व ई-ट्रेडींग सुविधेस चालना देण्यात येणार आहे. या प्रकल्पामध्ये बाजारपेठप्रणित कृषि मालाचे उत्पादन आणि विस्तार कार्यावर भर देवून शिवाय पर्यायी बाजार प्रणालींना चालना देवून कृषि-पणन व्यवस्थेमध्ये अधिक स्पर्धात्मकता वाढवून अंतिमत: शेतकऱ्यांना त्यांच्या कृषि मालास रास्त बाजारभाव मिळवून देण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यात येईल.

या प्रकल्पांतर्गत समाविष्ट असलेल्या पहिल्या टप्प्यातील १० जिल्हे, दुसऱ्या टप्प्यातील ११ जिल्हे व तिसऱ्या टप्प्यातील १२ जिल्हे या सर्व जिल्हयांमध्ये प्रकल्प समांतररित्या कार्यान्वित झालेला आहे.

...............

# इंटरनॅशनल फंड फॉर ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट (IFAD) समन्वयीत कृषि विकास प्रकल्प ( सीएआयएम )

शासन निर्णय क्र.:-बासप्र२००८/प्र.क्र.४८/२१स, दि.१३ ऑगस्ट,२००९.

इंटरनॅशनल फंड फॉर ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट (IFAD) या संस्थेच्या अर्थसहाय्याने राबविण्यात येत असलेल्या या प्रकल्पाची प्रकल्प किंमत रु. ५९३०० लाख आहे. या प्रकल्पामध्ये IFAD रु. २०४०० लाख बिनव्याजी कर्ज देणार असून प्रचलित योजनांच्या माध्यमातून राज्य शासनाचा हिस्सा रु. २०००० लाख आहे त्याशिवाय या प्रकल्पामध्ये सर रतन टाटा ट्रस्ट या संस्थेचा प्रामुख्याने सहभाग असून सदर ट्रस्ट प्रकल्पासाठी रु. ७८०० लाख अनुदान स्वरुपात देणार आहे; प्रकल्प किंमतीपैकी उर्वरित रक्कम विविध व्यापारी बँका, खाजगी कंपन्या आणि लाभार्थ्यांचा असणार आहे. प्रकल्पाचा कालावधी ८ वर्षे असून ६४ कृषि-आधारित end-to-end उप-प्रकल्प विकसीत करण्यात येणार असून त्याचा लाभ प्रामुख्याने विदर्भातील आत्महत्याग्रस्त ६ जिल्हातील शेतक-यांच्या कुटूंबियांना शाश्वत उत्पन्नाचे साधन म्हणून होणार आहे. या प्रकल्पाचे प्रमुख लाभार्थी हे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे कुटूंबिय, महिला कुटूंब प्रमुख असलेले कुटूंबिय, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतले शेतकरी असणार आहेत. या प्रकल्पांतर्गत प्रत्येक कृषि-आधारित end-to-end उप-प्रकल्पाकरीता खाजगी कंपन्यांच्या सकभागाद्वारे शाश्वत बाजार साखळी विकसीत करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे लाभार्थी शेतकरी आणि महिलांचे बचत गट स्थापण्यात येणार असून सदर गटाकरीता निर्णय घेणारे प्राधिकरण म्हणून CMRC या शिखर संस्थांची आवश्यकतेप्रमाणे स्थापना करुन समुदायांचा संस्थात्मक विकास करण्यात येणार आहे. सदर प्रकल्पामध्ये स्थापण्यात येणाऱ्या बचत गटांचे पुरेसे सक्षमीकरण करण्यात येणार असून त्यांना प्रशिक्षण आणि कौशल्य विकासाद्वारे त्यांना स्वत:च्या व्यवसायाची उत्तमपणे व्यवस्थापन करता येईल.

..............

## कृषि व्यापार विषयक पायाभूत विकास गुंतवणूक कार्यक्रम (ABIDIP)

शासन निर्णय क्र.:-बासप्र२००८/प्र.क्र.४६/२१स, दि.२९ऑक्टोबर,२०१०.

आशियायी विकास बँक सहाय्यीत या प्रकल्पामध्ये सध्याच्या मुल्य साखळयांच्या नजिक पायाभूत सुविधांच्या विकासाद्वारे राज्यातील प्रमुख नगदी पिकांकरीता कृषि मुल्य साखळयांची निर्मीती करणे आणि त्याकरीता खाजगी गुंतवणूक आकर्षित करुन सदर कृषि मुल्य साखळयांचे व्यवस्थापन खाजगी क्षेत्राद्वारे करणे आणि शेतक-यांची क्षमता बांधणी करणे हा या प्रकल्पाचा प्रमुख उद्देश आहे. सदर प्रकल्प सार्वजनिक - खाजगी भागिदारीतून उभारण्यात येणार आहे, सदर प्रकल्पांतर्गत खाजगी गुंतवणूकदारांमार्फत हब आणि स्पोक प्रतिमानावर आधारीत कृषि मुल्य साखळयांची निर्मिती करण्यात येणार आहे, सदर प्रत्येक ठिकाणी राज्य शासन जमीन उपलब्ध करुन देणार आहे, सदर प्रकल्पासाठी खाजगी गुंतवणूकदारांना प्रकल्प किंमतीच्या किमान ६०% गुंतवणूक करावी लागणार असून राज्य शासन उर्वरीत रक्कम कमाल ४०% मर्यादेपर्यंत अनुदानाच्या स्वरुपामध्ये देणार आहे. सदर प्रकल्प BOOT मॅाडेलच्या धर्तीवर राबविण्यात येणार असून निविदा प्रक्रियेदरम्यान जो गुंतवणूकदार कमीत कमी अनुदानाची मागणी करेल आणि ज्या गुंतवणूकदाराचे आर्थिक निविदा तांत्रिकदृष्टया सुयोग्य असेल त्या गुंतवणूकदाराची निविदा मान्य करण्यात येईल. खाजगी गुंतवणूकदारास कृषि मुल्य साखळीचा वापर २० वर्षापर्यंत करता येईल त्यानंतर संपूर्ण प्रकल्पाच्या जमीन व त्यावरील पायाभूत सुविधांसह राज्य शासनाच्या मालकीचा होईल. या प्रकल्पाकरीता राज्य शासनाचा हिस्सा रु.९४०० लाख असून आशियायी विकास बँकेचा हिस्सा रु.४०००० लाख आहे.

..................

# एकात्मिक वस्त्रोद्योग संकुल योजना

शासन निर्णय क्र.:-टेक्सपा२०११/प्र.क्र.९८/टेक्स४, दि.२५ मे २०१२.

वस्त्रोद्योग क्षेत्राचा एकात्मिक विकास करण्याच्या दृष्टीने एकात्मिक वस्त्रोद्योग संकुल योजना (Scheme for Integrated Textile Parks) ऑगस्ट, २००५ मध्ये केंद्र शासनाने जाहीर केली आहे. सदर योजनेच्या अंतर्गत सर्व प्रकारच्या वस्त्रोद्योग घटकांसाठी एका संकुलनामध्ये जागतिक दर्जाच्या मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात. त्यात प्रामुख्याने जमीन सामुदायिक सुविधा जशा की, संरक्षक भिंत, रस्ते, ड्रेनेज, पाणीपुरवठा, Captive Power Plant सह वीज पुरवठा, एप्ल्युएन्ट ट्रिटमेंट प्लान्ट, टेलिफोन लाईन्स, प्रयोगशाळा, डिझाइन सेंटर, ट्रेनिंग सेंटर, ट्रेड सेंटर, गोदामे, कच्च्या मालासाठी डेपो, पॅकेजिंग युनिट, पाळणाघरे,उपहारगृह, कामगारांसाठी वसतिगृह, कामगारांसाठी विश्रांतीगृह व करमणुक केंद्र इत्यादी बाबींचा समावेश आहे. ही योजना पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप ( पीपीपी ) वर आधारीत असून प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने मान्य केलेल्या व्यवसायिक एजन्सीची नियुक्ती करण्यात येते.

- केंद्र शासनाच्या सदर योजनेनुसार एकात्मिक वस्त्रोद्योग संकुल उभारण्यासाठीचे प्रस्ताव संबंधित प्रवर्तकांकडून केंद्र शासनास थेट मंजूरीसाठी सादर केले जातात. यासाठी राज्य शासनाच्या शिफारशीची अथवा मान्यतेची आवश्यकता नाही .
- सदर योजने अंतर्गत प्रकल्पाच्या एकूण किंमतीच्या ४०% किंवा रु.४० कोटी यापैकी जी रक्कम अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून चार हप्त्यात देण्यात येते कमी असेल तेवढे. या योजनेअंतर्गत राज्य शासनास प्रकल्प किंमतीच्या ९% किंवा रु.९ कोटी यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अर्थसहाय्य देण्याची मुभा आहे.
- केंद्र पुरस्कृत एकात्मिक वस्त्रोद्योग संकुल योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या व भविष्यात मंजूर होणाऱ्या एकात्मिक वस्त्रोद्योग संकुलांना प्रकल्प किंमतीच्या ९% किंवा रु. ९ कोटी यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अर्थसहाय्य मंजूर करण्याचा निर्णय राज्य शासनाने दि.२५ मे, २०१२ अन्वये घेतला आहे.
- सद्यस्थितीत १२ वस्त्रोद्योग संकुल राज्यात कार्यान्वित आहेत.

...............

# रोजगार मेळावे

१ )शासन निर्णय क्र.:-रोस्वरो-२००७/प्र.क्र.४१/रोस्वरो-१,दि.२९ जून,२००७.
२ )शासन निर्णय क्र.:-रोस्वरो-२००७/प्र.क्र.४१/रोस्वरो-१,दि.१३.०८.२००९.
३ )शासन निर्णय क्र.:- रोस्वरो-२००७/प्र.क्र.४१/रोस्वरो-१ दि.०४.०२.२०११

**योजनेचा उद्देश -** बेरोजगार उमेदवार व उद्योजक यांना एकत्र आणून बेरोजगार उमेदवारांना नोकरीच्या संधी उपलब्ध करुन देणे व उद्योजकांना/नियोक्त्यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार मनुष्यबळाचा पुरवठा करणे.

**योजनेची माहिती-**

अ) रोजगार शोधणारे बेरोजगार उमेदवार आणि कौशल्य संपादीत केलेले व परिश्रमाची तयारी असणारे उमेदवार शोधणारे उद्योजक/नियोक्ते यांना एकत्रित आणण्याच्या अनुषंगाने रोजगार मेळावे ही कल्पना पुढे आली.

ब) रोजगार मेळावे आयोजित करण्याचे काम रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामार्फत करण्यात येते. ज्यामध्ये रोजगार मेळाव्याची आखणी करणे, मेळाव्यासाठी रिक्त पदे उपलब्ध करणे, रिक्त पदांसाठी पात्र उमेदवार उपलब्ध करणे, उद्योजक व उमेदवारांची प्रत्यक्ष भेट घडवून देणे या कामाचा समावेश असतो.

क) जेथे रोजगार मेळावा आयोजित करण्यात येतो तेथे रोजगाराच्या/ नोकरीच्या शोधात असलेले बेरोजगार उमेदवार व नियोक्ते/ उद्योजक जे मनुष्यबळाच्या शोधात असतात ते रोजगार मेळाव्यास हजेरी लावतात व बेरोजगार उमेदवारांमधून त्यांच्या आवश्यकतेनुसार पात्र उमेदवाराची निवड करतात.

ड) रोजगार व स्वयंरोजगार शासन निर्णय,क्रमांक रोस्वरो-२००७/प्र.क्र.४१/ रोस्वरो१ दि.१३ऑगस्ट,२००९ अन्वये राज्यात सर्व जिल्हयात किमान चार तसेच विभागीय स्तरावर एक असे रोजगार मेळावे नियमितपणे आयोजित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

.................

# आदिवासी उमेदवारांसाठी सेवायोजन प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्रे

१) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. इएमपी/१०८४/७३०६/(७७७९)/सेयो-२, दि.११.१०.१९८४.
२) शासन निर्णय, क्र. इएमपी/१०८५/९५-९६/(८२०५)सेयो-२, दि.३०.०९.८५
३) शासन निर्णय, क्र. इएमपी-१४९१/१२१३/(२९६/९१)सेयो-२, दि.२०.०१.१९९४
४) शासन निर्णय, क्र. इएमपी-१४९१/(२२९/९१)सेयो-२, दि.१४.०१.१९९२
५) शासन निर्णय, क्र. इएमपी-१४९१/१२१३/(२९६/९१)सेयो-२, दि.२०.०१.१९९४
६) शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, क्रमांक-रोस्वरो-२००४/प्र.क्र.११९/रोस्वरो, दि. १६.०१.२००६.

आदिवासी उमेदवारांना स्पर्धा परीक्षेची माहिती देणे व त्यांची सदर परीक्षेसाठी तयार करुन घेणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

विविध शासकीय व निमशासकीय संस्थामध्ये आदिवासी उमेदवारांसाठी राखीव पदे असतात. स्पर्धात्मक परिक्षेद्वारे भरण्यात येणारी पदे उमेदवारांच्या पात्रते अभावी रिक्त राहतात. म्हणून अनुशेष भरुन काढण्याच्या उद्देशाने आदिवासी उमेदवारांचा विकास व उन्नती होवून त्यांची स्थिती सुधारण्याच्या उपक्रमानुसार शासन निर्णय, क्रमांक इएमपी/१०८४/७३०६/(७७७९) सेयो-२, दिनांक ११ ऑक्टोबर,१९८४ अन्वये रावेर, जिल्हा-जळगांव, अचलपूर, जिल्हा- अमरावती, कळवण, जिल्हा-नाशिक आदिवासी उमेदवारांसाठी सेवायोजन प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आली.

शासन निर्णय क्र.इएमपी-१०८५/९५-९६ /(८२०५)/सेयो-२, दिनांक ३०/९/८५ अन्वये देवरी, जिल्हा भंडारा, चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर , मंचर - जिल्हा पूणे व किनवट, जिल्हा-नांदेड येथे आदिवासी उमेदवारांसाठी सेवायोजन प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आली.

शासन निर्णय, क्रमांक इएमपी-१४९१/१२१३/(२९६/९१) सेयो-२ दिनांक २० जानेवारी,१९९४ अन्वये गडचिरोली, जिल्हा गडचिरोली येथे आदिवासी उमेदवारांसाठी सेवायोजन प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आले.

आदिवासी उमेदवारांची स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करुन घेण्यासाठी सदर केंद्रामार्फत साडेतीन महिन्यांचे एक याप्रमाणे दरवर्षी तीन प्रशिक्षण सत्रे चालविली जातात.

शासन निर्णय क्रमांक रोस्वरो-२००४/प्र.क्र.११९/रोस्वरो-१ दिनांक १६ जानेवारी,२००६ नुसार या योजनेतंर्गत डिसेंबर,२००५ पासून प्रशिक्षण काळात आदिवासी प्रशिक्षणार्थींना दरमहा रुपये १०००/- प्रमाणे विद्यावेतन दिले जाते व व्याख्यात्यांना दर ताशी रुपये १००/- प्रमाणे मानधन दिले जाते. तसेच प्रशिक्षणार्थ्यांना स्पर्धा परीक्षा तयारीसाठी आवश्यक असलेल्या ४ पुस्तकांचा संच मोफत देण्यात येतो.

प्रशिक्षण देण्यासाठी जवळच्या महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापकांना तासिका पध्दतीवर नियुक्त केले जाते. तसेच गरजेनुसार बँक, वित्तीय संस्था, मान्यवर सेवाभावी संस्था यातील अधिकारी पदाधिका-यांना व शासनाच्या तज्ञ अधिका-यांना मार्गदर्शनपर भाषणे देण्यासाठी पाचारण केले जाते. उमेदवारांना विविध रिक्त पदांची , स्पर्धा परीक्षांची माहिती वेळोवेळी पोस्टाने कळविली जाते. फॉर्म्स पाठविले जातात. प्रसंगानुसार खास प्रशिक्षण वर्ग आयोजिले जातात.

.............

## रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम योजना ( इ.पी.पी.) -

१) शासन निर्णय,शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. इएमपी/१०७४/पी-४, दि. ०३ डिसेंबर,१९७४.
२) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.इपीपी/१०८८/३५९/सेयो-१, दि. २१ मार्च,१९९५.

**योजनेचा उद्देश :-** सेवायोजन कार्यालयात (रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केद्रात ) नांव नोदविलेल्या सुशिक्षित उमेदवारांना त्यांचे कौशल्य व क्षमता वाढविण्यासाठी खाजगी उद्योग धंद्यामध्ये अथवा शासकीय उपक्रमांमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षण देणे.

**योजनेची माहिती:-**

अ) नोक-यांच्या जगात अनुभवा अभावी नोकरी नाही आणि नोकरी अभावी अनुभव नाही याचा विदारक अनुभव नोकरी इच्छुक उमेदवारांना पदोपदी येत असतो. त्यामुळे, नोकरी इच्छुक उमेदवारांना कामाचा अनुभव मिळावा या उद्देशाने "रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम योजना" सन १९७३-७४ पासून राबविण्यात येत आहे.

आ) या योजनेअंतर्गत सेवायोजन कार्यालयात नांव नोंदविलेल्या सुशिक्षित उमेदवारांना त्यांचे कौशल्य व क्षमता वाढविण्यासाठी खाजगी उद्योग धंद्यामध्ये अथवा शासकीय उपक्रमामध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणांनंतर प्रशिक्षणार्थींना नियमित नोकरी मिळण्याची क्षमता वाढते अथवा ते स्वयंरोजगार करु शकतात.

इ) सदर योजनेचा कालावधी सहा महिन्यांचा असून यासाठी पाठयवेतनाचे दर उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे दरमहा रु.१०० ते ४००/- रुपये प्रमाणे होते.

ई) सदर पाठयवेतनाचे दरामध्ये दिनांक २१ मार्च,१९९५ च्या शासन निर्णय क्र.इपीपी-१०८८/(३५९)/सेयो-१ अन्वये वाढ करुन ते दरमहा रु.३०० ते दरमहा रु.१०००/- असे केले आहे.

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | पाठयवेतनाचे सुधारीत मासिक दर |
|---|---|---|
| १ | शालांत परीक्षा उत्तीर्ण, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्रमाणपत्रधारक आणि वंशपरंपरेने स्वत:च्या व्यवसायाचे ज्ञान असलेले व हस्तशिल्पी ज्ञान अवगत असलेले कारागीर | रुपये.३००/- |
| २ | पदवीधर ( कला, शास्त्र आणि वाणिज्य) | रुपये ५००/- |
| ३ | अभियांत्रिकी ( तंत्रज्ञान , कृषि, पशु वैद्यकीय वास्तुशास्त्र, वैद्यकीय शास्त्र आणि व्यावसायिक अभ्यास क्रम यांचे पदविकाधारक) | रुपये ७००/- |
| ४ | कला, शास्त्र व वाणिज्य शाखेमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतलेले उमेदवार, कृषी, पशुवैद्यकीय , वैद्यकीय, दंत शल्य चिकित्सक, औषधनिर्मिती पदविधर आणि बी.ए.बी.एड.बी.ए.बी.कॉम किंवा यासारखे द्विपदवीधर किंवा पदव्युत्तर पदवीधर | रुपये ८००/- |
| ५ | अभियांत्रिकी, तंत्रज्ञान व वास्तुशास्त्र शाखेतील पदवीधर | रु.१०००/- |

उ) पाठयवेतनाची रक्कम संबंधित नियोक्ते प्रशिक्षणार्थींना देतात व नंतर सेवायोजन कार्यालये त्याची परतफेड नियोक्त्यांना करतात. या योजनेची माहिती असलेली मराठी व इंग्रजीतील पुस्तके नियोक्ते यांना पाठविली जातात व सहकार्याची विनंती केली जाते. सक्षम भेटीत पाठपुरावा केला जातो.

ऊ) या योजनेमुळे उमेदवारांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्राप्त होतो. उद्योजकांकडे रिक्त पदे निर्माण झाल्यावर या प्रशिक्षित उमेदवारांना नोकरीवर घेण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला जातो. काही कारणास्तव प्रशिक्षणानंतर नियमित स्वरुपाच्या नोकरीत उमेदवारास घेता आले नाही तरी मिळालेल्या प्रशिक्षणाच्या जोरावर उमेदवार अन्यत्र नोकरीस लागू शकतो.

...............

# ग्रंथालय सदृश्य अभ्यासिका सुरु करणे

शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग क्र. रोस्वरो-२००७/प्र.क्र.३०/रोस्वरो-१, दि.०३ जानेवारी, २००८.

रोजगाराच्या नवनवीन संधीबाबतची माहिती बेरोजगार उमेदवारांना विशेषत: ग्रामीण भागातील उमेदवारांना उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा उद्देश आहे.

**योजनेची माहिती-**

अ) रोजगारांच्या नवनवीन संधीबाबतची माहिती बेरोजगार उमेदवारांना उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात येणा-या बेरोजगारांना विविध व्यवसाय मार्गदर्शन साहित्य, स्पर्धा परिक्षांची माहिती देणारी मासिके, पुस्तके इ. उपलब्ध करुन देणे, अभ्यासिकेची व्यवस्था करणे व वेबसाईटद्वारे नवीन-नवीन संधीची व रोजगाराची माहिती उपलब्ध करुन देणेकरिता राज्यातील ४९ कार्यालयामध्ये ग्रंथालय सदृश्य अभ्यासिकेची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

आ) यामध्ये स्पर्धा परिक्षेसाठी उपयुक्त पुस्तके, मासिके, करिअर मार्गदर्शनावरील पुस्तके, वर्तमानपत्रे याची मोफत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

...............

# वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रम (Accelrated Irrigation Banefit Programme-AIBP)

केंद्र सरकारकडून वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रम (Accelrated Irrigation Banefit Programme) अंतर्गत १९९६-९७ पासून दरवर्षी राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांना केंद्रीय कर्ज / अर्थ सहाय्य प्राप्त होत आहे. राज्यातील प्रकल्पांस सन १९९६-९७ ते २००५-०६ पर्यंत केंद्रीय कर्ज सहाय्य आणि सन २००६-०७ पासून केंद्रीय सहाय्य अनुदानाच्या रुपात प्राप्त होत आहे. या कार्यक्रमाबाबतचा सविस्तर तपशील खालील प्रमाणे आहे :-

ज्या मोठया व मध्यम पाटबंधारे प्रकल्पांवर २ ते ४ वर्षाच्या कालावधीत सिंचन क्षमता निर्माण होऊ शकते, अशा प्रकल्पांसाठी वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रम अंतर्गत केंद्रीय अर्थ सहाय्य मंजूर करण्यात येते.

**१.०** केंद्र शासनाने ऑक्टोबर २०१३ मध्ये प्रकल्प ए.आय.बी.पी. अंतर्गत पात्र होण्यासाठी नवीन मार्गदर्शक सूचनानुसार खालील बाबी आवश्यक आहेत:-

१)मोठे व मध्यम प्रकल्पास योजना आयोगाचे गुंतवणुक प्रमाणपत्र प्राप्त असणे जरूरी आहे.

२)ज्या प्रकल्पावर त्यांच्या अंदाजपत्रकीय किमतीच्या ५०% पेक्षा जास्त खर्च झालेला असेल तसेच प्रकल्पाच्या मुख्य घटक बाबी कमीत कमी ५०% पूर्ण झाल्या असतील असे प्रकल्प कमी खर्चात जास्तीतजास्त सिंचन क्षमता निर्माण करतील व २ ते ४ वर्षात पूर्ण होऊ शकतील ते ए.आय.बी.पी. अंतर्गत समाविष्ठ करण्यात येतील.

३) ए.आय.बी.पी. अंतर्गत मोठे-मध्यम प्रकल्प पूर्ण झाल्यावर एकास एक तत्वानुसार नवीन प्रकल्प अंतर्भूत होईल. सदर अट अवर्षणप्रवण व आदिवासी क्षेत्रास लाभ देणा-या आणि पंतप्रधान पॅकेज अंतर्गत प्रकल्पास लागू नाही.

४) ए.आय.बी.पी. अंतर्गत नवीन प्रकल्प समाविष्ठ करताना प्रकल्पाची लाभ क्षेत्र विकासाची कामे, ए.आय.बी.पी. अंतर्गत होणाऱ्या घटक कामांसोबत करण्यात यावीत.

५) अवर्षण प्रवण व आदिवासी क्षेत्रास लाभ देणारे लघु पाटबंधारे प्रकल्पांचे लाभव्यय गुणोत्तर (B.C.Ratio) १ पेक्षा जास्त आणि विकास खर्च (Development Cost) रु.२.५० लक्ष प्रती हेक्टर च्या मर्यादेत असणे आवश्यक आहे.

६) (मोठे व मध्यम प्रकल्पास केंद्रिय सहाय्य २५ टक्के व अवर्षण प्रवण व आदिवासी क्षेत्रास लाभ देणा-या प्रकल्पास ७५टक्क्याने केंद्रिय सहाय्य प्राप्त होईल. लघु पाटबंधारे प्रकल्पास ७५ टक्क्याने केंद्रिय सहाय्य प्राप्त होईल.

७) केंद्रीय सहाय्याचे वितरण दोन टप्प्यात करण्यात येईल. पहिल्या टप्पात ,ज्या प्रकल्पाना केंद्रीय सहाय्य २५ टक्के ते ५०टक्के ने प्राप्त होत असेल त्यांना राज्य शासनाने त्यांच्या हिस्या तील ५० टक्के निधी वितरित केल्यानंतरच केंद्र शासनाच्या केंद्रिय सहाय्य मधील ९० टक्के निधी वितरण करण्यात येईल. ज्या प्रकल्पाना केंद्रीय सहाय्य ५० टक्के पेक्षा जादा टक्क्यांनी प्राप्त होत असेल त्यांना केंद्र शासनाच्या हिस्सातील ५०टक्के केंद्रीय सहाय्य राज्य शासनाने त्यांच्या हिस्या तील १०० टक्के निधी वितरीत केल्यानंतर करण्यात येईल . दुसऱ्या टप्प्यातील केंद्रीय सहाय्य केंद्र शासनाकडून पहिल्या टप्प्यात वितरीत झालेल्या निधी पैकी ५० टक्के निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच वितरीत केला जाईल.

२.० केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार,

२.१) XII व्या पंचवार्षिक योजनेमध्ये ए.आय.बी.पी. अंतर्गत सुरू असलेल्या प्रकल्पासाठी उर्वरीत किंमत ही मान्यता प्राप्त MoU प्रमाणे दि.०१.०४.२०१२ असलेल्या उर्वरित किंमतीस फ्रोझन करण्यात येईल. नवीन प्रकल्पांसाठी प्रकल्प ज्या वर्षात ए.आय.बी.पी. अंतर्गत समाविष्ठ करण्यात येईल व त्यावेळी असलेल्या किंमतीस फ्रोझन करण्यात येईल.

२.२) राज्य शासना कडून XII व्या पंचवार्षिक योजनेमधील मार्गदर्शक सूचना व मान्यता प्राप्त MoU प्रमाणे असलेल्या अटी व नियमांचे पालन केल्यास फ्रोझन केलेल्या किंमतीवर केंद्रीय अर्थसहाय्य प्राप्त करता येईल.

२.३) जे प्रकल्प विहीत कालावधी मध्ये पूर्ण होवू शकत नसतील त्या प्रकल्पांसाठी फ्रोझन किंमतीवर जास्तीस जास्त २०% वृध्दी ( Esclation ) धरता येईल. त्यासाठी समर्थनीय कारणे देण्यात यावी.

**राष्ट्रीय प्रकल्प :-**

राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित झालेले प्रकल्प विहित कालावधीत कालबध्द रितीने पूर्ण होण्यासाठी प्रकल्प किंमतीच्या ९० टक्के इतका निधी भारत सरकार अनुदान रुपात उपलब्ध करुन देईल.

**राष्ट्रीय प्रकल्प म्हणून समावेश करण्याची कार्यपध्दती :-**

१. राज्य शासनाकडून राष्ट्रीय प्रकल्प म्हणून अंतर्भाव होण्यासाठी नवीन प्रकल्पांचे राज्य शासनाकडून सादर होणाऱ्या विहित प्रपत्रातील प्रस्तावांना व्यय अग्रक्रम समिती/प्रकल्प निवेश मंडळाची मान्यता, तद्नंतर राष्ट्रीय प्रकल्पांची निवड व अंमलबजावणीसाठी विशेषत्वाने निर्माण केलेल्या उच्चाधिकार सुकाणू समितीच्या शिफारशीनुसार केंद्रीय मंत्रीमंडळाच्या मान्यतेने प्रकल्पाचे समावेशन होईल.

२. राज्य शासनाने विहित प्रपत्रातील प्रस्ताव केंद्रिय जल आयोगाच्या प्रादेशिक कार्यालयामार्फत सादर करावे व त्याची प्रत केंद्रीय जल आयोगाच्या दिल्ली येथील मुख्यालयास व केंद्रीय जल संसाधन मंत्रालयास पृष्ठांकित करावी.

३. राष्ट्रीय प्रकल्प म्हणून अंतर्भूत करावयाचे प्रकल्प हे, योजना आयोगाची गुंतवणूक विषयक मान्यतेसह, वेग वर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतून निधी उपलब्ध करुन देण्यासाठी विहित करण्यात आलेल्या अटी/शर्तींची पूर्तता करणारे असावेत.

४. केवळ मोठे पाटबंधारे/बहु उद्देशिय प्रकल्पांचा राष्ट्रीय प्रकल्प म्हणून समावेश करण्यांत येईल.

५. राज्य शासनाकडून राष्ट्रीय प्रकल्प म्हणून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर केंद्रिय जल संसाधन मंत्रालयातील अधिकाऱ्यांचे पथक प्रकल्प स्थळाला भेट देवून प्रकल्पाची सद्य:स्थितीचा अंदाज घेवून प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम निश्चित करेल.

**राष्ट्रीय प्रकल्प निवडीचे निकष:-**

१. ज्या आंतरराष्ट्रीय प्रकल्पांच्या पाण्याचा वापर लवादाने अनुबंधित करण्यात आलेला आहे अशा प्रकल्पांचे नियोजन व सदर प्रकल्प पूर्ण करणे, हे राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे.

२. प्रकल्प खर्चाचा राज्यांचा हिस्सा, पुनर्वसन, विद्युत निर्मिती अशा कारणामुंळे प्रदीर्घ काळ प्रलंबित राहिलेले आंतरराज्यिय प्रकल्प, तसेच नदी जोड प्रकल्प.

३. २,००,००० हेक्टर पेक्षा जास्त अतिरिक्त सिंचन क्षमतेचे आंतरराज्यिय प्रकल्प, ज्यात पाणी वाटपासंदर्भात कोणतेही मतभेद नाहीत व पाण्याची उपलब्धता प्रस्थापित झालेली आहे.

**राष्ट्रीय प्रकल्पांना निधी पुरवठा :-**

१. प्रकल्प अधिकाऱ्यांनी अंतर्गत लेखा परीक्षण करुन प्रकल्पावर प्रत्यक्ष झालेला खर्च आणि प्रकल्पासाठी निधीची आवश्यकता याबाबत अंदाज करुन त्यास राज्य शासनाने प्रमाणित करावे. राष्ट्रीय प्रकल्प म्हणून समावेश झाल्याच्या दिनांकापासून सदर प्रकल्पांना निधी पुरवठा करण्याची केंद्र शासनाची बांधिलकी राहील.

२. वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्वांनुसारच राष्ट्रीय प्रकल्पांना केंद्रीय अनुदान उपलब्ध करुन देण्यांत येईल.

३. राष्ट्रीय प्रकल्पांसाठी प्रकल्प किंमतीच्या ९० टक्के अनुदान देण्यात येईल. पेय जलासाठी पारेषण व वितरण प्रणाली वरील खर्च याचा त्यात समावेश असणार नाही.

४. वार्षिक केंद्रीय सहाय्याचे वितरण दोन टप्प्यात, अनुक्रमे ९० टक्के व १० टक्के अशा प्रकारे करण्यात येईल. पहिल्या टप्प्यात वितरीत करण्यात आलेले सहाय्य अधिक राज्याचा हिस्सा, याच्या किमान ८० टक्के निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र व भौतिक साध्याचा तपशील सादर केल्यानंतरच दुसऱ्या टप्प्यातील केंद्रीय सहाय्य वितरीत केले जाईल.

५. राष्ट्रीय प्रकल्पाच्या आस्थापना व प्रशासकीय खर्च हा संपूर्णत: राज्य शासनाने करावयाचा आहे.

६. राष्ट्रीय प्रकल्प म्हणून अंतर्भूत झालेल्या प्रकल्पांचे सुधारीत अंदाजपत्रक दर तीन वर्षांनी योजना आयोगाकडून मंजूर करुन घेण्यांत यावेत, अन्यथा केंद्रीय जल संसाधन मंत्रालयाकडून निधीचा पुरवठा बंद केला जाऊ शकेल.

७. वितरीत केलेले केंद्रीय सहाय्य राज्य शासनाच्या हिश्श्यासहित प्रकल्प अधिकाऱ्यांना १५ दिवसाच्या आत वितरीत करण्याची जबाबदारी राज्य शासनाची राहील.

८. खर्चाचा लेखा परिक्षीत करण्यात आलेला ताळेबंद राज्य शासनाने केंद्रीय सहाय्य वितरीत झाल्याच्या १८ महिन्यांच्या आत सादर करणे आवश्यक राहील.

**राष्ट्रीय प्रकल्प पूर्ण करण्यासाठीचे नियोजन :-**

१. राज्य शासनाने सादर केलेल्या मूळ प्रस्तावात वर्षवार आर्थिक व भौतिक कार्यक्रम सादर करावयाचा आहे.

२. केंद्रीय जल आयोग प्रकल्प पूर्णतेसाठी विहित केलेल्या कार्यक्रमाची सुसाध्यता तपासून पाहील व त्यानुसार प्रकल्प पूर्ण करण्याचा कार्यक्रम अंतिम राहील.

३. प्रकल्प विहित कालावधीत पूर्ण होण्यासाठी राज्य शासनाने समुचित पावले उचलावीत. त्यात टर्न की किंवा फिक्स्ड प्राईस्ड कॉन्ट्रक्टस/ फिक्स्ड टाईम कॉन्ट्रक्टस चा अवलंब करावा. कामाचे कंत्राट देतांना कामाचे अशा रितीने पॅकेज स्वरुपात वाटप करावे की जेणे करुन एका पॅकेज मुळे दुसऱ्या पॅकेजच्या कामाच्या प्रगतीवर विपरीत परिणाम होणार नाही.

४. राज्य शासनाने कंत्राटे निश्चित करताना कामे विहित कालावधीत पूर्ण होण्याच्यादृष्टीने प्रोत्साहानपर तरतुदी त्याचप्रमाणे विहित कालावधीत कामे पूर्ण न झाल्यास कठोर दंडात्मक तरतुदींचा कंत्राट करारात अंतर्भाव करावा.

५. लाभक्षेत्र विकास कार्यक्रम प्रकल्पाच्या अंमलबजावणी बरोबरच एकसमयावच्छेदेकरुन राबविण्यांत यावा.

६. प्रकल्पाच्या लाभ क्षेत्राचे भुमी-अभिलेख अद्ययावत करण्यात यावे. उदर निर्वाहाच्या साधनांचे सर्वेक्षण करण्यांत यावे आणि कृषि उत्पादनाच्या बाजारातील विक्रीसाठी संशोधन व विकास कार्यक्रम राबवावेत व पूर्व आखणी करण्यात यावी.

७. सिंचनाचा लाभ मिळण्यापूर्वी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना माती परीक्षण व जमिनीच्या प्रतवारी बाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

**राष्ट्रीय प्रकल्पांचे संनियंत्रण :-**

१. राष्ट्रीय प्रकल्पांच्या प्रगतीबाबत केंद्रीय जल आयोग व केंद्रीय जल संसाधन मंत्रालयाकडून बारकाईने लक्ष ठेवण्यात येईल. त्यासाठी जी.आय.एस. व एम.आय.एस. पध्दतीचा वापर करण्यात येईल.

२. राज्य शासनातील कृषि विभागाबरोबर समन्वय साधण्यात यावा. जेणे करुन पिक रचनेबाबत तसेच कृषि साधन (Agricultural Equipments) लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात यावेत.

३. सिंचन क्षमता निर्मितीच्या उद्दिष्टांची साध्यता स्वतंत्र अभिकरणामार्फत तसेच दूर संवेदन तंत्राचा वापर करुन तपासण्यात यावी.

४. राज्य शासन केंद्रिय जल आयोग व केंद्रिय जल संसाधन मंत्रालयाला भौतिक व आर्थिक त्रैमासिक अहवाल सादर करेल.

५. गुण नियंत्रणाची कामे स्वतंत्र अभिकरणामार्फत करण्यात यावीत. तसेच प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रात गुण नियंत्रणासाठी पुरेशा प्रयोगशाळा उपलब्ध असाव्यात. गुण नियंत्रणाची कामे भारतीय मानक ब्युरो ने विहित केलेल्या मापदंडानुसार करण्यात यावी.

...............

# जलस्त्रोतांची दुरुस्ती, नुतनीकरण व पुनर्स्थापना ( RRR)

(१) जलस्त्रोतांची दुरुस्ती नुतनीकरण व पुर्नस्थापना ही केंद्र सहाय्यित योजना ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात देशभरात राबविण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला. केंद्रीय जल संसाधन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी दि. २ मार्च २००९ रोजी तशा आशयाचे आदेश निर्गमित केले. त्या आदेशामध्ये योजनेचे प्रयोजन, निधी उभारणी ढाचा, अंमलबजावणीच्या पध्दतीची स्थूल रुपरेषा इ. बाबत नमूद केलेले आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने जुलै २००९ मध्ये मार्गदर्शक तत्वे प्रस्तूत केली आहेत. १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात दुरुस्ती नुतनीकरण व पुर्नस्थापना या योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने ऑक्टोबर २०१३ मध्ये सुधारित मार्गदर्शक तत्वे प्रस्तूत केली आहेत.

(२) RRR या योजनेची ठळक तत्वे :-

२.१) ज्या जलस्त्रोतांची लागवडीयोग्य क्षेत्राच्या पुर्नस्थापनेचे काम एकात्मिक पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कार्यक्रम (IWMP) अंतर्गत चालु आहे असेच जलस्त्रोत या योजनेतंर्गत घेण्यात यावेत.

२.२) वाळवंट विकास कार्यक्रम (DDP) / अवर्षणप्रवण/आदिवासी/नक्षलबाधीत क्षेत्रासाठी निधी उभारणी ढाचा ९०:१० (केंद्र : राज्य) तर अन्य क्षेत्रासाठी २५:७५ (केंद्र : राज्य) असा आहे.

२.३) योजनेच्या अमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय अंमलबजावणी समिती (DLIA) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करुन संनियंत्रण तिच्यामार्फत करण्यात येईल.

२.४) राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती (TAC) स्थापन करुन तिच्यामार्फत योजनेच्या तपशीलवार प्रकल्प अहवालाला (DPR) मंजुरी घ्यावी लागेल.

२.५) या योजनेतंर्गत हाती घेतलेली कामे हे दोन वित्तीय वर्षात पूर्ण होणे आवश्यक आहे.

२.६) ग्रामीण जलस्त्रोतांसाठी तलावातील पाण्याचे व्याप्तीक्षेत्र किमान ५ हेक्टर असणे आवश्यक आहे.

२.७) शहरी जलस्त्रोतांसाठी तलावातील पाण्याचे व्याप्तीक्षेत्र २ हेक्टर ते १० हेक्टर असणे आवश्यक आहे

२.८) प्रकल्पाचे नियोजीत लाभापैकी (Targeted Benefit )कमीत कमी एका लाभाचा समावेश अंदाजपत्रकात असणे आवश्यक आहे. उदा. अतिरिक्त सिंचन निर्मिती करणे, कृषी उत्पादन, फळ उत्पादन , मत्स्य उत्पादन इत्यादी मध्ये वाढ, भुर्गभातील पाणी पातळीत वाढ, कार्यक्षम पाणी वापर, पिण्याच्या पाणीसाठयात वाढ करणे, पाण्याची गुणवत्ता सुधारणे, रानटी झुडपे उपटून टाकणे, पर्यटन व संस्कृतीस वाव देणे.

(३) महाराष्ट्रात असलेले तलाव/बंधारे ३ विभागांच्या कक्षेत येतात :-

१) लागवडीलायक क्षेत्र २५० हेक्टर पेक्षा अधिक असल्यास- जलसंपदा विभाग,

२) लागवडीलायक क्षेत्र १०१ ते २५० हेक्टर दरम्यान असल्यास- जलसंधारण विभाग,

३) लागवडीलायक क्षेत्र १०० हेक्टर पर्यंत असल्यास- ग्राम विकास विभाग.

(४) राज्यस्तरीय समन्वय अभिकरण (Nodal Agency):- सदर योजनेसाठी जल व भूमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद यांना राज्यस्तरीय समन्वय अभिकरण (Nodal Agency) म्हणून RRR २०१३/(५५६/२०१३)/सिंव्य(कामे), दिनांक ७/८/२०१३ च्या पत्रान्वये नेमण्यात आले आहे. विभागाने राज्यातील प्रस्तावांच्या मान्यतेसाठी तांत्रिक सल्लागार समितीची स्थापना शा.नि. आर आर आर २०१३ /(५२०/०९)/ सिंव्य(कामे), दि.५.११.२००९ च्या शासन निर्णयाद्वारे केली आहे. केंद्रीय जलआयोग व केंद्रीय भूजल मंडळ या केंद्र शासनाच्या कार्यालयांचे प्रतिनिधी सदर समितीमध्ये सदस्य आहेत.

(५) जिल्हास्तरीय अंमलबजावणी व संनियंत्रण समिती :-

संबंधित सर्व जिल्हयांमध्ये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अंमलबजावणी व संनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आली आहे.

..................

# खारभूमी विकास योजना

खारभूमी विकास योजनेमध्ये समुद्रकिनारी किंवा खाडीकिनारी मातीचा बांध घालुन भरतीचे पाणी उथळ जमिनीवर पसरण्यास प्रतिबंध केला जातो त्यामुळे शेतीचे समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून संरक्षण होते. बांधामध्ये नाल्यावर उघाडया ठेवून त्यातुन पावसाचे पाणी समुद्राकडे जाऊ देण्यास वाट करुन दिली जाते. मात्र समुद्राकडून येणारे खारे पाणी शेतजमीनीत येवू नये यासाठी अशा उघाडयांना एकतर्फी झडपा बसविल्या जातात.

खारभूमी विकासाची कामे पार पाडण्यासाठी शासनाने मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई यांचे अधिनस्त खारभूमी विकास मंडळ, ठाणे व त्या अंतर्गत ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पाच जिल्हयासाठी एकूण चार विभागीय कार्यालय व आवश्यक उपविभागीय कार्यालये स्थापन केली आहेत.

कोकणात ज्या ठिकाणी समुद्रकिनारी किंवा खाडी किनारी खारबंधारे बांधण्याची आवश्यकता आहे, अशा सर्व ठिकाणी पहाणी करण्यात आली व शासनामार्फत खारभूमी विकास योजनांचा बृहत आराखडा सन १९८१-८२ मध्ये तयार करुन कोकणातील ५७५ खारभूमी विकास योजनांव्दारे ४९१२० हेक्टर क्षेत्र पुन:प्रापित (Reclaim) करण्याचे नियोजन केले. या सर्व योजनांना केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाकडून किनारा नियमन क्षेत्र अधिसूचना १९९१ मधील निर्बंधातून सूट देण्यात आली आहे. यापैकी ३९५ योजना पूर्ण करण्यात आल्या असून त्याव्दारे ४०७९३ हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आणले आहे .

**खारभूमी विकास योजनेची उद्दिष्टे** :-

१) समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून शेतजमिनीचे संरक्षण करणे.
२) शेतीलायक जमिनीत क्षारांच्या प्रवेशास अटकाव करणे. (Prevention of Salinity Ingress)
३) गोडया पाण्याचे साठे पुर्नभरीत करणे. (Fresh Water Recharges)
४) चक्रीवादळ, त्सुनामी इत्यादी सारख्या संकटांमध्ये योजनेच्या लाभक्षेत्रातील लाभार्थी तसेच पिकाखालील क्षेत्र व इतर मालमत्ता यांचे संरक्षण करणे.

अ) खारभूमी विकास योजना आर्थिक मापदंड :-

शासन निर्णय क्रमांक खाभूयो २००९/प्र.क्र.(२२२/२००९), खारभूमी, दि.६.०८.२००९ अन्वये आर्थिक मापदंड मंजूर केले आहेत.

ब) महाराष्ट्र खार जमिन विकास अधिनियम, १९७९ हा १९ फेब्रुवारी, १९७९ रोजी प्रख्यापित केला आहे.

..................

# दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीस अर्थसहाय्य मंजूर करणे

शासन निर्णय क्र. मचिअ-२०१२/प्र.क्र.१४१/सां.का-१, दि.३० ऑक्टोबर, २०१३

योजनेचा उद्देश व माहिती:-

दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीस प्रोत्साहन देण्यासाठीची सदर अर्थसहाय्य योजना आहे. या योजनेंतर्गत चित्रपटाची पटकथा, दिग्दर्शन, अभिनय इ. बाबी व शासन निर्णयात नमूद इतर निकषांना अनुलक्षून चित्रपट परिक्षण समितीमार्फत चित्रपटांचे परिक्षण करण्यात येते. चित्रपट परिक्षण समितीने केलेल्या शिफारशीं लक्षात घेवून “अ” दर्जा प्राप्त चित्रपटांस रु.४०.०० लक्ष व “ब” दर्जा प्राप्त चित्रपटांस रु.३०.०० लक्ष किंवा चित्रपट निर्मितीचा प्रत्यक्ष खर्च यापैकी जी कमी असेल ती रक्कम अर्थसहाय्य म्हणून देण्यात येते.

………….

# महाराष्ट्र वैभव-राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजना

शासन निर्णय क्र. मवैयो-२००५/प्र.क्र.१०७/सां.का-३, दि. २ फेब्रुवारी, २००७
शुध्दीपत्रक क्र. मवैयो-२००७/प्र.क्र.१०७/ सां.का-३, दि. २० जुलै, २०१४

महाराष्ट्र राज्याला पुरातत्वीय अवशेष, स्मारके, हस्तलिखिते, पारंपारिक कला व इतर सांस्कृतिक कलांच्या स्वरुपात समृध्द असा वारसा आहे. आपल्या भूतकाळाच्या वैभवाचे प्रतिक असलेल्या स्मारकांचे जतन व पुनरुज्जीवन करुन सध्याच्या व पुढच्या पिढीला आपली संस्कृती आणि परंपरेची ओळख करुन देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

महाराष्ट्र प्राचीन स्मारके, पुराण वस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम- १९६० च्या १५ व्या कलमामध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे:-

संचालकास, संरक्षित स्मारक सुस्थितीत राखण्यासाठी स्वेच्छेने दिलेल्या देणग्या स्वेच्छेने स्विकारण्याचा अधिकार आहे आणि अशा प्रकारे त्यांच्याकडे आलेल्या कोणत्याही निधीची दिलेली व्यवस्था लावण्याबाबत व तो कामी लावण्याबाबत आदेश देण्याचा अधिकार आहे. परंतू या कलमान्वये दिलेली कोणतीही देणगी ती ज्या कारणासाठी देण्यात आली होती त्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी तिचा उपयोग करता कामा नये.

वरील तरतूद जनतेसमोर एखाद्या योजनेच्या स्वरुपात सादर केल्यास स्मारकाच्या जतन/ दुरुस्ती कार्याला जनतेचा मोठा हातभार लागेल ही बाब विचारात घेवून पुरातत्व विभागांतर्गत राज्यात उपलब्ध असलेल्या विविध स्वरुपाच्या उदंड वारशाचे जतन करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र वैभव राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजना सुरू करण्यात आली आहे.

**योजनेची वैशिष्टये:**

अ) या योजनेनुसार कोणत्याही संस्थेला, या विषयाचा अभ्यास असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला व संघटनेला एखाद्या स्मारकाचे संगोपन करण्यासाठी त्याचे पालकत्व स्वीकारुन त्या पालकत्व कालावधीत त्या स्मारकाच्या जतन, दुरुस्ती व देखभालीचा सर्व खर्च सोसून सांस्कृतिक संवर्धनाच्या कार्याला हातभार लावता येईल.

ब) ही संपूर्ण योजना आता महाराष्ट्र प्राचीन स्मारके पुराणवस्तुशास्त्र विषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६० या अधिनियमातील कलम १५ मधील तरतुदीअन्वये तयार करण्यात आली आहे आणि तिची अंमलबजावणी याच अधिनियमाच्या ३० व्या कलमातील तरतुदीप्रमाणे नियुक्त केलेल्या सल्लागार मंडळाचा सल्ला विचारात घेवून संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये यांचेमार्फत करण्यात येईल.

क) या योजनेत सहभागी होण्यासाठी राज्य संरक्षित स्मारकांच्या यादीमधून संगोपनार्थ किंवा पालकत्व स्विकारण्याकरीता स्मारकाची निवड करता येईल व या स्मारकाच्या संगोपनार्थ पाच वर्षाकरीता त्याचे पालकत्व घेता येईल. या पालकत्व कालावधीत या स्मारकाच्या जतन दुरुस्तीची, सुशोभिकरणाची व देखभालीची संपूर्ण जबाबदारी पालकत्व घेणाऱ्या संस्थेवर /व्यक्तीवर राहील असे

पालकत्व घेताना पालकत्व घेणाऱ्या संस्थेला / व्यक्तीला संचालक, पुरात्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय यांच्याशी म्हणजेच पर्यायाने शासनाशी करार करावा लागेल व या करारातील शर्ती, स्मारकाचे पालकत्व घेणाऱ्यांवर बंधनकारक राहतील.

ड) पुरातत्व विभागांतर्गत राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजनेकरीता नियुक्त केलेल्या सल्लागार मंडळाच्या सल्ल्यानुसार पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय किंवा या संचालनालयाने /सल्लागार मंडळाने नियुक्त केलेली पालक व्यक्ती/ पालक संस्था ही अशा प्रकारे पालकत्व घेतलेल्या स्मारकाच्या जतन दुरुस्तीची कामे करतील. स्मारकाची जतन, देखभाल/ दुरुस्ती, सुशोभिकरण इत्यादी पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाने सुचविल्याप्रमाणे व संचालनालयाच्या देखरेखीखालीच करावी लागेल.

ई) कामे जलद गतीने व्हावीत यासाठी पर्यवेक्षण करण्यासाठी सल्लागार मंडळाने नियुक्त केलेली एक पर्यवेक्षण समिती असेल. या समितीत ज्येष्ठ शासकीय अधिकारी, खाजगी क्षेत्रातील, अशासकीय संघटनांमधील आणि प्रत्यक्ष काम करणाऱ्या व्यक्ती / संस्थेचे प्रतिनिधी असतील.

फ) पालकत्व कालावधीत कराराच्या अटी व शर्तीनुसार करण्यात येणाऱ्या कामाच्या प्रगतीचा / कार्यवाहीचा नियतकालीक आढावा पर्यवेक्षण समिती आणि सल्लागार मंडळाकडून घेण्यात येईल.

ग) महाराष्ट्र स्मारक संगोपने योजनेद्वारे पुरातत्व संचालनालय, महाराष्ट्रातील सरंक्षित स्मारकांच्या जतनदुरुस्तीचे प्रकल्प राबविण्यासाठी पुढाकार घेवून अशा प्रकल्पांची अंमलबजावणी करेल. ही कामे स्मारक दत्तक योजनेला मिळालेल्या निधीमधून करण्यात येतील.

**स्मारकाच्या संगोपनार्थ स्मारकाचे पालकत्व घेणाऱ्यांची कर्तव्ये व कार्य :**

अ) या योजनेअंतर्गत स्मारकाचे पालकत्व देण्यात आलेले असले तरी ते तात्पुरत्या स्वरुपात आणि करार कालावधीपुरते मर्यादित राहील. मात्र मूळ मालकी शासनाचीच राहील.

ब) स्मारकाची स्वच्छता व निगा राखणे व देखभाल करणे ही जबाबदारी पूर्णत: स्मारकाचे पालकत्व घेणाऱ्याची असेल. ही जबाबदारी कशा तऱ्हेने पार पाडावी याबाबतचे संचालनालयाचे निकष पालकत्व घेणाऱ्या संस्थेस / व्यक्तीस बंधनकारक राहतील.

क) पर्यटकांसाठी वाहनतळ, प्रसाधनगृहे, संपर्क यंत्रणेच्या सुविधा प्रकरणे ही जबाबदारी पालकत्व घेणाऱ्यांवर राहील. अशा सुविधा पुरवतांना त्याची योजना व वाहनतळ, प्रसाधनगृहे इत्यादीची नेमकी स्थाने यांचा नकाशा संचालनालयास सादर करुन त्यास संचालनालयाची मान्यता घ्यावी लागेल.

ड) प्रकाशध्वनी कार्यक्रम व तत्सम अन्य कार्यक्रम करणे, दुर्मिळ दस्तऐवजांचे प्रदर्शन भरवणे आणि पर्यटकांसाठी मार्गदर्शकांची नियुक्ती करणे ही कामे पालकत्व घेणाऱ्या संस्था / व्यक्तींनी करणे अपेक्षित आहे. मात्र त्याबाबत संचालक, पुरातत्व विभाग यांची आणि शासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. तसेच त्याबाबतचा संपूर्ण खर्च पालकत्व घेतलेल्या व्यक्ती / संस्थांना करावा लागेल.

इ) स्मारकाचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी खाजगी सुरक्षा रक्षक नेमणे ही जबाबदारी पालकत्व घेणाऱ्या व्यक्ती, संस्थांची राहील.

उ) स्मारकाच्या लाईट, पाणी इत्यादीची देयके पालकत्व घेणाऱ्या व्यक्ती, संस्थांना अदा करावी लागतील.

ग) स्मारकाची जतन दुरुस्ती योजनेच्या वैशिष्ट मधील (ड) अन्वये करणे ही जबाबदारी पालकत्व घेतलेल्या व्यक्ती / संस्थांची राहील.

**पुरातत्व विभागांतर्गत राज्य संरक्षित स्मारक संगोपनार्थ स्मारकाचे पालकत्व घेणाऱ्यास मिळणारे लाभ:-**

अ) पुरातत्व विभागांतर्गत राज्य संरक्षित स्मारक संगोपनार्थ योजनांतर्गत स्मारकाचे पालकत्व घेणाऱ्या संस्थेला / व्यक्तीला हे स्मारक आपल्या उद्योगाच्या जाहिरातीकरीता प्रतीकचिन्ह म्हणून वारण्याचा अधिकार राहील.

ब) त्याचप्रमाणे स्मारकाचे पालकत्व घेणाऱ्या संस्थेला / व्यक्तीला तिचा या जतन कामातील सहभाग विशद करणारा फलक स्मारकात किंवा स्मारकाच्या आवारात, स्मारकाच्या मूळ ठेवणीशी विसंगत होणार नाही अशा प्रकारे बसविता येईल. मात्र फलक लावावयाच्या जागेला व त्यातील मसुदयाला संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय यांची मान्यता घ्यावी लागेल. तसेच असा फलक हा पालकत्व कालावधीसाठी असेल.

क) पालकत्व कालावधीत या स्मारकाचे छायाचित्रण व चित्रीकरण करण्याची व या छायाचित्रांचा कॅलेंडर, डायऱ्या इ. प्रकाशनांमध्ये उपयोग करण्याचा पूर्ण अधिकार राहील.

इ) स्मारकाचे पालकत्व घेणाऱ्या संस्थेला / व्यक्तीला पालकत्व घेणाऱ्या व्यक्ती / संस्थांना शासनाच्या संमत्तीने ठरविलेले किमान प्रवेश शुल्क लावून त्या वास्तुच्या देखभालीचा खर्च वसूल करता येईल. प्रवेश शुल्काची रक्कम ठरविणे, त्याची वसुली करणे, याचा हिशोब ठेवणे व विहित मुदतीच्या आत हिशेब शासनास सादर करणे इत्यादी बाबी शासनाच्या सल्लयाने ठरविण्यात याव्यात.

...............

# वृध्द कलावंत मानधन योजना

शासन निर्णय क्र.वृकमा-२०१२/प्र.क्र.११७/सां.का-४, दि.७.२.२०१४

सदर योजना सन १९५४-५५ पासून राबविण्यात येत आहे. पूर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित करुन सर्वसमावेशक सुधारीत नियमावली दि.७ फेब्रुवारी, २०१४ रोजी तयार करण्यात आली आहे.

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१) वृध्द साहित्यिक / कलावंत यांनी जिल्हास्तरावर समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद अथवा तालुका स्तरावर गट विकास अधिकारी यांच्याकडे या योजनेअंतर्गत मानधन मिळण्यासाठी अर्ज करणे आवश्यक आहे.

२) प्राप्त अर्जांची जिल्हा परिषदेमार्फत खालील निकषांच्या आधारे छाननी करण्यात येईल.

अ) साहित्य व कला या क्षेत्रात ज्यांनी मोलाची भर घातली आहे अशी व्यक्ती.

आ) कला आणि वाड्:मय क्षेत्रात ज्यांनी किमान १५ ते २० वर्षे इतक्या प्रदीर्घ काळासाठी महत्वपूर्ण कामगिरी केली आहे अशा व्यक्ती,

इ) ज्या स्त्री/ पुरुष कलाकालारांचे व साहित्यिकांचे वय ५० वर्षापेक्षा जास्त आहे, अशा व्यक्ती.

ई) जे साहित्यिक व कलावंत अर्धांगवायू, क्षय, कर्करोग, कुष्ठरोग या रोगांनी आजारी असतील, तसेच ज्यांना ४०% पेक्षा जास्त शारिरीक व्यंग असेल किंवा अपघाताने ४०% पेक्षा जास्त अपंगत्व आले असेल व त्यामुळे ते स्वत:चा व्यवसाय करु शकत नसतील, असे साहित्यिक व कलावंत यांच्यासाठी वयाची अट शिथील करण्यात येईल.

उ) वयाने वडील असणाऱ्या व विधवा / परित्यक्त्या वृध्द साहित्यिक व कलावंत यांना मानधन देण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल.

ऊ) ज्या साहित्यिक व कलावंतांचे सर्व मार्गाने मिळून वार्षिक उत्पन्न रु.४८,०००/- पेक्षा जास्त नाही.

३) छाननीअंती योजनेच्या निकषानुसार पात्र ठरणारे अर्ज जिल्हास्तरीय निवड समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येतील.

४) जिल्हास्तरीय निवड समिती पात्र अर्जातून प्रतिवर्षी इष्टांकाच्या मर्यादेत ६० लाभार्थ्यांची मानधनासाठी निवड करु शकेल. निवड झालेल्या लाभार्थ्यांना तहहयात मानधन अदा करण्यात येईल.

५) निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांना शासन निर्णय क्र. वृकमा-२०१३/प्र.क्र.४०/सां.का-४, दि.२२.८.२०१४ अन्वये सुधारीत दराने खालील प्रमाणे मानधन अदा करण्यात येते.

| क्र. | कलावंताचे क्षेत्र | वर्गीकरण | मानधनाची रक्कम प्रतिमाह रु | प्रतिवर्ष रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | देशपातळीवर कलेचे सादरीकरण | अ वर्ग | २१००/- | २५,२००/- |
| २ | राज्य स्तरावर कलेचे सादरीकरण | ब वर्ग | १८००/- | २१,६००/- |
| ३ | स्थानिक स्तरावर कलेचे सादरीकरण | क वर्ग | १५००/- | १८,०००/- |

६) लाभार्थ्यांच्या निधनानंतर त्यांच्या विधवा पत्नी/ विधूर पतीस हयात मानधन मिळेल.

योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारी यंत्रणा :-

संबंधित जिल्हा परिषदेचे अपर मुख्य कार्यकारी अधिकारी व समाज कल्याण अधिकारी.

...............

# पर्यटन विकासासाठी मूलभूत सुविधा पुरविणे - प्रादेशिक पर्यटन विकास योजना

शासन निर्णय क्र. टिडीएस-२०१०/८/प्र.क्र.४६३/पर्यटन, दि. ४ नोव्हेंबर, २०१०

योजनेच्या लाभाचे स्वरुप राज्यातील पर्यटन स्थळांचा पर्यटनदृष्टया विकास होण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने या योजनेंतर्गत निधी उपलब्ध करुन दिला जातो. उदा.रिसॉर्टस्, पर्यटन स्थळाकडे जाणारे जोड रस्ते, उद्याने,वस्तुसंग्रहालय,विक्री केंद्र, क्रीडा-सुविधा,रेस्टॉरंट बांधकाम,स्वच्छतागृहे, वाहनतळ, दिशादर्शक फलक,संरक्षक भिंत,पर्यकांसाठी पाणी पुरवठा,विद्युतीकरण अन्य सोई-सुविधा इ.

**योजनेसंदर्भातील अर्ज/प्रस्ताव कोणत्या अधिका-याकडे सादर करावयाचे त्या अधिका-याचे पदनाम अथवा योजना राबवणारी यंत्रणा:-**

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीने याबाबतचा प्रस्ताव तयार करुन शासनास सादर केल्यानंतर तो मा.मंत्री,पर्यटन यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या राज्यस्तरीय पर्यटन विकास समिती पुढे निधी मंजूरीकरिता ठेवण्यात येतो,समितीच्या मंजूरी नंतर निधी जिल्हाधिका-यामार्फत संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणेला उपलब्ध करुन दिला जातो.

**अष्टविनायक तीर्थक्षेत्र पर्यटन विकास:-**

सन २०११-१२ मध्ये प्रत्येक क्षेत्रासाठी रु.१.२५ कोटी या प्रमाणे आठ क्षेत्रांकरिता रु.१०.०० कोटी वितरीत, सन२०१२-१३मध्ये सिद्धटेक-अहमदनगर रु.३६.३० लाख वितरीत आणि पुणे जिल्हयातील रांजणगाव गणपती येथील स्वच्छतागृह,वाहनतळ व्यवस्था व बगीच्या परिसर विकास यासाठी रु.१६०.८९ लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता.रु.४०.०० लाख इतका निधी वितरीत.

**श्री क्षेत्र माहूरगड पर्यटनस्थळ विकास**

**किल्ले मालिका(किल्ल्यांचा पर्यटनदृष्टया विकास):-**

५ किल्ले मालिका प्रस्तावित.

पहिल्या किल्ले मालिकेत खालील शिवकालीन किल्ल्यांचा समावेश आहे.

१.शिवनेरी

२.तोरणा

३.सिंहगड

४.राजमाची

५.लोहगड

...............

# झोपडपट्टी पुनर्वसन योजना

शासन निर्णय क्र.झोपुधो १००१/प्र.क्र.१२५/१४/झोपसु,दि.२२ जुलै, २०१४.

महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा,निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ तसेच महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व.पु.) (सुधारणा)अधिनियम २०११ आणि महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व.पु.) (सुधारणा) अधिनियम, २०१४ च्या तरतूदीनुसार दि. ०१.०१.२००० या अर्हता दिनांक रोजी अथवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या शासकीय, निमशासकीय व खाजगी जमिनीवरील घोषित तसेच गणनाकृत झोपडीत सध्या प्रत्यक्ष रहात असलेल्या झोपडीवासियांचा निवारा संरक्षित करण्यात आला.

रोजगाराच्या मुबलक संधी व शहरांच्या आकर्षणामुळे मोठया प्रमाणात शहरात बेरोजगारांचे लोंढे येतात. या बेरोजगार लोकांना शहरात आल्यावर परवडणा-या दरात घरे उपलब्ध नसल्यामुळे ते लोक शासकीय, निमशासकीय, खाजगी रिकाम्या जमिनीवर झोपडया उभारुन अतिक्रमण करतात. अशा अतिकमित झोपडीवासियांना सन १९७६ मध्ये प्रथम संरक्षण दिले.

मुंबई शहरातील बेसुमार झोपडपट्ट्यांची वाढ व त्यांना दिलेले संरक्षण विचारात घेवून झोपडीवासियांचे जीवनमान उंचावणे व राहणीमानाच्या दर्जात वाढ या उद्देशाने या प्रश्नाचा अभ्यास करुन उपाययोजना सुचविण्यासाठी शासनाने सन १९९५ मध्ये श्री.दिनेश अफझलपूरकर यांचे अध्यक्षतेखाली समितीचे गठन केले होते. समितीच्या शिफारशी स्वीकारुन झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याचा निर्णय घेतला त्यादृष्टीने प्रथम बृहनमुंबईच्या विकास नियंत्रण नियमावली-१९९१ मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याची तरतूद केली. तसेच महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र ( सु.नि.व पु. ) अधिनियम, १९७१ मध्ये अनुषंगीक सुधारणा करण्यात आली.

या कायद्याच्या तरतुदीनुसार झोपडपट्टी खालील जमिन सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक नसल्यास त्या संरक्षण पात्र झोपडीवासियांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. उक्त अधिनियमाच्या तरतुदीनुसार शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग दि. २२.७.२०१४ अन्वये झोपडीवासियांची पात्रता तपासण्याची व्यापक अशी कार्यपध्दती विहित केलेली आहे.

सदरहु अधिनियमाच्या तरतुदी राज्यात सुमारे ७० शहरांना लागू केल्या आहेत. त्यापैकी मुंबई, पुणे व पिंपरी-चिंचवड व नागपूर या शहरात झोपडपट्टी पुनर्वसन प्रधिकरणाची स्थापना करण्यात आली. अलीकडे दि. ११.९.२०१४ रोजीच्या अधिसूचनेन्वये मुंबई झोपडपट्टी पुनर्वसन प्रधिकरणाचे अधिकार क्षेत्रात ठाणे महानगरपालिका क्षेत्राचा समावेश केला आहे. मुंबई महानगरपालिका क्षेत्रात विकास नियंत्रण नियमावली ३३ ( १० ) ठाणे महानगरपालिका क्षेत्रासाठी अपेडींक्स - एस, पुणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासाठी अपेडींक्स-अे च्या तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येते. या शहरात शहराच्या विकास आराखडा व विकास नियंत्रण नियमावलीतील उपरोक्त नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टीवासियांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था किंवा त्यांच्याकडून नियुक्त विकासकाकडून झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येते. यामध्ये झोपडीवासियास मोफत सदनिका उपलब्ध करुन देण्याच्या बदल्यात विकासकास खर्च व योग्य असा नफा यासाठी त्यास खुल्या बाजारात विक्रीसाठी चटईक्षेत्र उपलब्ध करुन देण्यात येते. दि.१.१.२००० पर्यंतच्या संरक्षण पात्र झोपडपट्टी धारकांचे जीवनमान उंचावण्यासाठी व राहणीमानाचा दर्जा वाढविणे तसेच त्यांना पर्याप्त निवारा व मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देऊन त्यांचे पुनर्वसन करणे हे सदरहू योजनेचे प्रमुख उद्दीष्ट आहे.

...............

# राजीव आवास योजना

केंद्र शासनाने शहरी भागातील केंद्र सहाय्यीत राजीव आवास योजनेची घोषणा सन २०११ मध्ये केली होती. सदर योजनेची ( अ ) पूर्वतयारी व ( ब ) अंमलबजावणी असे दोन टप्पे आहेत. जून २०११ ते जून २०१३ हा दोन वर्षांचा कालावधी पूर्वतयारीचा होता. अलिकडेच, अमंलबजावणीच्या दुसऱ्या टप्प्याची घोषणा झालेली असून त्याबाबतच्या सुधारीत मार्गदर्शक सुचना केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व शहरी दारीद्रय निर्मुलन मंत्रालयाने सप्टेंबर, २०१३ मध्ये निर्गमित केलेल्या आहेत. या मुख्य मार्गदर्शक सुचनांनुसार राजीव योजनेचा कालावधी सन २०१३-२०२२( २०१३-१४ ते २०२१-२२ ) असा आहे. राजीव आवास योजनेतंर्गत राज्यातील एकूण ४६ शहरांचा समावेश करण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावास केंद्र शासनाने दि.१.११.२०१३ च्या पत्रान्वये सहमती दिलेली आहे. राज्याच्या सर्व भागामध्ये राजीव आवास योजनेच्या अंमलबजावणी करीता यामध्ये २६ महानगरपालिका, १२ अ वर्ग नगरपालिका व या व्यतिरिक्त ज्या जिल्ह्यांचा समावेश होऊ शकत नाही अशा ८ जिल्ह्यांची जिल्हा मुख्यालयाची शहरे असे एकूण ४६ शहरे पहिल्या टप्यात निवडण्यात आहेत. पूर्ण शहर झोपडपट्टी मुक्त व्हावे हा योजनेचा उद्देश आहे. झोपडपट्टी निहाय पुनर्वसन करताना झोपडीधारकांसाठी तात्पुरत्या स्वरुपात संक्रमण शिबिरे बांधणे हे उद्दिष्ट देखिल राजीव आवास योजनेत केंद्र शासनाने समाविष्ट केले आहे. भविष्यात झोपडपट्टी निर्माण होण्यास आळा बसावा यासाठी भाडे तत्वावरची घरे बांध्यण्याचीही तरतूद आहे. या सर्व बाबी विचारात घेवून झोपडपट्टी मुक्त शहर कृती आराखडा (SFCPOA ) तयार करण्याबरोबरच काही शहरांमध्ये तपशीलवार प्रकल्प अहवाल (DRP ) व सर्वेक्षणाचे काम सुरु झालेले आहे.

............

# शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे

शासन निर्णय क्र. जनेयो २००७/प्र.क्र.५२/गृनिधो-२, दिनांक २५ जून, २००७

केंद्र शासनाच्या शहर विकास तसेच शहरी रोजगार व दारिद्रय निर्मुलन मंत्रालयाने शहरी भागातील झोपडपट्टीवासियांचे जीवनमान उंचावण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून आरोग्यास अपायकारक अशा परिस्थित राहणा-या झोपडपट्टीवासियांसाठी राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रम व वाल्मिकी आंबेडकर आवास योजना बंद करून जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान मुलभूत सुविधा पुरविण्याचा उप कार्यक्रम राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार दिनांक २५ जून, २००७ च्या शासन निर्णयाव्दारे “एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम” योजना राज्यात राबविण्यात येत आहे.

**उद्दिष्टये** :- (१) कार्यक्रमात समाविष्ट असलेल्या शहरातील गरीब जनतेसाठी पुरविण्यात येणा-या मुलभूत सुविधांचा एकात्मिकृत विकास करण्यावर लक्ष केंद्रीत करणे. (२) शासनाच्या उपलब्ध असलेल्या शिक्षण, आरोग्य व सामाजिक सुरक्षा अशा सेवा एककेंद्राभिमुख करून, शहरी गरीबांना मुलभूत सुविधा उदा. रास्त किंमतीला भू-मालकी हक्क, सुधारित घरकुले, पाणी पुरवठा, मल:निस्सारण इत्यादी पुरविणे, हे करतांना लाभार्थ्यांना त्यांच्या नोकरी धंदयाच्या परिसरात घरकूल बांधून दिले जाईल हे पाण्याची काळजी घेण्यात येते. (३) शहरी गरीबांसाठी पुरविण्यात आलेल्या मुलभूत सुविधांच्या देखभालीसाठी व दीर्घकालीन स्वावलंबनासाठी मालमत्तेची निर्मिती व मालमत्तेचे व्यवस्थापन यांची प्रभावी सांगड घालणे. (४) शहरी गरीबांसाठीच्या मुलभूत सुविधांतील कमतरता भरून काढण्यासाठी आवश्यक तेवढया निधीची गुंतवणूक केली जाईल याची दक्षता घेणे. (५) शहरी गरीबांना सहजपणे उपलब्ध असलेल्या नागरी सुविधा व सोयी पुरविण्याच्या प्रमाणात वाढ करणे.

.............

# सुधारित राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना

शासन निर्णय क्र. गृनियो २००८/प्र.क्र.९२/गृनिधो-१, दिनांक २७ ऑगष्ट, २००८.

राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेवरील परंतु अल्प उत्पन्न गटातील कुटूंबासाठी घरकुले बांधण्यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत १,२५,००० इतकी घरकुले बांधण्यात येत आहेत. प्रती घरकुलाची किंमत रुपये १,००,०००/- निश्चित करण्यात आली आहे. पैकी रुपये ९०,०००/- अग्रणी बँकेकडून कर्ज व रुपये १०,०००/- लाभार्थींचा हिस्सा असतो. कर्जावरील व्याज म्हाडातर्फे अदा करण्यात येते.

................

# राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना

**शासन निर्णय:- रागांयो २०१०/प्र.क्र.२४०/आरोग्य-६,**दिनांक ३१ मे, २०११

**योजनेचा उद्देश:-** राज्यात दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना ह्रदयविकार,मेंदू व मज्जासंस्था विकार, कर्करोग व मूत्रपिंड प्रत्यारोपण या गंभीर व महागडया आजारावरील उपचार मोफत मिळावेत यासाठी शासनाने जीवनदायी आरोग्य योजना सुरु केली होती. तथापि या योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या आजारांची संख्या वाढवून लाभार्थ्यांची उत्पन्न मर्यादा वाढविण्याची मागणी लोकप्रतिनिधींकडून सातत्याने केली जात होती. त्यानुसार सदर योजना बंद करुन दारिद्रय रेषेखालील व दारिद्रय रेषेवरील (रु. १ लक्ष पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या) कुंटुंबाकरिता विमा कंपनीच्या सहाय्याने नविन राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु करण्यत आली आहे. सदर योजनेचा मुख्य उद्देश सर्वसामान्य जनतेस शासकीय तसेच खाजगी रुग्णालयांमध्ये मोफत व दर्जेदार उपचार मिळणे हा आहे.

**योजनेची माहिती:-** योजना सुरु करण्याबाबतचा शासन निर्णय जरी दि. ३१ मे, २०११ रोजी निर्गमित झाला असला तरी सदर योजनेसाठी विमा कंपनीची निवड करणे तसेच योजनेच्या अंमलबजावणीसाठी सोसायटीची स्थापना करणे व इतर प्राथमिक बाबींची पूर्तता करण्यासाठी काही कालावधी लागल्याने सदर योजना पहिल्या टप्प्यात रायगड, धुळे, सोलापूर, नांदेड, अमरावती, गडचिरोली, मुंबई शहर व मुंबई उपनगर या आठ जिल्हयांमध्ये दि. २ जुलै, २०१२ पासून सुरु करण्यात आली असून दुसऱ्या टप्प्यात उर्वरित जिल्हयांसह संपूर्ण राज्यात दि. २१ नोव्हेंबर, २०१३ पासून सुरु करण्यात आली आहे.

या योजनेची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:-

१) दारिद्रय रेषेखालील पिवळी, अंत्योदय अन्न योजना, अन्नपूर्णा शिधापत्रिकाधारक कुटुंबे आणि दारिद्रय रेषेवरील रु.१ लक्ष पर्यंत वार्षिक उप्तन्न असलेली केशरी शिधापत्रिका धारक कुटुंबे (शासकीय/निमशासकीय कर्मचारी व आयकरदाते वगळून) योजनेचे लाभार्थी आहेत.

२) योजनेचा लाभ योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या आरोग्य ओळखपत्र किंवा ओळखपत्र मिळाले नसल्यास वैध शिधापत्रिका व फोटो ओळखपत्राच्या आधारे अनुज्ञेय आहे.

३) योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या लाभार्थी कुटुंबांचा विमाहप्ता शासनाकडून विमा कंपनीस अदा केला जातो.

४) सदर योजनेंतर्गत लाभार्थी कुटुंबांस प्रति कुटुंब/प्रति वर्ष रु. १.५० लक्षच्या मर्यादेत मोफत उपचार अनज्ञेय आहेत.

५) सदर योजनेंतर्गत ३० स्पेशालिटीवरील एकूण ९७१ प्रोसिजर्सचा समावेश असून यावरील संपूर्ण उपचार नि:शुल्क असून उपचार सुरु होण्यापूर्वी (Pre Existing) असलेल्या आजारांवरही उपचार अनुज्ञेय आहेत.

६) योजनेंतर्गत रुग्णांस भोजन व एकवेळचा परतीचा प्रवास खर्चही अनुज्ञेय आहे.

७) योजनेंतर्गत मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यखेतेखाली नियामक परिषदेची स्थापना करण्यात आली असून योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटीची स्थापना करण्यात आली असून सदर सोसायटीचे प्रमुख हे अखिल

भारतीय सेवतील प्रशासकीय अधिकारी असतात. त्यांचे सोसायटीवरील पदनाम मुख्य कार्यकारी अधिकारी असे आहे.

८) योजनेच्या अंमलबजावणीसाठी निविदा पध्दतीने विमा कंपनीची निवड करण्यात येते. निवड केल्यानंतर सोसायटी व विमा कंपनी यांच्यामध्ये सांमजस्य करार केला जातो व त्यानुसार योजनेची अंमलबजावणी होते.

९) योजनेमध्ये सोसायटीने निश्चित केलेल्या निकषांमध्ये बसणाऱ्या रुग्णालयांनी ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर सदर रुग्णालयांची तपासणी करुन त्यांना योजनेमध्ये सहभागी करुन घेण्याबाबत निर्णय घेण्यात येतो.

१०) सदर योजनेमध्ये समाविष्ट सर्व प्रोसिजर्सचे दर हे निश्चित केलेले असून त्यानुसार सर्व रुग्णालयांना त्यांच्या दर्जाप्रमाणे दर अनुज्ञेय आहेत.

११) योजनेमध्ये समाविष्ट रुग्णलयांमध्ये आरोग्य मित्रांची नियुक्ती करण्यात येते व त्यांच्यामार्फत योजनेंतर्गत उपचार घेऊ इच्छिणाऱ्या रुग्णास आवश्यक ती सर्व मदत व मार्गदर्शन केले जाते.

१२) योजनेचा लाभ मिळण्यासाठी कोणत्याही कागदपत्रांच्या पूर्ततेची आवश्यकता नाही. फक्त आरोग्य ओळखपत्र किंवा वैध शिधापत्रिका व फोटो ओळखपत्राच्या आधारे लाभार्थ्यांस उपचार घेता येतात.

१३) योजना संपूर्णपणे संगणकीकृत असून रुग्णाच्या नोंदणीपासून ते रुग्णालयांचे दावे अदा करण्यापर्यंतची सर्व कामे ऑनलाईन पध्दतीने पार पाडली जातात.

................

# जन्म - मृत्यू नोंदणी अधिनियम (RBD), १९६९

जन्म - मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ हा केंद्रीय कायदा आहे. जन्म, मृतजन्म आणि मृत्यु यांच्या नोंदीबाबत देशभरात एकवाक्यता आणि समानता यावी या हेतूने तो बनविण्यात आला आहे. या अधिनियमात ५ प्रकरणे आणि ३२ भाग आहेत.

**जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील ठळक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत:-**

- जन्म आणि मृत्युची नोंद बंधनकारक.
- जन्म म्हणजे जिवंत जन्म आणि मृत जन्म.
- देशात होणाऱ्या सर्व जन्म आणि मृत्यूंची नोंद करण्याबाबत आणि त्यांची माहिती देण्याबाबत संबंध भारतात समान कायदा (कलम-१ (२)).
- या अधिनियमात घटनेच्या नोंदीमध्ये दिनांक, ठिकाण आणि आई-वडिलांचे नाव याची नोंद अभिप्रेत आहे. ही नोंद म्हणजे राष्ट्रीयत्वाचा पुरावा नाही.
- या अधिनियमानुसार केंद्र, राज्य, जिल्हा आणि स्थानिक स्तरावरील अधिकारी निबंधकांची नियुक्ती, त्यांची भूमिका आणि जबाबदारी ठरवून देण्यात आली आहे. (कलम - ३, ४, ६ आणि ७)
- जन्म आणि मृत्युच्या घटनेची नोंद घटना ज्या कार्यक्षेत्रात घडेल त्या निबंधकाने करावी. कलम (७ (२))
- जन्म आणि मृत्यूची माहिती २१ दिवसांच्या आत देण्याबाबत विशिष्ट व्यक्तींची आणि संस्थांची जबाबदारी निश्चित करणे (कलम ८,९ व नियम ५ (३)).
- २१ दिवसानंतर मिळालेल्या माहितीची नोंद करण्यास परवानगी (कलम १३)
- मुलाच्या नावाशिवाय त्याच्या जन्माची नोंद करण्यास परवानगी, तसेच नंतर त्याचे नाव नोंदीत समाविष्ट करण्यासाठी परवानगी (कलम १४) अशा प्रकारे नाव नोंदविण्यासाठी जास्तीत जास्त १५ वर्षाची मुदत देण्यात आली आहे.
- रजिस्टरमधील जन्म आणि मृत्यूच्या नोंदीत दुरुस्ती करण्याची वा ती नोंद रद्द करण्याची परवानगी (कलम १५)
- मृत्यूच्या नोंदीतून एखादया व्यक्तीस मृत व्यक्तीबद्दल माहिती देताना मृत्यूचे कारण सांगितले जाणार नाही याची दक्षता घेणे (कलम १७)
- भारताबाहेर राहणाऱ्या नागरिकांच्या जन्म आणि मृत्युची नोंद करण्यासाठी खास तरतूद कलम (२०) मध्ये आहे.
- जन्म आणि मृत्युविषयीची माहिती न देणे, नोंद न करणे आणि याबाबत निष्काळजीपणा दाखविणे यासाठी दंड ठोठावणे (कलम २३)
- जन्म आणि मृत्युची नोंद असलेली रजिस्टर/अभिलेख कायमचे रेकॉर्ड म्हणून सांभाळून ठेवणे (कलम ३०)

**खालील बाबीस अधिनियम मान्यता देते:-**

- हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वीही घडलेल्या जन्म आणि मृत्युची नोंद करण्याची मान्यता (कलम १३ (३)) आणि
- निबंधकांनी स्वत: होऊन केलेली नोंद (कलम ७ (२)). विवाह नोंदणी या अधिनियमाच्या कक्षेत येत नाही. ...........

## गर्भधारणपूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम २००३

१) गर्भधारणेपूर्वी लिंगाची निवड करण्यास तसेच गरोदरपणामध्ये गर्भलिंग तपासणी करण्यास प्रतिबंध.

२) काही ठराविक आजारांसाठी प्रसवपूर्व निदान तंत्रांचा वापर करण्यास मान्यता.

३) प्रसवपूर्व निदान तंत्राचा वापर करुन गर्भलिंग तपासणी नंतर होणारी स्त्री भृणहत्या टाळणे.

४) गर्भलिंग तपासणी बाबत कोणत्याही प्रकारची जाहिरात करण्यास बंदी.

५) सोनोग्राफी व तत्सम मशीन विक्री/हस्तांतरण करण्यावर नियंत्रण

६) कायद्यातील तरतूदींचे उल्लंघन करणाऱ्या डॉक्टर्स, मदतनीस, गरोदर माता व त्यांचे नातेवाईक यांना शिक्षा

**पीएनडीटी कायदा व नियमावलीतील तरतुदी:-**

**१) केंद्राचे नियमन**:- प्रसवपूर्व निदान तंत्राअंतर्गत तपासणी करणाऱ्या सर्व केंद्रांची नोंदणी करणे बंधनकारक आहे.

अ)अल्ट्रा साऊंड सोनोग्राफी मशिन

ब) इमेजिंग मशिन

क) स्कॅनर-थ्री डी किंवा फोर डी मशिन्स

ड) आयव्हीएफ् सेंटर्स

इ) ज्या मशिनद्वारे गर्भाचे लिंग पाहता येईल अशी मशिन्स असणारे केंद्र.

फ) ज्या वाहनांमध्ये अशी मशिन्स ठेवून तपासणी केली जाते अशी वाहने.

- विहीत अर्हताप्राप्त व्यक्तीच अशा तपासण्या करण्यास सक्षम.
- नोंदणी न केलेल्या ठिकाणी अशा तपासण्या करण्यावर बंदी.

**२) प्रसवपूर्व निदान तंत्रांचे नियमन**:- कायद्यात नमुद केलेल्या बाबींशिवाय सदर चाचण्या करण्यासाठी कोणत्याही ठिकाणाचा वापर करण्यास प्रतिबंध.

गर्भात आढळणारे दोष शोधण्यासाठी व काही ठराविक कारणांसाठी उदा. गर्भवती मातेचे वय ३५ पेक्षा जास्त असल्यास किंवा जंतूसंसर्ग, रेडिएशन रासायनिक पदार्थांचा संबंध आला असल्याबाबत संशय आल्यास किंवा मागील बाळंतपणात मानसिक किंवा शारीरिक व्यंग असल्याबाबत पूर्व इतिहास असल्यास प्रसवपूर्व निदान तंत्राचा वापर करता येईल.

**३) संस्थांची नोंदणी :-**

अ) नोंदणी केल्याशिवाय असे केंद्र सुरु करण्यावर बंदी

ब) आवश्यक कागदपत्रांसह विहीत नमुन्यातील अर्ज व फी संबंधीत संस्था/डॉक्टर, समुचित प्राधिकरण (Appropriate Authority) यांचेकडे सादर करतात.

क) संस्थेची तपासणी करुन अहवाल जिल्हा/महानगरपालिका सल्लागार समितीला सादर केला जातो.

ख) समितीच्या सल्लयाने नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येते. प्रमाणपत्र एकाकडून दुसऱ्याकडे हस्तांतरण करता येत नाही.

ग) प्रमाणपत्राची मुदत - ५ वर्ष

घ) मुदत संपण्यापुर्वी ३० दिवस आधी अर्ज करणे बंधनकारक.

**४) डॉक्टर्स व केंद्रधारकांवर बंधने:-**

- नोंदणी प्रमाणपत्र दिसेल अशा जागी लावावे.
- गरोदरपणापूर्वी लिंग निवड करण्यास बंदी.
- गर्भ लिंग निदान करण्यास बंदी.
- गर्भाचे लिंग कोणत्याही पध्दतीने उदा. खुणा करुन, शब्दाने सांगण्यावर बंदी.
- मशिन कागदपत्रे, साहित्य व जागेची तपासणी करण्यासाठी परवानगी देणे बंधनकारक.
- तपासणी करण्यापूर्वी लाभार्थीची लेखी संमती घेणे आवश्यक. गरोदर मातांची तपासणी सोनोग्राफी यंत्राद्वारे केली असेल तर सर्व रेकॉर्ड जतन करुन ठेवावे. या प्रत्येक अहवालावर लिंग तपासणी केली नाही तसेच लिंग कळविलेले नाही असे डॉक्टरांनी प्रमाणित करणे आवश्यक.
- गरोदर मातेने मला गर्भाच्या लिंगाची माहिती करुन घ्यावयाची नाही, असे प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे. दरमहा ५ तारखेला विहीत नमुन्यात अहवाल पाठविणे.
- केंद्राचे ठिकाण, कर्मचारी किंवा साहित्य यामध्ये बदल झाला असल्यास ३० दिवसांचे आता कळविणे.
- कायद्यातील तरतुदीबाबत स्थानिक भाषेत बोर्ड लावणे.
- कायद्याची प्रत केंद्रात ठेवणे.

**५) नियंत्रण व पर्यवेक्षण कार्यप्रणाली :-** राज्य पर्यवेक्षकीय मंडळाची स्थापना.

अध्यक्ष : मा. आरोग्य मंत्री

सदस्य - तज्ञ डॉक्टर्स, अधिकारी, पदाधिकारी, महिला प्रतिनिधी

राज्य पर्यवेक्षकीय मंडळाची कामे :-

१) लोक जागृती

२) समुचित प्राधिकरण यांनी केलेल्या कामाचा आढावा.

३) कायद्याच्या अंमलबजावणीसाठी केलेल्या प्रयत्नांची पाहणी.

४)येणाऱ्या अडचणींबाबत केंद्रीय पर्यवेक्षकीय मंडळाला सूचना देणे.

**६) समुचित प्राधिकरण (Appropriate Authority)**

अ) राज्य समुचित प्राधिकरण (State Appropriate Authority):-एकूण तीन सदस्य

१) अतिरिक्त संचालक, कुटुंब कल्याण, अध्यक्ष

२) न्याय व विधी/कायदा खात्यातील अधिकारी.

३) स्त्री कार्यकर्ती

ब) जिल्हा / महानगरपालिका समुचित प्राधिकरण

जिल्हा- जिल्हा शल्य चिकित्सक

महानगरपालिका- आरोग्य अधिकारी, महानगरपालिका

क) मुंबई महानगरपालिकेसाठी वॉर्डातील वैद्यकीय अधिकारी यांना वॉर्डस्तरीय समुचित प्राधिकरण म्हणून अधिकार.

ड) तालुका/उपजिल्हास्तरीय समुचित प्राधिकरण-

ग्रामीण रुग्णालयांचे वैद्यकीय अधिक्षक.

**७) समुचित प्राधिकरण (Appropriate Authority) ची कामे:**

(अ) नोंदणी प्रमाणपत्र देणे, निलंबित करणे किंवा रद्द करणे.

(ब) कायद्यातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन होईल हे पाहणे.

(क) पर्यवेक्षण करणे. (Supervision)

(ड) तक्रारींची शहानिशा करुन योग्य ती कारवाई करणे.

(इ) सल्लागार समितीचा सल्ला घेणे.

(फ) कायदेशीर कारवाई करणे.

(ग) स्वतंत्रपणे तपासणी करणे.

(स) लोक जागृती करणे.

(त) सल्लागार समितीच्या शिफारशीनूसार कार्यवाही करणे.

(थ)राज्य, जिल्हा व महानगरपालिका स्तरावर सल्लागार समित्यांची स्थापना

...............

## गरोदर माता व इतर मातांच्या संबंधीत असणाऱ्या कल्याणकारी योजना

### १) जननी सुरक्षा योजना:-

या योजनेअंतर्गत दारिद्रय रेषेखालील सर्व लाभार्थी, अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीतील सर्व गर्भवती मातांना (दारिद्रय रेषेखाली नसलेल्या देखील) महिलांना लाभ दिला जातो. या लाभार्थी महिलेचे वय प्रसवपूर्व नोंदणी करताना कमीत कमी १९ वर्षे असावे. या योजनेचा लाभ २ जिवंत अपल्यांपर्यंत देय राहतो.

ग्रामीण व शहरी भागातील फक्त दारिद्रय रेषेखालील लाभार्थीची प्रसुती घरी झाल्यास आवश्यक कागदपत्राची पूर्तता केल्यास रु. ५००/- एवढे अनुदान लाभार्थींना देय आहे. शहरी भागातील लाभार्थीची प्रसुती कोणत्याही आरोग्य संस्थेत झाल्यास रुपये ६००/- एवढे अनुदान प्रसुतीनंतर सात दिवसांचे आत देय आहे. ग्रामीण भागातील लाभार्थीची प्रसुती कोणत्याही आरोग्य संस्थेत झाल्यास रुपये ७००/- एवढे अनुदान प्रसुतीनंतर सात दिवसांचे आत देय आहे. सिझेरीयन शस्त्रक्रिया झाल्यास लाभार्थीस रु.१५००/- चा लाभ देय आहे.

### २) जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम-

केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या सुचनांनुसार राज्यामध्ये दि.२६.०९.२०११ च्या शासन निर्णया नुसार जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम (JSSK) सर्व जिल्हयांमध्ये दि.०७.१०.२०११ पासून राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाअंतर्गत माता व नवजात अर्भकांना सार्वजनिक आरोग्य संस्थेमध्ये मोफत सेवा पुरविल्या जातात.

- गरोदर/प्रसुत मातांना व ३० दिवसांपर्यंतच्या आजारी नवजात अर्भकास घरापासून आरोग्य संस्थेपर्यंत, एका आरोग्य संस्थेतून दुसऱ्या आरोग्य संस्थेत व आरोग्य संस्थेतून घरापर्यत मोफत वाहतुक सेवा दिली जाते.
- कोणत्याही प्रकारचे रुग्ण शुल्क या लाभार्थीकडून घेतले जात नाही. मोफत प्रसुती व सिझेरियन सेक्शन.
- आहार (३ दिवस साधारण प्रसुतीसाठी व ७ दिवस सिझेयिनसाठी)
- प्रयोगशाळा तपासण्या व औषधोपचार.

### ३) कुटुंब कल्याण कार्यक्रम-

महाराष्ट्र राज्यात कुटुंब कल्याण कार्यक्रम केंद्र शासनाच्या मार्गदर्शक धोरणानुसार राबविण्यात येतो. या कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांना द्यावयाच्या सेवांमध्ये स्त्री शस्त्रक्रियेमध्ये टाक्याच्या व बिनटाक्याच्या शस्त्रक्रिया केल्या जातात. तात्पुरत्या पध्दतीमध्ये तांबी, गर्भनिरोधक गोळया यांचा वापर केला जातो.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कुटुंब नियोजन योजनेअंतर्गत शासकीय आरोग्य संस्थेत कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यावर स्त्री लाभार्थ्यास (फक्त दारिद्रय रेषेखालील/अनुसुचित जाती व जमाती) रु.६००/- चा मोबदला व दारिद्रय रेषेवरील स्त्री नसबंदी लाभार्थ्यास केंद्र शासनाकडून रु. २५०/- चा मोबदला दिला जातो.

मानांकित केलेल्या खाजगी व्यावसायिक /स्वयंसेवी संस्थेत कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास दारिद्रय रेषेखालील/अनुसुचित जाती व जमाती च्या स्त्री नसबंदी लाभार्थीस मोफत सुविधा पुरविल्या जातात.

**४) सुधारित सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना:-**

फक्त एक किंवा दोन मुलींवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करुन घेणाऱ्या दारिद्रय रेषेखालील जोडप्यांसाठी “सुधारित सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना” राबविण्यात येत आहे. दि.१ एप्रिल, २००७ पासून ही योजना सुधारीत स्वरुपात लागु करण्यात आली आहे.

१) सदर योजना फक्त दारिद्रय रेषेखालील जोडप्यांनाच लागू आहे.

२) जोडप्यास मुलगा नसावा व एक किंवा दोन मुलीनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेली असावी.

३) कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेल्या जोडप्यास व त्यांचे मुलींना आर्थिक लाभ देण्यात येतो.

**५) मातृत्व अनुदान योजना-**

शासनाने आदिवासी क्षेत्रात कार्यान्वित असलेल्या विविध योजनांच्या अमंलबजावणीमध्ये एकसुत्रता व प्रभावीपणा आणण्याचे दृष्टीने सर्व घटक कार्यक्रमांना एकत्र करुन नवसंजीवनी योजना शासन निर्णय दि.२५ जून १९९५ अन्वये सुरु केली. या अंतर्गत १५ आदिवासी प्रवण जिल्हयांमध्ये गरोदर मातांची नियमित आरोग्य तपासणी व्हावी व त्यांना सुयोग्य आहार वेळेत उपलब्ध व्हावा तसेच त्यांना गरोदरपणात व नंतर विश्राती मिळावी त्यादृष्टीने शासनाने मातृत्व अनुदान योजना १९९७-९८ पासून मंजूर केलेली आहे. गरोदरपणामध्ये रुपये ४००/- रोखीने व रुपये ४००/- ची औषधे याप्रमाणे प्रत्येक लाभार्थीला एकुण रुपये ८००/- या योजनेखाली देण्यात येतात.

**६) मानव विकास कार्यक्रम -**

दि.१९ जुलै २०११ च्या शासन निर्णय नुसार राज्यातील २२ जिल्हयातील १२५ तालुक्यांमध्ये मानव विकास आयुक्तालय द्वारे मानव विकास निर्देशांक वाढविण्याच्या दृष्टीने विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

या कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा-

१) तज्ञ महिला डॉक्टराकडून गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी करणे.

२) गरोदर मातांना पोषण व गरोदरपणात घ्यावयाची काळजी याबाबत सल्ला देणे.

३) स्तनदा मातांची स्त्रीरोग तज्ज्ञांकडून तपासणी व औषधोपचार करणे व कुटुंब कल्याण, जंतुसंसर्ग प्रतिबंधन, निव्वळ स्तनपान व बाळाला पुरक आहार देण्याबाबत सल्ला देणे.

४) ० ते ६ महिने वयोगटातील बालकांची बालरोग तज्ज्ञांकडून तपासणी व औषधोपचार करणे.

५) अ.जा./अ.ज./दारिद्रय रेषेखालील गरोदर महिलेला बुडीत मजुरीपोटी रु. ८००/- गरोदरपणातील नवव्या महिन्यात देणे. (भंडारा व अमरावती वगळून)

६) किशोरवयीन मुलींना (१२ ते १८ वर्षे) पौगंडावस्थेतील आरोग्य व जीवन कौशल्य विकसित करण्याबाबत प्रशिक्षण देणे (गोदिंया, गडचिरोली, नाशिक, अमरावती, नांदेड, बीड, नागपुर,बुलढाणा वगळून)

.............

# वैद्यकिय गर्भपात अधिनियम १९७१

१)   सुरक्षित व कायदेशीर गर्भपात करण्यासाठी वैद्यकीय गर्भपात अधिनियम १९७१ तयार करण्यात आलेला आहे. प्रशिक्षित वैद्यकिय अधिकारी यांनी जिल्हा समितीने मान्यता दिलेल्या केंद्रामध्येच गर्भपात केला पाहीजे असा यामागील उद्देश आहे.

२)   या कायदयान्वये २० आठवडयापर्यंत गर्भवती असलेल्या स्त्रीस खालील कारणास्तव गर्भपात करणेस परवानगी आहे:-

अ) गर्भवती महिलेच्या जीवास धोका किंवा मानसिक अगर आरोग्यास गंभिर दुखापत होत असल्यास.

ब) जन्मास येणाऱ्या बालकास मानसिक किंवा शारिरीक व्यंग असल्यास जेणे करुन बालकास अंपगत्व येऊ शकते.

क) सदर महिलेस बलात्कारा मुळे गर्भधारणा झाली असल्यास.

ड) विवाहीत पती पत्नी यांचे कडून गर्भनिरोधक साहित्याचा अगर औषधाचा निष्क्रियतेमुळे गर्भधारणा झाली असल्यास गर्भपात करता येतो.

इ) मानसिक दृष्टया आजारी महिला गरोदर राहिल्यास तिच्या पालकाची संमत्ती घेऊन गर्भपात करण्यात येतो.

३)   सदर कायदयाचे उल्लंघण झाल्यास कमीत कमी २ वर्ष व जास्तीत जास्त ७ वर्ष पर्यंत करावास होऊ शकतो.

४)   वैद्यकिय व्यवसायीकाची अर्हता:-

६ महिने निवासी अधिकारी म्हणून प्रशिक्षण घेतलेले किंवा स्त्री रोग व प्रसुती शास्त्र विषयातील पदत्युत्तर पदवीधारक, किंवा मान्यता प्राप्त संस्थेत किमान २५ गर्भपात (MTP) केसेस प्रत्यक्ष केलेले (हाताळलेले) वैद्यकिय व्यावसायीक जे केवळ MCI (Medical Council of India) कायद्यानुसार अधिकृत नोंदणी झालेले आहेत, असे डॉक्टर वैद्यकिय गर्भपात करु शकतात.

१२ आठवडयापर्यंतच्या गरोदर स्त्रीचा एक वैद्यकीय व्यवसायीक आणि १२ ते २० आठवडयापर्यंतच्या गरोदर स्त्रीचा दोन वैद्यकिय व्यवसायिक एकमेकांच्या सल्लयाने जर गरोदर स्त्री च्या मानसिकरित्या किंवा शारिरिकरित्या जिवितास धोका आहे किंवा बालकास शारिरिक अपंगत्व असल्यास तसे प्रमाणित करुन गर्भपात करु शकतात.

शासकिय रुग्णालये/शासन मान्य नर्सिंग होम केंद्र येथे गर्भपात करता येतो.

............

# स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)

शासन निर्णय क्र.: स्वभामि २०१४/प्र.क्र. २७/पापु-०८, दि. ७.११.२०१४.
शासन शुध्दीपत्रक क्र.: स्वभामि २०१४/प्र.क्र. २७/पापु-०८, दि. १०.११.२०१४

**'निर्मल भारत अभियान'** या नावाने ओळखल्या जाणाऱ्या योजनेचे नामकरण दिनांक २ ऑक्टोबर, २०१४ पासून **'स्वच्छ भारत मिशन'** असे करण्यात आले आहे. कुटुंबांसाठी बांधण्यात आलेले शौचालय चार भिंती, दरवाजा व छतासह पूर्णपणे बांधकाम (Super Structure) केलेले असेल. सर्व ग्रामीण कुटुंबांना या अंतर्गत समाविष्ट करणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. दारिद्रय रेषेखालील सगळी कुटुंबे, दारिद्रय रेषेवरील केवळ अनुसुचित जाती आणि अनुसूचित जमातीची कुटुंबे, लहान आणि अल्पभूधारक शेतकरी, घर असलेले भूमिहीन मजूर, शारिरीकदृष्ट्या अपंग आणि महिला कुटुंबप्रमुख असलेल्या कुटुंबांना या योजनेतर्गत प्रोत्साहनपर भत्ता दिला जातो. कुटुंबासाठी शौचालय बांधण्याचे काम कुटुंबानेच केले पाहिजे आणि काम पूर्ण करुन शौचालयाचा वापर केल्यानंतरच त्या कुटुंबाला त्याने घेतलेल्या सहभागाच्या पार्श्वभूमीवर प्रोत्साहनपर रोख रक्कम दिली जाते.

२. वैयक्तिक शौचालयाच्या (IHHL) बांधकामासाठी प्रोत्साहनपर रक्कम ही प्रती शौचालय रु.१२,००० /- ठरविण्यात आली असून त्यामध्ये पाणी उपलब्धता, पाणी साठवण, हात धुणे व शौचालय स्वच्छता या बाबींचा समावेश करण्यात आला आहे. याअंतर्गत केंद्राचा हिस्सा ७५% (रु.९०००/-) व राज्याचा हिस्सा (३०००/-) इतका आहे.

३. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGA) अंतर्गत पुरवण्यात येत असलेल्या वैयक्तिक शौचालय बांधकामाकरिता देण्यात येणारे प्रोत्साहनपर अनुदान या मिशनअंतर्गत केंद्र शासनाकडून मंजूर निधीतून देण्यात येणार आहे.

४. इंदिरा आवास योजनेंतर्गत बांधण्यात येणाऱ्या शौचालयांसाठी स्वतंत्रपणे निधी अर्थसंकल्पित करण्यात येणार आहे. सदर तरतूद होईपर्यंत या मिशनअंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

५. शाळा व अंगणवाड्या यामध्ये शौचालये बांधण्याची जबाबदारी ही अनुक्रमे शालेय शिक्षण व साक्षरता विभागाकडे आणि महिला व बालविकास विभागाकडे सोपविण्यात आली आहे.

..............

# निर्मल ग्राम पुरस्कार

शासन निर्णय क्र.: निर्मल २०१४/प्र.क्र. ५२/पापु-०८, दिनांक ५.२.२०१५

ग्रामीण भागातील उघडयावरील प्रातर्विधी पध्दत पूर्णपणे बंद करण्यासंदर्भात केंद्र शासनाने सन २००३-०४ या वर्षापासून "निर्मल ग्राम पुरस्कार योजना" जाहीर केली आहे. या योजनेंतर्गत उघडयावरील प्रातर्विधी पूर्णपणे बंद करुन गावांचा परिसर स्वच्छ ठेवणाऱ्या ग्रामपंचायतींना, पंचायत समित्यांना व जिल्हा परिषदांना रोख पारितोषिके देण्यात येतात. या कार्यक्रमांतर्गत देण्यात येणाऱ्या पारितोषिकामध्ये केंद्र शासनाने डिसेंबर २०१२ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार केंद्र हिस्सा ८०% व राज्य हिस्सा २०% असा आहे.

२. **निर्मल पुरस्कारासाठी पात्रता निकष:-** निर्मल ग्राम पुरस्कारासाठी अर्ज करणा-या ग्रामपंचायतीसाठी खालील निकष आहेत:-

- सदर ग्रामपंचायतीत सर्व कुटुंबाकडे शौचालय असून सदर शौचालय वापरात असणे व संपूर्ण हागणदारी मुक्तीचा ठराव ग्रामपंचायतीने करणे आवश्यक आहे.
- सदर ग्रामपंचायतीत सर्व कुटुंबाकडे पिण्यासाठी व स्वच्छतेसाठी पाण्याची उपलब्धतता असावी.
- सदर ग्रामपंचायतीने वार्षिक कृती आराखडयातील सर्व घटकांचे (IHHL, School, Anganwadi Toilet, SLWM, Communnity Toilet) उदिष्टय पूर्ण झालेले असावे.
- या उदिष्टांची पूर्णतेची नोंद केंद्र शासनाच्या IMIS of (Ministry of Drinking Water & Sanitation-MDWS) संकेंतस्थळावर घेतलेली असणे आवश्यक आहे.

३. **पुरस्कार रक्कम:-**

पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतीस लोकसंख्येवर आधारित बक्षीस रक्कम खालीलप्रमाणे देय आहे:-

| **निकष** | **ग्रामपंचायत** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| जनगणना २०११ नुसार लोकसंख्या | १००० पेक्षा कमी | १००० ते १९९९ | २००० ते ४९९९ | ५००० ते ९९९९ | १०००० व त्यापेक्षा जास्त |
| बक्षीस रक्कम (रु. लाखात) | १.० | २.० | ४.० | ८.० | १०.० |

............

# संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान

शासन निर्णय क्र.: अभियान १००८/प्र.क्र. १७७/पापु-१६, दि. १५.९.२००८

१. ग्रामीण जनतेचे आरोग्यमान उंचावण्यासाठी सन २०००-२००१ पासून गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जन जागृतीचा व्यापक कार्यक्रम अंमलात आणण्यात आला. त्यामधून लोकांच्या पुढाकारामध्ये शासनाचा सहभाग असा नवीन विचार विकास योजनांना देण्यात आला. लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी या अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा सुरू केली आहे. या अभियानास लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने हा कार्यक्रम आता कायमस्वरुपी राबविण्यात येत आहे.

२. सन २००८-०९ पासून राबविण्यात येणाऱ्या संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत जिल्हा परिषद मतदार संघ स्तरावरील मिळालेल्या गुणांवरून ग्रामपंचायतींची खालील प्रमाणे प्रतवारी ठरविण्यात येते.

- अ- ६०% व त्याहून अधिक गुण
- ब- ५०% ते ५९%
- क- ४९% व त्यापेक्षा कमी गुण

३. उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्राम पंचायतींना द्यावयाच्या बक्षिसाचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे.

| बक्षीस क्रमांक | पंचायत समिती स्तर | जिल्हा स्तर | विभागीय स्तर | राज्य स्तर |
|---|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | रू.२५ हजार | रू.५लाख | रू.१०लाख | रू.२५लाख |
| द्वितीय क्रमांक | रू.१५ हजार | रू.३लाख | रू.८लाख | रू.२०लाख |
| तृतीय क्रमांक | रू.१० हजार | रू.२लाख | रू.६लाख | रू.१५लाख |

४. तसेच संपूर्ण राज्यात केंद्र शासनाकडून पुरस्कार मिळालेल्या प्रत्येक पंचायत समितीला संबंधित वर्षात राज्य शासनातर्फे रु.४.०० लाख व केंद्र पुरस्कृत निर्मल पुरस्कार योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून पुरस्कार मिळाल्यानंतर संबंधित प्रत्येक जिल्हा परिषदेला संबंधित वर्षात राज्य शासनातर्फे रु.२०.०० लाखाचा तसेच ज्या जिल्हा परिषदांमधील जास्तीत जास्त टक्के ग्रामपंचायतींना निर्मल ग्राम पुरस्कार मिळेल, त्या जिल्हा परिषदला रू.१०.००लाखाची बक्षीसे "राष्ट्रपिता महात्मा गांधी" यांच्या नावाने देण्यात येतात.

५. सन २००५-०६ पासून तालुका, जिल्हा, विभाग व राज्य पातळीवर प्रत्येक स्तरावर पात्र असलेल्या ग्रामपंचायतीमधून स्वच्छ अंगणवाडी व स्वच्छ प्राथमिक शाळांची निवड करून त्यांच्यातून प्रत्येक स्तरापर सावित्रीबाई फुले स्वच्छ अंगणवाडी व साने गुरूजी स्वच्छ प्राथ. शाळा यांच्या नावाने खालीलप्रमाणे रोख स्वरुपात बक्षीसे देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येत आहे.

| | पंचायत समिती | जिल्हा | विभाग | राज्य |
|---|---|---|---|---|
| प्राथमिक शाळा | रू.१० हजार | रू.५० हजार | रू.१लाख | रू.३लाख |
| अंगणवाडी | रू.५ हजार | रू.२५ हजार | रू.५० हजार | रू.१लाख |

.................

# संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान

शासन निर्णय क्र.:नास्वअ २००७/प्र.क्र.६४/पापु-२१, दि.२६ ऑक्टोबर,२००७.

राज्याच्या नागरी भागामध्ये सन २००२-०३ पासून संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. दिनांक १४ नोव्हेंबर, २००२ पासून सदर अभियान राबविण्यास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली. भारताचे पहिले पंतप्रधान भारतरत्न जवाहरलाल नेहरु यांच्या नावाने या अभियानांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायती यांना पारितोषिके देण्यात येतात.

संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानांतर्गत विविध स्तरावर ४ गटांमध्ये स्पर्धा आयोजित करण्यात येतात. गट क्रमांक १ मध्ये १० लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या महानगरपालिका व गट क्रमांक २ मध्ये १० लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या महानगरपालिकांचा समावेश असून गट क्रमांक ३ मध्ये अ व ब वर्ग नगरपालिकांचा समावेश आहे. तसेच गट क्रमांक ४ मध्ये क वर्ग नगरपरिषदा व नगरपंचायती यांचा समावेश आहे.

संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानांतर्गत घेण्यात येणाऱ्या स्वच्छ शहर स्पर्धेकरिता विहित करण्यात आलेल्या यापूर्वीच्या निकषांमध्ये खालीलप्रमाणे बदल केले आहेत:-

गट "अ" ( पाणी पुरवठा व व्यवस्थापन,सांडपाणी व्यवस्थापन, शौचालय व्यवस्थापन हागणदारी मुक्त शहर, सार्वजनिक आरोग्य, IEC, घनकचरा व्यवस्थापन )

गट"ब" ( निकष- नागरी सुविधा, पर्यावरण, रस्ते विकास, सुशोभिकरण, अतिक्रमण निर्मूलन व अनधिकृत बांधकामांना प्रतिबंध, शिक्षण, सामाजिक सुविधा, माता/बाल संगोपन शिक्षण, सामाजिक सुविधा, माता/बाल संगोपन व विकास आराखड्याची अंमलबजावणी, मनुष्यबळ व आर्थिक व्यवस्थापन आणि सुशासन, आर्थिक विकास, रोजगार निर्मिती, दारिद्रय निर्मुलन )

यापैकी अ गट हा अभियानामध्ये भाग घेणाऱ्या सर्व नागरी संस्थांसाठी सक्तीचा ठरविण्यात आला असून राज्य स्तरावरील सर्वात स्वच्छ शहर स्पर्धेचे उद्दिष्ट गाठण्याकरीता ब गटातील निकषामध्येही उत्कृष्ट कामगिरी बजावणे आवश्यक असते. नागरी स्वच्छता अभियानांतर्गत घेण्यात येणाऱ्या स्पर्धेच्या विविध फेऱ्यांमध्ये राज्य शासनाकडून देण्यात येणाऱ्या बक्षिसांसाठी नागरी संस्थांची प्रत्येक स्तरावर त्यांना प्राप्त होणाऱ्या गुणांच्या अनुषंगाने प्रतवारी (Gradation) करुन बक्षिसे देण्यात येतात.

.................

# महाराजस्व अभियान

शासन निर्णय क्र. मराअ २०१५/प्र.क्र.११०/म-५, दिनांक २९ जुलै, २०१५.

सर्वसामान्य जनता, शेतकरी व शेतमजूर यांचा त्यांच्या दैनंदिन कामकाज व विविध प्रश्नांच्या संदर्भात महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालयांशी नियमित संबंध येतो. शेतकरी व सामान्य जनतेचे दैनंदिन प्रश्न त्वरीत निकाली काढण्याच्या अनुषंगाने तसेच "महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतीमान व पारदर्शक करण्याच्या दृष्टीने राज्यात गेल्या ४ वर्षात सुवर्णजयंती राजस्व अभियान यशस्वीरीत्या राबविण्यात आला आहे. सदर अभियानात काही नवीन लोकाभिमुख व प्रशासकीय घटकांचा समावेश करुन "महाराजस्व अभियान" हा महत्वाकांक्षी कार्यक्रम सर्व जिल्हयांमध्ये दि. १ ऑगस्ट, २०१५ पासून राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

महाराजस्व अभियान अंतर्गत खालील लोकाभिमुख व प्रशासकीय घटकांचा समावेश करण्यात आला आहे:-

**(I) लोकाभिमुख घटक :-**

(i) शिबीरे आयोजित करून विविध दाखले प्रदान करणे-
या संदर्भात शासन परिपत्रक क्रमांक - संकीर्ण ०२/२०१०/प्र.क्र.१५/ई-१, दिनांक ३ ऑगस्ट, २०१० मध्ये सविस्तर कार्यपध्दती देण्यात आलेली आहे.

(ii) विस्तारीत समाधान योजना राबविणे-

(iii) महसूल अधिकाऱ्यांकडे ६ महिन्यांपेक्षा जास्त प्रलंबित सर्व अर्धन्यायिक प्रकरणे डिसेंबर २०१६ पर्यंत अंतिम निर्णय देवून निकाली काढणे-

(iv) एक महिन्याच्यावर प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे व त्याकरिता मंडळ मुख्यालयी फेर फार अदालत घेणे-

(v) मार्च २०१६ अखेरपर्यंत "ई फेर फार" सुविधा प्रत्येक गावात उपलब्ध करुन देणे-

(vi) भूसंपादन केलेल्या प्रकरणी कमी जास्त पत्रके तयार करुन गाव दप्तर अद्ययावत करणे-

(vii) गाव नकाशाप्रमाणे अतिक्रमीत व बंद झालेले गाडी रस्ते/ पाणंद/ पांधण/ शेतरस्ते/ शिवाररस्ते/ शेतावर जाण्याचे पायमार्ग मोकळे करणे-

(viii) जमिनीच्या अनधिकृत अकृषित वापराच्या प्रकरणांची शोध मोहिम घेऊन कारवाई करणे-

(ix) शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासन मोहीम राबविणे-

(x) इनाम व वतन जमीन शर्तभंग तपासणी व कार्यवाही करणे-

(xi) भोगवटादार वर्ग २ जमिनीचा अद्ययावत "डाटा बँक" तयार करणे-

(xii) शासकीय जमिनींवरील भाडेपट्टयांच्या नुतनीकरणासाठी विशेष मोहिम राबविणे-

**(II) <u>प्रशासकीय घटक</u> :-**

महाराजस्व अभियांनातर्गत खालील प्रशासकीय घटक, जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य पुणे व त्यांची अधीनस्त कार्यालये तसेच विभागीय आयुक्त कार्यालयापासून ते तहसिल कार्यालयापर्यंत सर्व क्षेत्रीय महसूली कार्यालयांमध्ये प्रभावीपणे राबविण्यात येतात:-

(i) सर्व संवर्गाची ज्येष्ठतासुची अद्यावत करणे:-

(ii) विविध संवर्गासाठी बिंदूनामावली अद्ययावत करुन प्रमाणित करणे व Online roster भरणे:-

(iii) पदोन्नती प्रस्ताव तयार करणे:-

(iv) प्रलंबित विभागीय चौकशी पूर्ण करणे:-

(v) सेवापुस्तके अद्ययावत करणे:-

(vi) सहा गठ्ठा पध्दतीने अभिलेख ठेवणे:-

(vii) अभिलेख कक्ष अद्ययावत करणे:-

(viii) जडवस्तु संग्रह नोंदवहीचे अद्ययावतीकरण करणे:-

(ix) महालेखापाल जमा लेखा परिच्छेदातील वसुलीची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी मोहीम राबविणे:-

(x) प्रलंबित उपयोगीता प्रमाणपत्रे महालेखापाल कार्यालयास सादर करणे:-

(xi) प्रलंबित संक्षिप्त देयकांची तपशिलवार देयके महालेखापाल कार्यालयास सादर करणे:-

(xii) मापदंडाप्रमाणे दफतर तपासणी करणे:-

.................

# भुसंपादन अधिनियम १८९४ नुसार ज्यांची शेतजमिन संपादन होईल त्या भूधारकांना पुनर्वसन अनुदान

१) शासन ठराव क्र. : आरपीए१०८३/१३६४/सीआर३३५५/र१(ए),दि. १५ डिसेंबर, १९८३.
२) शासन निर्णय क्र.: आरपीए १०८६/सीआर४०००/र-१, दि.१८ डिसेंबर, १९८६.
३) शासन निर्णय क्र.: आरपीए १०८६/सीआर३९६२/र-१, दि.२ सप्टेंबर, १९८७.

प्रकल्प विस्थापितांचे पुनर्वसन करणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

भूसंपादन अधिनियम १८९४ नुसार जमिन संपादन करताना मोबदल्याची रक्कम ठरविण्यासाठी संविधानिक तरतूदीनुसारच कारवाई करावी लागते. त्यासाठी उपलब्ध होणारा पुरावा विचारात घेऊनच ती रक्कम ठरवावी लागते. संपादन होत असलेल्या जमिनीसाठी मोबदला म्हणून दिली जाणारी रक्कम निरनिराळ्या कारणामुळे प्रत्यक्ष बाजारभावाच्या तुलनेत फारच कमी होते. मोबदल्याच्या रक्कमेबाबत न्यायालयाकडे दाद मागितल्यावर काही प्रमाणात रक्कम वाढवून मिळत असली तरी सर्वांनाच न्यायालयाकडे दाद मागणे शक्य नसते. जमिन संपादन झाल्यामुळे त्या भूधारकाने स्वत: इतरत्र जमिन खरेदी करण्याचा विचार केल्यास त्याला तत्सम जमिन मिळालेल्या मोबदल्याच्या रक्कमेत खरेदी करणे शक्य नसते. यास्तव शेतजमिन संपादन झाल्यामुळे ज्या व्यक्तींचे उपजिविकेचे साधन नष्ट होते, त्यांना जमिनीची किंमत कमी दराने मिळाल्याने आपले पुनर्वसन योग्य प्रकारे करता येत नाही. या परिस्थितीचा व शेतकऱ्यांची अर्थिक आणि सामाजिक परिस्थिती यांचा विचार करुन अशा व्यक्तींना त्यांचे पुनर्वसन योग्य त्याप्रकारे करण्यास मदत व्हावी याकरिता पुनर्वसन योग्य त्याप्रकारे करण्यास मदत व्हावी याकरिता पुनर्वसन अनुदान देण्यात येते.

................

## संरक्षित वनाच्या लगतचे क्षेत्रातील गावात सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसूचित जमाती तसेच अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना कुकिंग गॅस, बायोगॅस, दुभत्या जनावरांसाठी अनुदान व वृक्ष लागवडीचे संरक्षण योजना

शासन निर्णय क्र.: एफडीएम-२०१२/प्र.क्र. ४/फ-२, दि. १० जूलै, २०१२.

महाराष्ट्र राज्यात वनांना लागून एकंदरित १५,५०० गावे आहेत. या योजनेतंर्गत संरक्षित वनाच्या लगतच्या क्षेत्रातील गावामधील अनुसूचित जाती/जमातीच्या लाभार्थ्यांना कुकिंगगॅस, बायोगॅस, दुभत्या जनावरांसाठी अनुदान व वृक्ष लागवडीच्या संरक्षणासाठी प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे . या गावांमधील बहूतांश लोकसंख्या आदिवासी व मागासवर्गीय असून ते जळावू लाकडासाठी वनावर अवलंबून आहेत. त्यामुळे वनातील नव्याने आलेल्या फुटव्यांची तोड त्यांचेकडून केली जाते. त्यांचा विपरीत परिणाम नैसर्गिक पुर्नउत्पत्तीवर (Natural Regeneration) होत असतो.

जळावू लाकडापासून होणाऱ्या धुरामुळे महिलांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो. सदर योजना सन २०१२-१३ पासून राबविण्यांत येत आहे. या योजनेतंर्गत सर्वसाधारण, अनुसूचित जाती/जमातीच्या लाभार्थ्यांना एलपीजी गॅसचा पुरवठा सवलतीच्या दरात करण्यात येत आहे. शासनाचे अनुदान आणि लाभार्थ्यांचे आर्थिक योगदान हे अनुक्रमे ७५% व २५% असे आहे .

वनावर जळावू लाकडासाठी अवलंबून असलेल्या एका कुंटूंबाला प्रती वर्षी सर्वसाधारणपणे १ टन जळावू लाकडाची आवश्यकता असते. त्यानुंषगाने पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या वर्षी अनुक्रमे १२,८,६ आणि ४ सिलेंडर देण्याची तरतूद आहे. जेणे करुन ४ वर्षानंतर संबंधित कुटुंबाने स्वत:च्या वनालगतच्या जंगलात जाऊन जंगल तोड करु नये आणि जंगलाचे नुकसान होऊ नये, असा व्यापक आणि विस्तृत उद्देश ही योजना राबविण्यामागे आहे.

ह्या योजनेमुळे जंगलाचे संरक्षण, संवर्धन, विकास आणि व्यवस्थापन गावकऱ्यांच्या सहभागाद्वारे होण्यास मदत होते. तसेच वन्यप्राणी, पशु व पक्षी यांची वाढ होऊन जैवविविधता (BIODIVERCITY)वाढण्यास आणि टिकविण्यास मदत होते.

...............

## पाणवहाळ (Water Shed) व इतर क्षेत्रातील वनेतर सामुहिक जमिनीवर वृक्ष लागवड

शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र.:-एसएलएफ१०९३/प्र.क्र.११/जल-११, दिनांक ३ सप्टेंबर, १९९३.

१) निवडलेल्या पाणलोट क्षेत्रात जलसंधारण, जलपुर्नभरण करण्यासाठी सामुहिक / सार्वजनिक जमिनीवर वृक्ष लागवड करणे.

२) स्थानिक जनतेच्या इंधन, चारा व लहान इमारती लाकूड या गरजा भागवणे.

३) जमिनीची धूप थांबविणे, जल व मृद संधारण करणे, पर्यावरण समतोल व संतुलन टिकवणे व वाढविणे, वृक्ष आच्छादन वाढवून मानव, पशु, पक्षी आणि इतर वन्य प्राणी यांचे जीवन सुसहय करणे आणि त्यातून जैव विविधता (Bio-Diversity) वाढवणे आणि टिकवणे. त्याचप्रमाणे पाणी वाहून जाण्याचे प्रमाण कमी करणे.

४) ग्रामीण भागात रोजगाराची संधी निर्माण करणे.

राज्यात मोठया प्रमाणात वनेतर सामुदायिक जमीन आहे. सदर जमीन वृक्ष लागवडीच्या माध्यमातून उत्पादनक्षम करणे आवश्यक आहे. सध्या योजनांतर्गत कार्यक्रमात ही योजना सुरु आहे.

या योजनेतंर्गत ग्रामस्थांचा सक्रीय सहभाग प्राप्त करणेसाठी क्षेत्राचा लागवड व व्यवस्थापन आराखडा, ग्रामस्थांशी विचारविनिमय करून व त्यांच्या इच्छेनुसार तयार करण्यात येतो. वृक्ष प्रजातींची निवड ग्रामपंचायतीच्या सल्ल्याप्रमाणे राहते. वृक्ष लागवडी पासून मिळणारे उत्पादन ग्रामपंचायतीस मिळते. सदर उत्पन्नाचा वापर ग्रामपंचायतीने गावाच्या विकासासाठी प्रचलित धोरणांचे अधीन राहून करणे अपेक्षित आहे.

.................

# महाराष्ट्र राज्य विवाद धोरण- २०१४

शासन निर्णय क्र.: सीटीए-२०१६/प्र.क्र.९४/का.१९, दि.२७ ऑगस्ट,२०१४

राष्ट्रीय विवाद धोरणास आधारभूत मानुन महाराष्ट्र राज्यातील विविध न्यायालये व न्यायाधिकरणांमधील ज्या प्रकरणांमध्ये राज्य शासन व त्याची अधिकरणे प्रधान पक्षकार आहेत अशा पक्षकाराचे कार्यक्षम व जबाबदार पक्षकारामध्ये रुपांतर करण्यासाठी आणि प्रकरणांच्या जलद निपटाऱ्याकरिता प्रस्तुत धोरण तयार करण्यात आले आहे.

**राज्य विवाद धोरणाची प्रमुख उद्दीष्टे :-**

१) उच्च न्यायालयासह विविध न्यायालयांमधील, विवादातील मध्यवर्ती मुद्दांवर लक्ष केंद्रीत करुन त्यांचे संलग्नशील, समन्वित आणि कालमर्यादित पध्दतीने व्यवस्थापन करणे.

२) उच्चस्तरीय समितीमार्फत सर्व प्रलंबित असलेली मुदतबाह्य, निरुपयोगी आणि परिणामशून्य प्रकरणे निकाली काढणे,

३) शासनाच्या संदर्भातील कोणतेही अपील, रिट अर्ज, विशेष अनुमती याचिका दाखल करण्यापूर्वी प्रकरणांची काटेकोरपणे छाननी करण्याकरिता सक्षम यंत्रणा व मार्गदर्शक तत्वे उपलब्ध करुन देणे;

४) न्यायालयीन कामकाज पाहणाऱ्या शासकीय अभिकरणांच्या कामकाजात सुधारणा करुन जबाबदारीची संकल्पना मांडणे;

५) दुय्यम न्यायालयांच्या पायाभूत सोयीसुविधांमध्ये सुधारणा करुन अतिरिक्त विशेष न्यायालय जलदगती न्यायालये ( फास्ट ट्रॅक कोर्ट ) स्थापन करुन त्यांच्या मार्फत प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करणे;

**राज्य विवाद धोरणाच्या प्रमुख तरतुदी:-**

१. राज्य विवाद धोरणान्वये अधोरेखित केलेली उद्दीष्टे साध्य करण्याकरिता, सामुहिक धोरमात्मक निर्णय घेऊन त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता कार्यतंत्रविषयक योजना तयार करणे. त्यासाठी राज्यस्तरीय / विभागस्तरीय / जिल्हास्तरीय अधिकार प्रदत्त समित्यांची स्थापना करणे.

२. शासनाचे विभाग व सरकारी वकील यांच्यामधील योग्य समन्वयासाठी शासनाच्या प्रत्येक विभाग, अवर सचिवाच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या किमान एका मध्यस्त अधिकाऱ्याची नियुक्ती करेल. मध्यस्त अधिकारी क्रियाशील प्रकरण व्यवस्थापनासाठी जबाबदार असेल.

३. अनावश्यक स्थगिती/ तहकुबी टाळण्यासाठी, प्रशासकीय विभाग व सरकारी वकील यांच्यामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन, योग्य आंतरसंवादाची ( इंटरफेस ) तरतूद करण्यात येत आहे. न्यायालयीन कामकाजाकरिता जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय यांच्या प्रकरण माहिती प्रणालीवर उपलब्ध असलेल्या माहितीचा उपयोग करुन न्यायालयीन दाव्यासंबंधातील दैनंदिन कार्यवाही व घडामोडी याबाबतची माहिती संबंधितांना करुन देणे.

४. अंतरिम एकतर्फी आदेशांच्या विरुध्द अपील दाखल करण्यापूर्वी एकतर्फी आदेश रद्द करण्याकरिता एखादा अर्ज करणे योग्य ठरेल किंवा कसे याचा साकल्याने विचार कराणे.

५. ज्या दाव्यांमध्ये राज्य शासन एक पक्षकार आहे असे दावे, पर्यायी तंटा निवारण ( ADR )यंत्रणा, लोक अदालत, विशेष मोहीम, सकाळची / सांयकाळची न्यायालये, विशेष न्यायालये किंवा

६. न्यायाधिकरणे इत्यादी मार्फत सोडविण्यासाठी, संबंधित प्रशासकीय विभाग स्तरीय समिती/ जिल्हास्तरीय समिती, यांनी प्रयत्न करणे.
७. सत्र न्यायालयात चालविण्यात येणाऱ्या फौजदारी अपराधांसाठी अतिरिक्त जलदगती न्यायालये स्थापन करण्यात येतील. तसेच संवेदनशील प्रकरणे हाताळण्यासाठी विशेष न्यायालयांची स्थापना करण्यात येते.

**संनियंत्रण व पुनर्विलोकन यासाठी नवीन समित्यांची स्थापना:-**

प्रलंबित प्रकरणांच्या एकूण संख्येपैकी बऱ्याच मोठ्या प्रमाणातील प्रकरणांमध्ये राज्य शासन एक पक्षकार म्हणून आहे. राज्य विवाद धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढीलप्रमाणे समित्या असतील:-

१ राज्यस्तरावरील अधिकार प्रदत्त समिती
२ विभागीय स्तरावरील अधिकार प्रदत्त समिती
३ जिल्हा स्तरावरील अधिकार प्रदत्त समिती
४ मध्यस्त ( नोडल ) अधिकाऱ्यांची नियुक्ती

**शासनाचे प्रतिनिधित्व:-**

सरकारी अधिवक्ते/अभियोक्ते यांची निवड प्रक्रिया निश्चित करणे आणि प्रख्यात, लौकिक असलेल्या, सचोटीच्या व चारित्र्याच्या अधिवक्त्यांची राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड करणे.

**तहकुबी( Adjournments ):-**

अनावश्यक स्थगिती / तहकुबी टाळण्यासाठी, माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन, शासकीय विभाग व सरकारी वकील यादरम्यान योग्य आंतरसंवादाचा ( इंटरफेस ) तरतूद करण्याचा राज्य शासन विचार करील. अशा आंतरसंवादाचा( इंटरफेस ) वापर करुन, शासकीय विभागाला सरकारी वकील किंवा मध्यस्त अधिकारी यांच्यासोबत, कोणतीही माहिती, संदेश, कागदपत्रे, मसुदे आणि आदेश इत्यादि यांची देवाणघेवाण करणे शक्य होईल. ही प्रक्रिया विलंब कमी करु शकेल व वांरवार घेण्यात येणारी तहकुबी कमी होऊ शकेल.

**अपीले/पुर्नरीक्षणे दाखल करणे:-**

अंतरिम एकतर्फी आदेशांच्याविरुध्द अपील दाखल करण्यापूर्वी एकतर्फी आदेश रद्द करण्याकरिता एखादा अर्ज दाखल करणे योग्य ठरेल किंवा कसे याचा साकल्याने विचार करण्यात येईल. केवळ अपवादात्मक परिस्थितीमध्ये अपील किंवा पुनरीक्षण अर्ज यांचा अवलंब करण्यात येईल. कर्मचाऱ्यांच्या एका घटकाचा दुसऱ्या घटकाविरुध्द बाजू उचलून धरण्याच्या कारणास्तव अपीलाच्या उपाययोजनेचा अवलंब करण्यात येणार नाही.

**अपील दाखल करण्यात विलंब:-**

न्यायालयाने दिलेल्या अंतिम किंवा अंतरिम निर्णयाबाबत कोणताही वेळ न घालवता, संबंधित विभागाला सरकारी अधिवक्त्याने माहिती कळविणे आवश्यक असेल. विलंबाच्या माफीसाठी करावयाचा अर्ज हा योग्य निदेश, आधारभूत कागदपत्रे यासोबत विलंबाकरिता असलेल्या कारणांच्या तपशिलासह तयार करण्यात येईल. विलंबासंबंधात योग्य स्पष्टीकरण देण्यात आले आहे. आणि अर्जात नमूद केलेल्या तपशीलासंबंधात माहिती असणाऱ्या संबंधित व्यक्तींकडून अर्ज प्रतिज्ञेवर सादर करण्यात आला आहे याची मध्यस्त अधिकारी खात्री करून घेईल.

**पर्यायी तंटा निवारण यंत्रणा ( ADR ) :-**

ज्या ज्या दाव्यांमध्ये राज्य शासन हे पक्षकारांपैकी एक पक्षकार असते त्याबाबतीत, पर्यायी तंटा निवारण यंत्रणेमार्फत ते सोडविण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करील. प्रत्येक विभाग स्तरावरील अधिकार प्रदत्त समिती, सर्वाधिक चांगल्यारितीने पर्यायी तंटा निवारण यंत्रणेचा वापर करण्याच्या प्रयोजनार्थ सर्व प्रकरणांचे पुनर्विलोकन करील.

**विशेषीकृत वाद** :-

निविदा किंवा करारासंदर्भात उद्भवणा-या प्रकरणांचा संविधानात्मक अत्यावश्यकता आणि सुशासन या गोष्टी विचारात घेवून योग्यपणे बचाव करण्यात येईल.

**जनहित याचिका** :-

जनहित याचिकांच्या बाबतीत संतुलित दृष्टीकोन असला पाहिजे. शासनाला गैरसोयीची असणारी गोष्ट न्यायालयाला करू दे म्हणून, जनहित याचिकेकडे कोणी पाहू नये.

**सार्वजनिक क्षेत्र उपक्रम विषयक वाद** :-

सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांमध्ये परस्परांत वाद टाळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजे. पर्यायी तंटा निवारण पध्दतीचा स्वीकार करून कमी खर्चात वाद टाळला पाहिजे.

**जलदगती न्यायालये** :-

केंद्र सरकार पुरस्कृत योजनेअंतर्गत जलदगती न्यायालये स्थापन करण्यात आल्यामुळे सत्र न्यायालयांमधील न्यायालयीन चौकशीयोग्य प्रकरणे मोठया प्रमाणात कमी झाली आहेत. काही विशेष प्रकारच्या प्रकरणांना संवेदनशीलपणे हाताळण्यासाठी जलदगती न्यायालये आवश्यक ठरली आहेत.

नियमित न्यायालयाव्यतिकरक्त विशेष न्यायालये, न्यायाधिकरणे व प्राधिकरणे यांच्यापुढे प्रलंबित असलेली प्रकरणे निकालात काढण्यासाठी त्यांच्या संख्यात्मक व गुणात्मक विल्हेवाटीचे निर्धारण करण्यासाठी विल्हेवाटीचे निश्चित प्रमाणक ( norms ) ठरवून त्यानुसार आवश्यक उपाययोजना हाती घेण्यात येतील.

..................

# ग्रामीण पायाभूत विकास निधी

नाबार्ड अधिनियम, १९८१ च्या कलम २७ (ए) अन्वये राबविण्यात येते.

**योजनेचा उद्देश:-** सन १९९५-९६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये दिनांक १५ मार्च, १९९५ रोजी नाबार्ड(National Bank for Agriculture and Rural Development) अंतर्गत ग्रामीण पायाभूत विकास निधी मालिका (Rural Infrastructure Development Fund) सुरू करण्यात आली. सदर योजनेचा उद्देश हा राज्ये व राज्यांतर्गत महामंडळाना ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचे लहान व मध्यम स्वरूपाचे चालू प्रकल्प (on going Projects) उदा. पाटबंधारे, भूसंधारण इत्यादींना तातडीने पूर्ण करण्यासाठी अर्थसहाय्य करणे हा आहे.

**योजनेची माहीती** :- नाबार्ड या वित्तीय संस्थेकडून रस्ते विकासासाठी राज्यास प्रतिसाधीत कर्ज सहाय्य मंजूर करण्यात येते. या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पायाभूत विकास निधि (Rural Inffrastructure Development Fund) अंतर्गत प्रमुख जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्याचे व इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गावरील पुलांचे विविध प्रकल्प हाती घेण्यात येतात. प्रकल्पांच्या अदांजित किंमतीच्या ८० टक्के कर्जसहाय्य देण्यात येते तर २० टक्के शासन सहभाग असतो. सदर कर्जसहाय्य प्रकल्पावर झालेला खर्च प्रतिपुर्ती स्वरुपात शासनास उपलब्ध होतो. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांना सदर योजनेसाठी संनियंत्रण व समन्वय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. तसेच सर्व मुख्य अभियंता त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामांचा दरमहा आढावा घेतात. आणि मा.सचिव (रस्ते) यांच्या स्तरावरुन बैठकीत योजनेच्या प्रगतीबाबत आढावा घेण्यात येतो.

नाबार्ड अंतर्गत खेडी जोडण्यासाठी आवश्यक पूल/कॉजवे, पूरहानीग्रस्त पूलाची सुधारणा (Reconstruction), प्रजिमाच्या सुधारणेची कामे, महत्वाच्या जिल्हा रस्त्यावरील सुटलेले पूल / कॉजवे यांचे बांधकाम तसेच प्रमुख बाजारपेठा, शहरे यांना जोडणा-या प्रमुख जिल्हा मार्गांची, तसेच अतिशय खराब अवस्थेत असलेल्या प्रमुख जिल्हा मार्गांच्या सुधारणांची कामे या कामांचा प्राधान्याने समावेश करण्यात येतो. नाबार्डला शिफारस केलेल्या कामांची नाबार्डकडून छाननी करण्यात येते व नाबार्ड वित्तीय संस्थेकडून मंजूर कामे विधीमंडळाच्या मंजुरीने अर्थसंकल्पित केली जातात.

नाबार्ड कर्जसहाय्य योजनेंतर्गत कामे पूर्ण झाल्यावर नाबार्ड संस्थेस काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र (पी.सी.आर.) सादर केल्यावर त्या कामावरील नाबार्डच्या कर्जाचा हिस्सा राज्य शासनास वितरीत करण्यात येतो. विभागाच्या कार्यपध्दतीनुसार नाबार्ड कर्जसहाय्य योजनेंतर्गत मंजूर झालेल्या कामाच्या सर्व खर्चाचा तपशील प्रतिपूर्तीकरीता नाबार्ड संस्थेकडे सादर करण्यात येतो व त्यापैकी नाबार्ड कर्जसहाय्य योजनेंतर्गत देय असलेले कर्ज नाबार्डकडून राज्य शासनास मंजूर करण्यात येते.


.........................

# केंद्रीय मार्ग निधी

केंद्रीय मार्ग निधी कायदा २००० आणि सन २००७ ची अधिसूचना.

देशातील विशेष महत्वाच्या अशा रस्ते व पुलांची कामे, संशोधन व प्रशिक्षण इत्यादी बाबी ज्यांच्याकडे सर्वसाधारण योजना म्हणून पुरेसे लक्ष देणे शक्य होत नाही, त्यामुळे अशा बाबींसाठी केंद्र शासनानरे केंद्रीय मार्ग निधी निर्माण केला आहे.

योजनेची माहिती :- संसदेने केंद्रीय मार्ग निधी अधिनियम २००० अन्वये विक्री होणा-या डिझेल व पेट्रोलच्या प्रत्येक लिटर मागे एक रुपया अधिभार लावून त्यातून जमा होणारा निधी केंद्रीय मार्ग निधी म्हणून निश्चित केला आहे. या रकमेचे वाटप राज्यांना खालीलप्रमाणे होते :-




या योजनेंतर्गत मंजूर रस्ते व पूलांच्या कामांसाठी राज्य शासनामार्फत प्रथमत: योजनांतर्गत तरतूद करून खर्च करण्यात येते. सदर खर्चाचे प्रमाणपत्र केंद्र शासनास दिल्यानंतर या खर्चाची प्रतिपूर्ती ( Reimbursement ) केंद्र शासनाकडून करण्यात येते. या योजनेंतर्गत केंद्र शासनाने विहित केलेल्या प्रमुख मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे आहेत:-

१) केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत प्रस्ताव पाठविताना राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग आणि इतर महत्वाच्या मार्गावरील कामे पाठविण्यात यावीत. शहरी भागातील रस्त्यांची कामेही पाठविता येतील. परंतू ग्रामीण मार्गाच्या कामांना पंतप्रधान ग्राम सडक योजनेंतर्गत निधी उपलब्ध होत असल्याने सदर कामे केंद्रीय मार्ग निधीअंतर्गत प्रस्तावित करू नयेत.

२) भूसंपादनाचा अंतर्भाव असलेली रस्ते व पूल कामे पाठवू नयेत. जागा शासनाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत सादर करावे.

३) प्रस्तावित रस्त्याची लांबी कमीत कमी १० कि.मी. असावी.

४) प्रस्तावित कामांचे प्रस्ताव तयार करताना केंद्र शासनाने विहित केलेल्या सुधारित नमून्यात तयार करावी.

............

# सार्वजनिक खाजगी सहभाग  सहभाग धोरण २०१४

शासन निर्णय क्रमांक- खाक्षेस-२००८/प्र.क्र.८३/रस्ते-९, दिनांक ३१  जुलै २०१४.

सार्वजनिक खाजगी सहभाग धोरणामध्ये एकसूत्रता आणण्याच्या दृष्टीने व या धोरणानुसार हाती घ्यावयाच्या प्रकल्पांची व्याप्ती, दोन पथकर स्थानकांमधील अंतर, उपभोक्ता शुल्काचे दर, वाहनांचा प्रकार, इत्यादी निकषांसह कालपरत्वे धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक खाजगी सहभागासंबंधीचे धोरण प्रथमत: दिनांक २७ जून २००० रोजी प्रसिध्द केले. त्यानंतर सुधारित धोरण दिनांक ९ जानेवारी २००३ व दिनांक ३० जुलै २००९ रोजी लागू केले आहे. याबाबतीत क्षेत्रीय स्तरावर उद्भवलेल्या अडचणी विचारात घेऊन शासनाने वेळोवेळी परिपत्रके व मार्गदर्शक सूचना आवश्यकतेप्रमाणे निर्गमित केल्या आहेत. आतापर्यंत निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय, परिपत्रके, मार्गदर्शक सूचना, सार्वजनिक खाजगी सहभाग धोरणासंबंधी शासन स्तरावर झालेल्या चर्चा, शासनाकडे प्राप्त झालेल्या सूचना / अहवाल विचारात घेऊन सार्वजनिक खाजगी सहभाग धोरण- २०१४ दिनांक २१ जुलै, २०१४ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

.......................

# राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३

केंद्र शासनाने दि.५ जुलै, २०१३ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ देशात लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार देशपातळीवर ग्रामीण भागातील ७५ टक्के व शहरी भागातील ५० टक्के नागरिक प्रत्येक महिन्यास अनुदानीत दराने धान्य मिळण्यास हक्कदार असतील. यापैकी सध्या लाभ घेत असलेल्या अंत्योदय अन्न योजनेखालील सर्व कुटुंबांना प्रचलित निकषाप्रमाणे प्रतिमाह ३५ किलो धान्याचे वाटप चालू राहील. तर प्राधान्य कुटुंबातील लोकांना प्रतिव्यक्ती प्रतिमाह ५ किलो याप्रमाणात धान्य मिळेल. रास्तभाव दुकानातून ₹३/- प्रति किलो या दराने तांदूळ, ₹२/- प्रति किलो या दराने गहू व ₹१/- प्रति किलो या दराने भरडधान्य देण्याची तरतूद अधिनियमात आहे.

सदर अधिनियमातील तरतुदीनुसार सवलतीच्या दराने धान्य मिळण्यास राज्यातील पात्र लोकसंख्येची व्याप्ती खालीलप्रमाणे आहे:-

| ग्रामीण | शहरी | एकूण |
|---|---|---|
| ७६.३२ % (४.७० कोटी) | ४५.३४ % (२.३० कोटी) | ६२.३० % (७.०० कोटी) |

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी निकष ठरविण्याबाबत मा.मंत्रिमंडळ उपसमितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने सद्यस्थितीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांनी विहित नमुन्यात नमूद केलेल्या वार्षिक उत्पन्नानुसार शहरी भागात कमाल ₹ ५९०००/- पर्यंत उत्पन्न असणारे लाभार्थ्यांचा पात्र लाभार्थी म्हणून व ग्रामीण भागात कमाल ₹४४,०००/- पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या लाभार्थ्यांचा पात्र लाभार्थी म्हणून समावेश करण्यात आला आहे. ही योजना संपूर्ण राज्यात दि.१ फेब्रुवारी, २०१४ पासून लागू करण्यात आली आहे.

राज्यामध्ये सद्य:स्थितीत ८७७.१९ लक्ष एपीएल, बीपीएल व अंत्योदय वर्गवारीतील लाभार्थ्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्नधान्याचा पुरवठा करण्यात येतो. केंद्र शासनाने प्रस्तुत कायद्याअंतर्गत राज्यातील फक्त ७००.१७ लक्ष लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ दिला आहे. सध्या लाभ घेत असलेल्या अंत्योदय अन्न योजना व बीपीएल मधील सर्व व एपीएल (केशरी) मधील काही लाभार्थ्यांचा सदर योजनेत समावेश करण्यात आला आहे.

.............

## आधारभूत किंमत खरेदी योजना व धान भरडाई

शासन निर्णय क्र. खरेदी १०१४/५८७/प्र.क्र.१२९/नापु-२९, दिनांक- ३० ऑक्टोंबर, २०१४.

या योजनेअंतर्गत केंद्र शासन निरनिराळया पिकांच्या किमान आधारभूत किंमती जाहीर करते व याशिवाय आधारभूत किंमतीचा लाभ होण्याच्या दृष्टीने, शेतक-यांना हमी भावापेक्षा कमी किंमतीने (डीस्ट्रेस सेल) धान्य विकावे लागू नये म्हणून शासनातर्फे धान्याची (एफ.ए.क्यू.) खरेदी करण्यात येते. महाराष्ट्र राज्यात केंद्र शासनाची "नोडल एजन्सी " म्हणून भारतीय अन्न महामंडळ काम पाहते, तर भारतीय अन्न महामंडळाच्या वतीने राज्य शासन महाराष्ट्र राज्यात आधारभूत किंमत खरेदी योजनेची शासन मान्य अभिकर्ता संस्थेमार्फत ( बिगर आदिवासी क्षेत्रात मार्केटिंग फेडरेशन व आदिवासी क्षेत्रात आदिवासी विकास महामंडळ ) अंमलबजावणी करण्यात येते. केंद्र शासनाची आधारभूत किंमत खरेदी योजना ही शेतकऱ्यांच्या हितासाठी आहे.

सदर योजनेअंतर्गत मार्केटिंग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळ या दोन्ही अभिकर्ता संस्थांमार्फत खरेदी केलेल्या धानाची भरडाई मिलर्समार्फत करण्यात येऊन येणारा सी.एम.आर.(तांदूळ) भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामात जमा करण्यात येतो. तदनंतर, सदरहू योजनेअंतर्गत धान खरेदीसाठी झालेल्या खर्चाची भरपाई (किमान आधारभूत किंमत व अनुषंगिक खर्च) केंद्र शासनाकडून राज्य शासनास करण्यात येते.

तर, या योजनेअंतर्गत खरेदी करण्यात आलेले भरडधान्य(ज्वारी, बाजरी व मका) यांची साठवणूक संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांच्या ताब्यातील गोदामामध्ये करण्यात येते. केंद्र शासनाच्या / भारतीय अन्न महामंडळाच्या सुधारीत निर्देशानुसार खरेदी हंगाम संपल्यानंतर खरेदी केलेल्या भरडधान्याची विल्हेवाट राज्यशासनामार्फत (सार्वजनिक वितरण व्यवस्थेकरिता किंवा इ-लिलावाद्वारे विक्री करण्याकरिता )करावयाची आहे. ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर किमान आधारभूत खरेदी योजना राबविण्यासाठी आलेल्या खर्चाची भरपाई केंद्र शासनाकडून होत असते. दरम्यानच्या कालावधीमध्ये राज्य शासनाच्या स्वीय प्रपंची खात्यामधून (PLA) हा खर्च भागविण्यात येतो.

...............

## वैधमापन शास्त्र यंत्रणा

ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी शासनाने वैधमापन शास्त्र यंत्रणेची स्थापना केली आहे. वैधमापन शास्त्र यंत्रणा राज्य शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग अंतर्गत कार्य करते. भारत सरकारच्या वैधमापन शास्त्र कायदे व नियमांची अंमलबजावणी या यंत्रणेमार्फत करण्यात येते .

नियंत्रक हे या संस्थेचे प्रमुख म्हणून काम पहातात. या यंत्रणेची राज्यात खालीलप्रमाणे कार्यालये आहेत.

- उप नियंत्रक - प्रादेशिक स्तर (८)
- सहायक नियंत्रक - जिल्हा स्तर (४६)
- निरीक्षक - तालुका स्तर (२८२)

**वैधमापन शास्त्र यंत्रणेमार्फत खालील अधिनियम व नियमांची अंमलबजावणी करण्यात येते:**

१) वैधमापन शास्त्र अधिनियम, २००९
२) वैधमापन शास्त्र (सर्व साधारण) नियम, २०११
३) वैधमापन शास्त्र (आवेष्टित वस्तू) नियम, २०११
४) महाराष्ट्र वैधमापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११
५) वैधमापन शास्त्र (नमूना मान्यता) नियम, २०११
६) वैधमापन शास्त्र (न्युमरिक) नियम, २०११
७) भारतीय विधीक माप संस्था नियम, २०११

ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी नियमितपणे वजन व मापांची पडताळणी वैधमापन शास्त्र यंत्रणेकडून करण्यात येते. निरीक्षक कार्यालयामार्फत वेळोवेळी तपासणी करून दोषी आस्थापनेविरूध्द कारवाई करण्यात येते. वजन व मापे वापरून व्यवसाय करणा-या सर्व आस्थापना यांनी त्यांच्याकडील वजन व मापांची नियमित पडताळणी करून मुद्रांकन करणे बंधनकारक आहे. त्यासाठी ४९४९ परवानाधारक नेमण्यात आलेले आहेत.

**वैधमापन शास्त्र यंत्रणेतील प्रयोगशाळा:**

वैधमापन शास्त्र यंत्रणेचे बळकटीकरण करण्यासाठी केंद्र शासनाने प्रती प्रयोगशाळा ₹ २५.०० लक्ष एवढे अनुदान पुरवण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

..............

# ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६

ग्राहकांच्या हिताचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या हेतूने केंद्र शासनान २४ डिसेंबर १९८६ रोजी "ग्राहक संरक्षण कायदा" अंमलात आणला. आपल्या देशाच्या सामाजिक आणि आर्थिक कायद्यांच्या इतिहासात ही एक महत्त्वाची घटना आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अधिनियमात खालीलप्रमाणे यंत्रणा असावी असे निर्देशित केलेले आहे:-

(१) ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण व संवर्धन व्हावे यासाठी:-

(अ) केंद्रिय स्तरावर केंद्रिय ग्राहक संरक्षण परिषद

(ब) राज्य स्तरावर राज्य ग्राहक संरक्षण परिषद

(क) जिल्हा स्तरावर जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदा यांची स्थापना करणे.

(२) ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्याच्या दृष्टीने :-

(अ) केंद्रिय स्तरावर राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग

(ब) राज्य स्तरावर राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग

(क) जिल्हा स्तरावर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच

राज्यामध्ये या कायद्याची अंमलबजावणी योग्य तऱ्हेने व्हावी म्हणून मूळ कायद्यातील तरतूदींना सुसंगत अशी नियमावली महाराष्ट्र शासनाने दि.२० नोव्हेंबर १९८७ रोजी "महाराष्ट्र ग्राहक संरक्षण नियम, १९८७ "या नावाने अधिसूचित केली. त्यानंतर आढळलेल्या त्रुटी व अडचणी लक्षात घेवून "महाराष्ट्र ग्राहक संरक्षण नियम २०००" हे नवे नियम तयार करून ते दि.१६ फेब्रुवारी,२००० पासून अंमलात आणले. त्यानंतर सदर नियमात " महाराष्ट्र ग्राहक संरक्षण (सुधारणा) नियम २००४," दि.२२.२.२००५, "महाराष्ट्र ग्राहक संरक्षण (सुधारणा) नियम, २००६" दि.२९.५.२००७, "महाराष्ट्र ग्राहक संरक्षण (सुधारणा) नियम २००९," दि.१५.४.२००९ अन्वये सुधारणा करण्यात आली असून त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.

या अधिनियमानुसार अभिप्रेत असलेल्या राज्य स्तरावरील व जिल्हा स्तरावरील यंत्रणा राज्यात उभारण्यात आलेल्या आहेत. याबद्दलचा तपशील थोडक्यात खालीलप्रमाणे आहे:-

(१) **राज्य आयोग:-** राज्यात "राज्य आयोगाची" स्थापना दिनांक ३१ ऑक्टोबर १९८९ पासून करण्यात आली.राज्य आयोगाच्या अध्यक्षपदी मा.उच्च न्यायालयाचे कार्यरत किंवा निवृत्त न्यायाधीशांची नेमणूक करण्यात येते. राज्य आयोगाच्या न्यायिक व गैरन्यायिक सदस्यांची नियुक्ती विशिष्ट निवडप्रक्रियेचा अवलंब करुन राज्य आयोगाच्या अध्यक्षांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांमधून केली जाते. राज्य आयोगाचे मुख्य कार्यालय मुंबई येथे कार्यरत असून

राज्य आयोगासमोरील प्रलंबित प्रकरणांची संख्या विचारात घेऊन राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे नागपूर व औरंगाबाद येथे सर्किट बेंच (परिक्रमा खंडपीठ) कार्यान्वित करण्यात आले आहे. रुपये २० लाख ते रुपये एक कोटी पर्यंतच्या किंमतीचे दावे राज्य आयोगाकडून हाताळण्यात येतात.

(२) **जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच** :- जिल्हा मंचावर अध्यक्ष व दोन सदस्यांची नेमणूक करण्यात येते.जिल्हा मंचाच्या अध्यक्ष पदी कार्यरत /निवृत्त जिल्हा न्यायाधीश किंवा जिल्हा न्यायाधीश होण्याची अर्हता ज्या व्यक्तीकडे असेल अशा व्यक्तीची नियुक्ती करण्यात येते. जिल्हा ग्राहक मंचाच्या गैरन्यायिक सदस्यांची नियूक्ती विशिष्ट निवडप्रक्रियेचा अवलंब करुन राज्य आयोगाच्या अध्यक्षांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांमधून केली जाते. राज्यात प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र जिल्हा मंचाची स्थापना करण्यात आली आहे. त्याशिवाय मुंबई( शहर ),मुंबई (उपनगरे),पुणे,नागपूर व ठाणे येथे ग्राहकांच्या तक्रारीचे प्रमाण जास्त असल्यामुळे या जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी एक असे एकूण पाच अतिरिक्त जिल्हा मंच स्थापन करण्यात आले आहेत. सध्या जिल्हा स्तरावर एकूण ४० जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच कार्यान्वित करण्यात आले आहेत. रुपये २० लाख पर्यंतचे दावे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचामध्ये हाताळले जातात.

...................

# नागरी दलित वस्ती सुधारणा योजना

शासन निर्णय क्र. विघयो१०२०००/१५९२/प्र.क्र.१८९/नवि-४, दिनांक- ५ मार्च, २००२.

नागरी दलित वस्ती सुधारणा योजना सन १९९५-९६ पासून सुरु केलेली आहे. या योजनेचे सुधारीत व सर्वकष निकष तसेच योजनेची कार्यपध्दती शासन निर्णय क्र. विघयो १०९७/१६७३/प्र.क्र.४४/९७/नवि-४, दिनांक ५ फेब्रुवारी, १९९८ अन्वये विहित करण्यात आलेली आहे. नागरी दलित वस्ती सुधारणा योजना ही जिल्हास्तरीय व विशेष घटक लाभार्थीसाठीची योजना असल्याने या योजनेच्या तरतूदी विशेष घटक योजनेच्या जिल्हा वार्षिक योजनेमधून उपलब्ध केल्या जातात. अशाच प्रकारची योजना ग्रामीण भागासाठी समाजकल्याण विभागामार्फत ( सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग ) राबविण्यात येते. विकेंद्रीकरणाच्या धोरणास अनुसरुन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दि.४ नोव्हेंबर, २००० च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण भागातील “दलित वस्ती सुधारणा योजना” ही योजना जिल्हापरिषदेकडे वर्ग करण्याचा निर्णय घेतला आहे. याच धर्तीवर नागरी भागासाठी जिल्हास्तरावरील संनियंत्रण संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्याबाबत आणि योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी करीता आवश्यक मार्गदर्शक तत्वे दि. ५ मार्च, २००२ च्या शासन निर्णयान्वये विहित केली आहेत. या योजनेसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग नियत व्यय उपलब्ध करुन देतो. जिल्हानिहाय वाटप समाजकल्याण आयुक्तांकडून ठरवून दिले जाते. त्यानंतर जिल्हानिहाय वितरण नगरविकास विभागाकडूनच केले जाते. या योजनेखाली हाती घ्यावयाच्या कामांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीस आहेत.

..................

# महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान

शासन निर्णय क्र. अशस १४०७/३६०/प्र.क्र. २११ /नवि-२०, दि. ३१ ऑगस्ट,२००९.

महाराष्ट्र राज्यात राज्या स्तरीय अग्निशमन सेवा नाही. नागरीकांना अग्निशमन सेवा पुरविण्याची जबाबदारी ही प्रामुख्याने महानगरपालिका/नगरपरिषदा/नगर पंचायती तसेच विशेष नियोजन प्राधिकरणे यांची आहे. केंद्र शासनाच्या स्थायी अग्निशमन सल्लागार कौन्सिलच्या अग्निशमन सेवेबाबत प्रसिध्द केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार शासनाने “ड” वर्ग महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगर पंचायती यांच्या अग्निशमन सेवांच्या त्रुटींचा आढावा घेतला. राज्य शासनाने महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ हा कायदा पहिल्या टप्प्यात राज्यातील नागरी भागात व विशेष नियोजन प्राधिकार क्षेत्रात दि. ६.१२.२००८ पासून आणि महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९ दि.२३.०६.२००९ पासून लागू केले. या अधिनियम व नियमांतील तरतूदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आणि अग्निशमन सेवांचे बळकटीकरण व विस्तरीकरणाद्वारे अग्निशमन सेवेतील तूट भरुन निघेपर्यंत शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.अशस १४०७ / ३६० / प्र.क्र. २११ / नवि-२०, दि. ३१ ऑगस्ट,२००९ नुसार **महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान** राबविण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान ही योजना एकूण २८५.०० कोटींची असून त्यामध्ये शासनाचा हिस्सा २०३.८४ कोटीचा आहे. व उर्वरित रु.८१.१६ कोटीचे अनुदान संबंधीत ड वर्ग महानगरपालिका / नगरपरिषदा / नगर पंचायतींचा हिस्सा आहे. या अभियानांतर्गत राज्य अग्निशमन अकादमीसाठी उपकरणे उपलब्ध करुन देण्यात येणार असून एक अदयावत अशी प्रगत अग्निशमन अकादमी प्रस्थापित करण्यात येणार आहे.

................

# राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान व राज्य नागरी उपजीविका अभियान

शासन निर्णय क्र.एनयुएल-२०१४/ प्र.क्र.१०४/नवि-३३, दि. २८.०८.२०१४

केंद्र शासन पुरस्कृत “सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना” देशात सन १९९७ पासून कार्यान्वित होती. १२ व्या पंचवार्षिक योजनेत सदरहु योजनेची पुनर्रचना करुन त्याचे राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान ( National Urban livelihoods mission ) मध्ये रुपांतर करण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रीमंडळाच्या आर्थिक व्यवहार समितीच्या दि.३ सप्टेंबर, २०१३ च्या बैठकीत घेण्यात आला.

राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाद्वारे शहरी दारिद्रयाचे प्रमाण कमी करणे, शहरी गरीब कुटुंबातील व्यक्तींना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन रोजगाराची किंवा स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावणे, नागरी भागातील बेघरांना मूलभूत सेवा उपलब्ध असलेल्या निवाऱ्याची सुविधा उपलब्ध करणे, नागरी भागातील फेरीवाल्यांच्या उपजिविका संबंधी समस्या सोडविण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करणे व त्याद्वारे शहरी गरीब कुटुंबाच्या राहणीमानाचा दर्जा सुधारुन शहरी दारिद्रय कमी करण्याबाबत उपाययोजना केली जाते.

केंद्र शासनाच्या धोरणानुसार “राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाची ” अंमलबजावणी सन २०११ च्या जनगणनेनुसार सुमारे १ लक्ष पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरात व १ लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या परंतु जिल्हा मुख्यालय असलेल्या शहरात केली जाणार आहे. त्या अनुषंगाने केंद्र शासनाने अभियानाच्या अंमलबजावणीकरीता राज्यातील एकूण ५३ शहरांची निवड केली आहे.

राज्यातील उर्वरीत २०६ शहरांचा राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानातंर्गत समावेश करण्यात आला नसल्यामुळे या शहरातील दारिद्रय रेषेखालील नागरीकांचे राहणीमान उंचावण्याकरीता व त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्याकरीता राष्ट्रीय नागरी उपजिवीका आभियानाच्या धर्तीवर राज्य शासन पुरस्कृत स्वतंत्र “राज्य नागरी उपजिविका अभियान ” राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

अभियानाची उद्दीष्टये:-

- नागरी गरीब लोक, त्यांच्या संस्थांची क्षमता बांधणी करणे, उपजीविकेचा विकास व नागरी दारिद्रय निर्मुलन करणारी यंत्रणा यांची क्षमता वाढविणे,
- नागरी गरीब कुंटुंबातील व्यक्तींना उपजिविकेच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देणे,
- बाजाराच्या औद्योगिक गरजेनुसार व आवश्यकतेनुसार, विविध क्षेत्रांच्या गरजा लक्षात घेऊन नागरी गरीब व्यक्तींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे.
- नागरी गरिबांच्या लघुउद्योगांना चालना देणे.
- नागरी बेघर लोकांसाठी कायमस्वरूपी व मूलभूत सोयी सुविधा असलेल्या निवाऱ्याची सोय करणे.
- नागरी फेरीवाल्यांच्या उपजिविकेच्या समस्या सोडवून त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.

....................

# महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान

शासन निर्णय क्र.: नगरो-२०१४/प्र.क्र.११९/नवि-३३, दि.२१ ऑगस्ट, २०१४.

राज्यातील लहान व मध्यम शहरात आवश्यक त्या पायाभूत सुविधांची निर्मिती करणे, उपलब्ध पायाभूत सुविधांची श्रेणीवाढ करणे व त्या अनुषंगाने नागरिकांना पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देणे, हे या योजनेचे उद्दीष्ट आहे.

**अभियानाची व्याप्ती :-**

राज्यात अस्तित्वात असलेल्या सर्व नगरपरिषदा, नगरपंचायती व “ड” वर्ग महानगरपालिका “महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानात” सहभाग घेऊ शकतील.

**वित्तीय आकृतीबंध :-**

“महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियाना”अंतर्गत मंजूर होणाऱ्या प्रकल्पांकरीता वित्तीय आकृतीबंध पुढीलप्रमाणे राहील:-

| अ.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | वित्तीय आकृतीबंध | |
|---|---|---|---|
| | | मंजूर प्रकल्प किंमतीपैकी राज्य शासनाचा अनुज्ञेय हिस्सा (टक्के) | मंजूर प्रकल्प किंमतीपैकी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने उभा करावयाचा हिस्सा (टक्के) |
| १. | “ड” वर्ग महानगरपालिका | ७० | ३० |
| | | मंजूर प्रकल्प किंमतीपैकी राज्य शासनाचा अनुज्ञेय हिस्सा (टक्के) | मंजूर प्रकल्प किंमतीपैकी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने उभा करावयाचा हिस्सा (टक्के) |
| २. | “अ” वर्ग नगरपरिषद | ७५ | २५ |
| ३. | “ब” वर्ग नगरपरिषद | ८५ | १५ |
| ४. | “क” वर्ग नगरपरिषद/ नगरपंचायत | ९० | १० |

“ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत” प्रकल्प मंजूर करताना खालीलप्रमाणे पायाभूत सुविधांना प्राधान्य देण्यात येते.

१) पाणीपुरवठा

२) मलनिस्सारण:

३) घनकचरा व्यवस्थापन:

४) नागरी दळणवळण:-

५) सामाजिक सोयी व सुविधांचा विकास.

..................

## स्वच्छ महाराष्ट्र अभियान

शासन निर्णय क्र.:स्वभाअ-२०१५/प्र.क्र.२३/नवि-३४, दि.१५ मे, २०१५.

**योजनेचा उद्देश :-**

(१) उघडयावरील शौचविधी बंद करणे.

(२) हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांना या कामातून मुक्त करणे.

(३) नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी आधुनिक व शास्त्रोक्त पध्दतीचा अवलंब करणे.

(४) स्वच्छतेच्या चांगल्या पद्धतीच्या अनुषंगाने सवयींमध्ये बदल करणे.

(५) स्वच्छते विषयी जागरूकता निर्माण करणे आणि त्याची सार्वजनिक आरोग्याशी सांगड घालणे.

(६) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची क्षमता वाढविणे.

(७) भांडवली खर्च आणि ऑपरेशन आणि देखभाल यासाठी खाजगी संस्थांच्या सहभागासाठी सुयोग्य वातावरण निर्माण करणे.

**अभियानाचे धोरण :-**

(१) स्वच्छतेचा व्यापक आराखडा ज्यामध्ये-

(i) शहर स्तरावरील स्वच्छतेचा आराखडा.

(ii) राज्याची स्वच्छतेची संकल्पना.

(iii) राज्याचे स्वच्छतेचे धोरण.

(२) सवयींमध्ये बदलाचे धोरण आणि माहिती, शिक्षण व संपर्क.

(३) खाजगी संस्थांच्या सहभागासाठी सुयोग्य वातावरण निर्माण करणे.

(४) क्षमता बांधणी.

**विशेष लक्ष केंद्रित करणे-**

(i) नागरी भागातील हाताने मैला उचलणाऱ्या सर्व सफाई कामगांरांचा शोध घेवून ते काम करीत असलेल्या इन-सॅनिटरी शौचालयांचे सॅनिटरी शौचालयामध्ये रूपांतर करून त्या मैला सफाई कामगारांची या कामामधून सूटका करून त्यांचे पुनर्वसन करणे.

(ii) घनकचरा व्यवस्थापनात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या (rag pickers) कामाच्या स्थितीत सुधारणा करणे.

(iii) स्थलांतरीतांसाठीच्या सर्व तात्पुरत्या निवासस्थानात व शहरी बेघरांसाठीच्या निवासस्थानात शौचालयाची पुरेशी व्यवस्था करणे.

(iv) शहरी भागातील बांधकामांवर काम करणाऱ्या कामगारांना तेथेच तात्पुरत्या शौचालयाची सुविधा उपलब्ध करण्याचे अनिवार्य करणे.

(v) सेवानिवृत्त, लहान मुली, गर्भवती व स्तनदा माता यांच्यासाठी वैयक्तीक घरगुती शौचालय बांधकामामध्ये प्राधान्य देणे.

**<u>अभियानाचे घटक</u> :-**

**(अ) वैयक्तिक शौचालय :**

मुंबई महानगरपालिका वगळता इतर सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पात्र लाभार्थी कुटुंबास वैयक्तीक घरगुती शौचालय बांधकामासाठी एकूण रू १२,०००/- प्रति शौचालय एवढे केंद्र व राज्य शासनाचे मिळून अनुदान अनुज्ञेय राहील या अनुदानपैकी रू .४००० एवढे केंद्र शासनाचे तर, रू ८००० राज्य शासनाचे राहतील.

**(ब) सामुदायिक शौचालय :**

(१) शहरात शौचालयाची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे उघडयावर शौचालयास जात असलेल्या कुटुंबापैकी २० टक्के कुटुंबांकडे वैयक्तीक घरगुती शौचालयाचे बांधकाम करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने पर्याय म्हणून या कुटुंबांना सामुदायिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.

(२) प्रत्येक सामुदायिक शौचालयाच्या युनिट करिता येणाऱ्या खर्चाच्या ४० टक्के अथवा व्यवहार्यता अंतर निधी (Viability gap funding) केंद्र शासन उपलब्ध करून देईल. तर, राज्य शासन केंद्र शासनाने उपलब्ध करून दिलेल्या निधीच्या किमान २५ टक्के एवढा निधी उपलब्ध करून देईल.

**(क) सार्वजनिक शौचालय :**

(१) अभियानांतर्गत प्रत्येक शहरातील तरंगती लोकसंख्या (Floating Population) असलेल्या सार्वजनिक ठिकाणी उदा. बाजार, रेल्वे स्टेशन, बस स्टेशन, पर्यटन स्थळे, कार्यालय संकुल इत्यादी ठिकाणी पुरेशा संख्येने सार्वजनिक शौचालये बांधण्यात येतील याची दक्षता सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी घ्यावी.

(२) सार्वजनिक शौचालय बांधकामासाठी केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे अनुदान अनुज्ञेय राहणार नाही. यास्तव, सार्वजनिक शौचालये "सार्वजनिक खाजगी सहभाग" (PPP) पध्दतीने बांधण्यात यावीत.

**(ड) घनकचरा व्यवस्थापन:-**

(१) नागरी घनकचरा व्यवस्थापनांतर्गत कचरा निर्मितीच्या जागीच वेगवेगळा करून गोळा करणे, साठविणे, वाहतूक, प्रक्रिया करणे व उर्वरित कचऱ्याची शास्त्रशुध्द विल्हेवाट लावणे या बाबींचा समावेश आहे.

(२) प्रत्येक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने शहर स्वच्छता आराखडयामध्ये आढळून आलेल्या शहराच्या गरजा ओळखून, नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० व केंद्रिय नगर विकास मंत्रालयाने वेळोवळी सुधारीत केलेले नियम विचारात घेवून घन कचरा व्यवस्थापनासाठी शहराचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करावा.

(३) प्रकल्प अहवालातील एकूण किंमतीच्या २० टक्के अथवा व्यवहार्यता अंतर निधी (Viability gap funding) केंद्र शासन उपलब्ध करून देणार आहे. केंद्र शासनाने उपलब्ध करून दिलेल्या निधीच्या २५ टक्के एवढा निधी राज्य शासन उपलब्ध करून देईल.

..............

# शालेय पोषण आहार (Mid Day Meal)

शासन निर्णय क्र.:पूप्राशा१०९५/२१३४/प्राशि-२, दि.२२ नोव्हेंबर, १९९५.

केंद्र शासनाने जाहीर केलेली शालेय पोषण आहार योजना आणि राज्य शासनाच्या कृति कार्यक्रमानुसार प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे तसेच विद्यार्थ्यांच्या पटनोंदणीचे व उपस्थितीचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने ही केंद्र पुरस्कृत योजना सुरु करण्यात आली. रिट याचिका क्रमांक १९६/२००१(People॰s Union for Civil Liverties (PUCL) विरुध्द भारत सरकार) मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८ नोव्हेंबर २००१ रोजी दिलेल्या आदेशानुसार सदर योजनेअंतर्गत सन २००२ पासून शिजविलेले अन्न देण्यास सुरुवात झाली. राज्य व केंद्र शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित शाळा या ठिकाणी इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतचे विद्यार्थी शालेय पोषण आहार योजनेचे लाभार्थी आहेत. सन २००८ पासून ही योजना इयत्ता ८ वी पर्यंत वाढविण्यात आली आहे.

आहाराचे मानक (Norms of Food) - केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार या योजनेअंतर्गत इयत्ता १ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांसाठी ४५० उष्मांक (Calories) आणि १२ ग्रॅम प्रथिने (Proteins) युक्त दुपारचे भोजन (Mid Day Meal) लाभार्थ्यांना देण्यात येते. तसेच इयत्ता ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक (Calories) आणि २० ग्रॅम प्रथिने (Proteins) युक्त दुपारचे भोजन (Mid Day Meal) देण्यात येते. या योजनेमध्ये आहार शिजवून देण्याचे काम महिला बचत गट, महिला मंडळ, गरजू महिला अथवा सेवाभावी संस्था यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. शालेय पोषण आहार योजनेसाठी लागणा-या खर्चाची विभागाणी केंद्र व राज्यामध्ये ७५:२५ या प्रमाणात करण्यात येते.

शहरी भागामध्ये शालेय पोषण आहार पुरवठा खालील पध्दतीने करण्यात येतो:-

१) शहरी भागामध्ये महानगरपालिका, नगरपालिका कटक मंडळे यांचा समावेश आहे.
२) शहरी भागात शाळेमध्ये जागेची अडचण असल्याने तयार आहाराचा (Ready to Eat) पुरवठा करण्यासाठी महिला संस्था / बचतगट / महिलामंडळ / खानावळवाले यांची नियुक्ती करण्यात येते.
३) शहरी भागातील शाळांपैकी महानगरपालिका / नगरपालिका यांच्या शाळांसाठी महानगरपालिका / नगरपालिका यांचेमार्फत तयार आहाराचा पुरवठा करण्यासाठी पुरवठेदाराची नेमणूक करण्यात येते.
४) शहरी भागातील खाजगी संस्थांच्या शाळांसाठी खाजगी शाळेच्या व्यवस्थापनामार्फत तयार आहाराचा पुरवठा करण्यासाठी पुरवठेदाराची नेमणूक करण्यात येते.

स्वयंपाकी तथा मदतनीसांच्या नेमणूकीसाठी मानधन - शालेय पोषण आहार योजनेमध्ये अन्न शिजविण्याचे काम करण्यासाठी स्वयंपाकी तथा मदतनीस या कामासाठी स्वतंत्र मानधन अदा करण्यास मान्यता दिली आहे.

ग्रामीण भागासाठी स्वयंपाकी तथा मदतनिसांच्या नेमणूकीसाठी प्रतिमाह २५ विद्यार्थ्यांपर्यंत रु. १०००/-, २६ ते १९९ विद्यार्थ्यांसाठी रु. २०००/- व त्यानंतर प्रत्येक १०० विद्यार्थ्यामागे रु. १०००/- याप्रमाणे जास्तीजास्त रु. १०,०००/- पर्यंतचा निधी १० महिन्यांसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. स्वयंपाकी तथा मदतनीसासाठी प्रतीवर्ष २३० कोटी खर्च करण्यात येतो.

.....................

# अल्पसंख्यांक समाजाच्या संस्था/शाळांसाठी पायाभूत विकास योजना ( IDMI )

## (Scheme For Infrastructure Development of Minority Institutions/School )

शासन निर्णय क्र.: आयडीएम २००८/(३७८/०८)असंक, दि. १०फेब्रुवारी, २००९.

अल्पसंख्यांक समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी क्षेत्रिय सघट कार्यक्रमांतर्गत शैक्षणिकदृष्टया मागास असलेल्या अल्पसंख्यांक समाजाच्या शिक्षण संस्थांना पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी केंद्र शासनाने सुधारीत केलेली सदर योजना राज्य शासनाने दि. १०/०२/२००९ च्या शासन निर्णयाव्दारे राज्यात सुरु केली. सदर योजना १००% केंद्र पुरस्कृत आहे.

अर्थसहाय्य :- एकूण खर्चाच्या ७५% इतकी व जास्तीत जास्त रू. ५० लक्ष अर्थसहाय्य करण्यात येते.

१) अस्तित्वात असलेल्या अल्पसंख्यांक प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांकरीता भौतिक सुविधांमध्ये वाढ अतिरिक्त वर्गखोल्या, विज्ञान प्रयोग शाळा, संगणक कक्ष, वाचनालय खोल्या, प्रसाधनगृह, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा इत्यादिंचे बांधकाम.

२) मुलांसाठी विशेषत: मुलींसाठी वसतिगृह इमारतींचे बांधकाम.

३) उपरोक्त १ व २ मध्ये अंतर्भूत नसलेल्या इतर पायाभूत सुविधा.

**योजनेच्या पात्रतेसाठी अटी** :-

१) केंद्र/राज्य शासन मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्था/सोसायटी/ विश्वस्त संस्था या योजनेच्या अर्थसहाय्यासाठी अर्ज करू शकतात.

२) ज्या शाळेसाठी अर्थसहाय्याची मागणी करण्यात आली आहे, ती संस्था/शाळा किमान ३ वर्षापासून कार्यरत आहे व खालील निकष पूर्ण करत असतील त्यांचाच या योजनेंतर्गत विचार करण्यात येईल.

अ) संस्थेची सुयोग्य घटना व आर्टिकल ऑफ असोसिएशन असणे आवश्यक

आ) संस्थेचे सुयोग्य व्यवस्थापकीय मंडळ असणे आवश्यक आहे.व त्यांचे कर्तव्य व अधिकार घटनेमध्ये स्पष्टपणे नमूद असणे आवश्यक आहे.

इ) कोणत्याही एका व्यक्ति अथवा विशीष्ठ समुदायाच्या लाभासाठी संस्था कार्यरत नसावी. संस्थेमध्ये जाणकार व्यक्ती स्वयंसेवी पध्दतीने कार्य करणा-या असाव्यात.

ई) संस्था कोणत्याही विशिष्ठ भाषा अथवा लिंगनिहाय व्यक्ती किंवा गटाबद्दल भेदभाव करणारी नसावी.

उ) संस्था कोणत्याही राजकीय पक्ष अथवा जातीभेद करणा-या गटाच्या फायदयासाठी काम करणारी नसावी.

३) २० टक्क्यांपेक्षा जास्त अल्पसंख्यांक लोकसंख्या असलेल्या जिल्हा, शहर व तालुक्यातील खाजगी अनुदानित / विना अनुदानित प्राथमिक,माध्यमिक शाळांना प्राधान्य.

४) नियमानुसार अवाश्यक अल्पसंख्यांक समाजाच्या मुलांचा हजेरीपट असणे आवश्यक आहे. संचालक (अल्पसंख्यांक व प्रौढ) म.राज्य, पुणे. यांच्यामार्फत या योजनेचे नियंत्रण करण्यात येते.

................

# शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार, (खेळाडू/संघटक/कार्यकर्ते) राज्य क्रीडा साहसी पुरस्कार, एकलव्य राज्य क्रीडा पुरस्कार (अपंग खेळाडू), जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार व जिल्हा क्रीडा पुरस्कार, सुधारित नियमावली

**शासन निर्णय** - शिछपु-२०११/प्र.क्र.१९८/२०११/क्री युसे-२, दि. ०१ ऑक्टोबर, २०१२.

महाराष्ट्रातील नामवंत सर्वोकृष्ट क्रीडापटू, क्रीडा कार्यकर्ते आणि क्रीडा मार्गदर्शक त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील क्रीडा क्षेत्राच्या प्रगतीसाठी अहर्निश व सेवाभावी वर्षानुवर्ष कार्य करणाऱ्या नामवंत खेळाडुंचा/ व्यक्तींचा गौरव करण्याच्या दृष्टीने विविध पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

**अ) शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार** – ज्येष्ठ क्रीडापटू, क्रीडा मार्गदर्शक, क्रीडा संघटक, कार्यकर्ते व क्रीडा क्षेत्राशी संबधित अशा ज्या व्यक्तींना क्रीडा व खेळासाठी आपले सर्वस्व पणाला लावुन आपले जीवन क्रीडा विकासासाठी व्यतीत केले आहे. अशा ज्येष्ठ क्रीडा महर्षिंचा गौरव करण्याच्या दृष्टीने हा पुरस्कार दिला जातो.

**ब) उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार**– क्रीडा क्षेत्रातील ज्या क्रीडा मार्गदर्शकांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडु सहभागी होण्यास व घडविण्यास मदत झाली असेल त्याचप्रमाणे ज्यांच्या मार्गदर्शनामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडू निर्माण झाले असतील, अशा क्रीडा मार्गदर्शकांचा गौरव करण्याच्या दृष्टीने हा पुरस्कार दिला जातो.

**क) शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (संघटक/कार्यकर्ते), जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार**– क्रीडा खेळांचा प्रचार व प्रसार करणाऱ्या संघटक व कार्यकर्ते यांचा गौरव करण्याच्या दृष्टीने हा पुरस्कार दिला जातो. सर्वोत्कृष्ट कामगिरी व योगदान असणा-या एका महिला कार्यकर्ती / संघटकास जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

**ड) शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू)**– क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्रातील खेळाडुंचा गौरव करण्याच्या दृष्टीने हा पुरस्कार दिला जातो.

क्रीडा क्षेत्रातील साहसी उपक्रमामध्ये सहभागी होऊन आंतरराष्ट्रीय दर्जाची कामगिरी करणाऱ्या त्याचप्रमाणे क्रीडा क्षेत्रातील अतूलनीय कामगिरीने महाराष्ट्राच्या क्रीडा लौकिकात भर टाकणाऱ्या सुयोग्य व्यक्तींना **" राज्य क्रीडा साहसी पुरस्कार "** देऊन गौरविले जाते.

**ई) एकलव्य राज्य क्रीडा पुरस्कार (अपंग खेळाडू)**– क्रीडा क्षेत्रातील विशेष उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्रातील अपंग खेळाडुंचा गौरव करण्याच्या दृष्टीने हा पुरस्कार दिला जातो.

**इ) जिल्हा क्रीडा पुरस्कार**– जिल्हयातील गुणवंत क्रीडापटू, क्रीडा मार्गदर्शक व क्रीडा कार्यकर्ता यांच्या कार्याचे/योगदानाचे मुल्यामापन करून त्यांचा गौरव करण्यासाठी हा पुरस्कार दिला जातो.

...................

# शिक्षण सेवक योजना

शासन अधिसूचना दि. १३.१०.२०००

शासन निर्णय क्र. एसएसएन-१०९९/(३४०/९९)/माशि-२,दि. १३.१०.२०००

शासन निर्णय क्र. पीआरई२००२/३३९५/प्राशि-१, दि. २७.२.२००३.

राज्यातील प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचा प्रसार, गुणात्मक वाढ व शिक्षणवरील खर्चाचा ताण कमी करण्यासाठी आणि इतर काही राज्य शासनांच्या धर्तीवर ही योजना दि २७ एप्रिल, २००० च्या शासन निर्णयाव्दारे सुरु करण्यात आली. त्यानंतर सदर योजना दि. १३/१०/२००० च्या अधिसूचनेव्दारे सुधारित स्वरुपात सुरु करण्यात आली आहे. शिक्षण सेवक नियुक्ती तीन वर्षांसाठी केली जाते. या कालावधीत त्यांना विशिष्ट रक्कम मानधन म्हणून देण्यात येते. त्यानंतर समाधानकारक काम केलेल्या उमेदवारास शिक्षकाच्या नियमित पदावर नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती देण्यात येते. विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती टिकविण्याच्या दृष्टीने पालकांशी संपर्क ठेवणे, विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापन करणे व शैक्षणिक व इतर उपक्रमांच्या आयोजनामध्ये सहभागी होणे इ. कर्तव्ये शिक्षण सेवकाला पार पाडावी लागतात.

..................

## बलात्कार / बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला व बालकांना अर्थसहाय्य व त्यांचे पुर्नवसन करण्यासाठीची "मनोधैर्य योजना"

शासन निर्णय क्र.: संकिर्ण २०११/प्र.क्र.६./का-२, दि. ३१.१०.२०१३

बलात्कार/बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला व बालकांना अर्थसहाय्य व त्यांचे पुर्नवसन करण्यासाठी राज्यात "मनोधैर्य योजना" सुरू करण्यात आलेली आहे. सदर योजनेअंतर्गत दि. २.१०.२०१३ पासून घडलेल्या घटनांतील पिडीत महिला / बालकांस लाभ देण्यात येतो.

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांस खालील घटनांमध्ये गुन्हयांची नोंद (FIR) झाल्यास लाभ अनुज्ञेय ठरतो:-

बलात्कार :- भा.दं.वि. कलम ३७५, व ३७६, ३७६ (२) , ३७६ (A) ते ३७६ (E)

बालकांवरील लैंगिक अत्याचार:- Protection of Children from Sexual Offences Act, २०१२ कलम ३,४,५ व ६ .

ॲसिड हल्ला:- भा.दं.वि. कलम, ३२६ (A) ते ३२६ (B) प्रमाणे

सहाय्याचे स्वरूप :-

बलात्कार व बालकांवरील लैंगिक अत्याचार प्रकरणी किमान रू.२ लाख व विशेष प्रकरणांत कमाल रू. ३ लाख रक्कम, ॲसिड हल्ल्यात जखमी झालेल्या महिला व बालकांस त्यांचा चेहरा विद्रुप झाल्यास अथवा कायमचे अपंगत्व आल्यास रू ३ लाख रक्कम, ॲसिड हल्ल्यात इतर जखमा झाल्यास महिला व बालकांस रू. ५० हजार अर्थसहाय्य पिडीत महिला व बालकांना व त्यांच्या वारसदारांना गरजेनुसार निवारा, समुपदेशन, वैद्यकीय मदत, कायदेशीर सहाय्य, व्यवसाय प्रशिक्षण यासारख्या आधार सेवा पुरवून त्यांचे पुनर्वसन केले जाते.

इतर सहाय्य सुविधा :-

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक जिल्हयात जिल्हा गुन्हेगारी क्षति सहाय्य व पुनर्वसन मंडळ स्थापन करण्यात आलेले आहे.पिडीत महिलांना तातडीने मानसिक आधार मिळण्यासाठी प्रत्येक जिल्हयात District Trauma Team गठीत करण्यात येत आहे.

.................

# सुकन्या योजना

शासन निर्णय क्र.: सुकन्या २०११/प्र.क्र. १४४/का-३/ दि.१३.०२.२०१४.

महाराष्ट्र राज्यातील मुलींच्या शिक्षण, आरोग्य अशा एकूणच सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सुकन्या योजना दि १.१.२०१४ .पासून राबविण्यात येत आहे. सदर योजनेचा लाभ सर्व गटातील दारिद्रय रेषेखालील जन्मणाऱ्या प्रत्येक मुलीसाठी कुटूंबातील फक्त दोन अपत्यांपर्यंत लागू आहे.

**योजनेचे स्वरुप**:-

(१) महाराष्ट्र राज्यातील दारिद्रय रेषेखाली जन्मणाऱ्या प्रत्येक मुलींच्या नांवे जन्मत: रु.२१,२००/- मुलीच्या जन्माच्या एक वर्षाच्या आत आयुर्विमा महामंडळाच्या योजनेत गुंतवून सदर मुलीस वयाची १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर एकूण रु .१ लाख इतकी रक्कम प्रदान करण्यात येते .सदरची १ लाख इतकी रक्कम ही प्रचलित व्याजदरानुसार व १८ वर्षे कालावधीसाठी परिगणित करण्यात आली आहे .

(२) आयुर्विमा महामंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या केंद्र शासनाच्या आम आदमी योजनेंतर्गत सदर मुलीच्या नावे जमा केलेल्या रक्कमेतून (Corpus Rs.२१,२००/-) नाममात्र रु.१००/- प्रतिवर्ष इतका हप्ता जमा करुन सदर मुलीच्या कमवित्या पालकाचा विमा उतरविला जातो.

(३) आम आदमी विमा योजनांतर्गत समाविष्ट शिक्षा सहयोग योजनेंतर्गत सदर मुलीला रुपये ६००/- इतकी शिष्यवृत्ती प्रती ६ महिने, इयत्ता नववी, दहावी, अकरावी आणि इयत्ता बारावी मध्ये मुलगी शिकत असतांना दिली जाते .

(४) विहित मुदतीपूर्वी ( वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी ) मुलीचा विवाह अथवा मृत्यू झाल्यास, या योजनेचा फायदा तिच्या पालकांना होणार नसून, मुलीच्या नांवे बँक खात्यात जमा असणारी रक्कम महाराष्ट्र शासनाचे नांवे असणाऱ्या Surplus अकाऊंट किंवा खात्यात जमा म्हणून दर्शविली जाईल.

(५) सदर योजना सर्व गटातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबात जन्मणाऱ्या प्रत्येक मुलींसाठी कुटुंबातील फक्त दोन अपत्यांपर्यंत लागू असेल.

(६) सदर मुलीचे वडील महाराष्ट्र राज्याचे मूळ रहिवाशी असणे आवश्यक आहे.

(७) अर्ज करतांना बालिकेचे जन्म नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक.

(८) मुलीचे वय १८ वर्ष पूर्ण होणे आवश्यक राहील. तसेच तिने इयत्ता १० वी ची परिक्षा उत्तीर्ण होणे व १८ वर्ष पूर्ण होईपर्यंत अविवाहित असणे आवश्यक राहील.

(९) दुसऱ्या प्रसुतीच्या वेळेस जर जुळ्या मुली झाल्या, तर त्या दोन्ही मुली योजनेस पात्र असतील.

(१०) एखाद्या परिवाराने अनाथ मुलीस दत्तक घेतले असेल तर सदर मुलीला त्यांची प्रथम मुलगी मानून या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील .परंतु सदर लाभ प्राप्त होण्यासाठी दत्तक मुलीचे वय ० ते ६ वर्ष किंवा ६ वर्षापेक्षा कमी असावे.

(११) बालगृहातील अनाथ मुलींसाठी ही योजना अनुज्ञेय राहील .

(१२) लाभार्थी कुटुंबांना दोन अपत्यांच्या जन्मानंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे बंधनकारक राहील.

..........................

# एकात्मिक बाल विकास सेवा योजना

शासन निर्णय क्र.: एबाविं-२००८/प्र.क्र. ५९/का-५, दि. २४.८.२००९.

अ) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (ICDS) ही केंद्र पुरस्कृत योजनातंर्गत योजना ग्रामीण, आदिवासी व नागरी भागातील सर्वसाधारण क्षेत्रातील लाभार्थ्यांकरीता राबविण्यात येते. ही योजना मुख्यत्वे करुन बालकांच्या पोषण व आहार विषयक दर्जात सुधारणा करण्यासाठी तसेच बालमृत्युचे व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने सन १९७५-७६ वर्षापासून टप्प्याटप्प्याने वाढ करुन एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. राज्यामध्ये ५५३ (३६४ ग्रामीण + ८५ आदिवासी + १०४ नागरी) प्रकल्प कार्यान्वीत आहेत.

**एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पुढील सेवा दिल्या जातात:-**

| अ.क्र | सेवा प्रकार | लाभधारक |
|---|---|---|
| १ | पुरक पोषण आहार | ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील मुले, गरोदर स्त्रिया व स्तनदा माता |
| २ | लसीकरण | ० ते ६ वर्षे मुले, गरोदर स्त्रिया व स्तनदामाता |
| ३ | आरोग्य तपासणी | ० ते ६ वर्षे मुले, गरोदर स्त्रिया व स्तनदामाता |
| ४ | संदर्भ आरोग्य सेवा | ० ते ६ वर्षे मुले, गरोदर स्त्रिया व स्तनदामाता |
| ५ | अनौपचारिक शिक्षण | ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुले |
| ६ | पोषण आहार व आरोग्य शिक्षण | १५ ते ४५ वर्षे वयोगटातील स्त्रिया |

**एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत आदिवासी क्षेत्रात नवसंजीवन योजना-**

राज्यातील अतिदुर्गम आदिवासी भागाचा पावसाळयामध्ये इतर भागाशी संपर्क तुटल्यामुळे विविध आजार उद्‌भवतात तसेच आदिवासींना योग्य प्रमाणात आहार मिळण्यास अडचण निर्माण होतात व बाल मृत्यूसारख्या घटना घडतात. यावर मात करण्यासाठी व आदिवासी बालके आणि स्त्रियांना पुरक पोषण आहार उपलब्ध करुन देण्याकरिता नवसंजीवन योजनेअंतर्गत वाढीव पूरक पोषण आहार योजना सन १९९७ पासून सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत सर्वसाधारण लाभार्थ्यांना वाढीव दराने वाढीव आहार देण्यात येतो.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडीतील ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता आणि ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील तीव्र कमी वजनाच्या लाभार्थ्यांना घरपोच आहार (THR) तसेच ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना महिला बचत गटांमार्फत गरम ताजा आहार अंगणवाडीतच खाण्याकरीता पुरविण्यात येतो.

कुपोषणाला आळा घालण्याकरिता राज्यात “ **राजमाता जिजाऊ कुपोषण मिशन**” ची स्थापना करण्यात आलेली असून याद्वारे कुपोषणाला आळा घालण्यासंबंधी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

**एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना:-**

१) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ग्रामीण, आदिवासी नागरी क्षेत्रातील ४१६ प्रकल्पात “Girl to girl approach” पध्दतीने **किशोरीशक्ती** योजनेची अंमलबजावणी करण्यास

दिनांक १४.०९.२००६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. ( शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र. एबावि-२००८/प्र.क्र. ५९/का-५, दि. २४.८.२००९.)

२) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत बीड,नांदेड,मुंबई,नाशिक, गडचिरोली, बुलढाणा, कोल्हापूर, सातारा, अमरावती, नागपूर आणि गोंदिया या ११ जिल्हयात किशोरवयीन मुलींच्या सक्षमीकरणासाठी राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण - **सबला योजना** ही केंद्र पुरस्कृत नवीन योजना दि. ३०.०४.२०११ च्या शासन निर्णयान्वये राज्यात सुरु करण्यात आली आहे.

३) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत गरोदर स्त्रिया आणि स्तनदा माता यांना त्यांच्या गरोदर आणि स्तनपान कालावधीमध्ये बुढीत मजुरीपोटी नुकसान भरपाई म्हणून रोख रक्कम देऊन त्यांचे आरोग्य व आहाराचा दर्जा सुधारावा या उद्देशाने राज्यातील भंडारा व अमरावती या दोन जिल्हयांमध्ये **इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना** (IGMSY) सशर्त प्रसुती लाभ योजना राबविण्यास दि. ३०.७.२०११ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे.

...................

## एकात्मिक बाल संरक्षण योजना I.C.P.S.( Intigrated child protection scheme.)

शासन निर्णय क्र.: एबावि-२००८/प्र.क्र. ५९/का-५, दि. २४.८.२००९.

राज्यातील बाल विकासाशी संबंधीत कार्यान्वित यंत्रणा व योजनेची गुणवत्ता वाढविणे आणि त्या अधिक बळकट करणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे.

या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य प्रकल्प सहाय कक्ष (MSPSU), महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था (MSCPS), जिल्हा बाल संरक्षण कक्ष (DCPU) यांची दिनांक ३०/०७/२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापना करण्यात आली आहे. तसेच दिनांक १८/०८/२०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रोग्नोसिस मॅनेजमेंट एण्ड रिसर्च कन्स्लटन्स प्रा.लि. यांची राज्य प्रकल्प सहायक कक्ष म्हणून स्थापना करण्यात आलेली आहे.

सन २०१२-१३ करीता महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था (SARA) २५ जिल्ह्यामध्ये स्थापित होत असलेल्या जिल्हा बाल संरक्षण कक्ष (DCPU) जिल्हा बाल संरक्षण कक्ष ( स्थापित होत असलेले), राज्य प्रकल्प सहाय्य कक्ष (SPSU) तसेच ११७(शासकीय व स्वयंसेवी संस्थाची संख्या), बालगृहे , निरिक्षण गृहे, विशेष गृहे, अनुरक्षण गृहे, विशेष दत्तक संख्या (SSA), खुली निवारा गृहे (OPEN SHELTER) इत्यादी संस्थाना अनुदान वाटप करण्यात येते.

महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था (MSCPS) यांची संख्या नोंदणी अधिनिमय, १८६० खाली नोंदणी करणे आवश्यक असल्यामुळे दिनांक ०४/०४/२०१२ रोजी धर्मादाय आयुक्त पुणे येथे संस्थेची नोंदणी करण्यात आलेली आहे. या संस्थेचे प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग हे अध्यक्ष असतात व आयुक्त महिला व बाल विकास पुणे हे सदस्य सचिव असतात.

एकात्मिक बाल संरक्षण योजने अंतर्गत केंद्र राज्य व स्वयंसेवी संस्था यांचेमार्फत विविध योजना राबविण्यात येतात.

...................

## महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अध्यादेश, २०१५.

महाराष्ट्र अध्यादेश क्र.७, दिनांक १२/५/२०१५.

**प्रस्तावना:-**

राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयांमधील प्रवेश प्रक्रिया तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क निश्चितीच्या प्रक्रियेचे नियमन करण्यासाठी सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.७, दिनांक १२ मे,२०१५ रोजी प्रख्यापित करण्यात आला.

**उद्देश:-**

विविध व्यावसायिक शैक्षणिक पाठ्यक्रमांच्या संबंधातील प्रवेश व शुल्क यांचे विनियमन हा एक महत्वाचा मुद्दा असून त्याबाबतच्या काही न्यायालयीन प्रकरणामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय लक्षात घेता विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश प्रक्रिया व शुल्क आकारणी यांचे विनियमन करण्याची आवश्यकता होती. त्यानुसार राज्य शासनाने विशेषत: उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्या नियंत्रणाखाली विना अनुदानित व्यावसायिक शिक्षण पाठ्यक्रमांमध्ये प्रवेश प्रक्रियेची व शुल्काचे विनियमन करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली प्रवेश नियंत्रण समिती व शिक्षण शुल्क समिती अशा दोन समित्या गठीत केल्या होत्या. तथापि, त्या समित्यांना वैधानिक स्वरुप देण्यासाठी याबाबतीत एक कायदा करणे इष्ट वाटते. म्हणून महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक १२ मे,२०१५ रोजी महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमध्ये (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अध्यादेश, २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश - ७ प्रख्यापित केला.

**स्वरुप:-**

- सदर अध्यादेशामध्ये प्रवेशाचे विनियमन करण्यासाठी प्रवेश नियामक प्राधिकरण तसेच एक राज्य सामायिक प्रवेश प्रक्रिया कक्षाची तरतूद करण्यात आली आहे.
- तसेच शुल्काचे विनियमन करण्यासाठी शुल्क नियामक प्राधिकरणाचीही तरतूद उक्त अध्यादेशामध्ये करण्यात आली आहे.
- प्रवेश नियामक प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधिश व सदस्य सचिव म्हणून आयुक्त, राज्य सामायीक प्रवेश परीक्षा व इतर तज्ञ / संबंधित वरिष्ठ अधिकारी यांचे सदस्य म्हणून नियुक्ती राज्य शासनाकडून करण्याची तरतूद आहे.
- राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या प्रमुख पदी राज्य सीईटी चा आयुक्त म्हणून नामनिर्देशित केलेला सहसचिव दर्जापेक्षा कमी नसेल अशा अधिकाऱ्याची नियुक्ती राज्य शासनाकडून करण्याची तरतूद आहे. राज्य सीईटीचे आयुक्त हे प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली काम करतील.
- शुल्क नियामक प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधिश व सदस्य सचिव म्हणून राज्य शासनाचा सहसचिव दर्जापेक्षा कमी नसेल असा अधिकारी व इतर तज्ञ / संबंधित वरिष्ठ अधिकारी यांची सदस्य म्हणून नियुक्ती राज्य शासनाकडून करण्याची तरतूद आहे. ..................

# महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४

महाराष्ट्रातील विद्यापीठांचे कामकाज सुरळीतपणे चालविण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ विहित करण्यात आला असून सदर अधिनियमातील ठळक तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत:--

- विद्यापीठाचे अधिकार व कर्तव्ये ( नियम ५ )
- राज्य शासनाचे व विद्यापीठांचे नियंत्रण ( नियम ८ )
- कुलपती आणि त्यांचे अधिकार ( नियम ९ )
- कुलगुरुचे अधिकार व कर्तव्ये ( नियम १४ )
- महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषद ( नियम ५६ )
- प्रवेश, परीक्षा व विद्यार्थ्यांशी संबंधित इतर बाबी ( नियम ६५ ते ७४ )
- परवानगी, संलग्नीकरण व मान्यता ( नियम ८१ ते १०० )
- विद्यापीठ निधी, लेखे व लेखा परीक्षा ( नियम १०१ते १०४ )

**राज्यात स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठांची स्थापना** करण्याची तरतूद करण्यासाठी, त्यांच्या कामकाजाचे व कार्याचे विनियमन करण्यासाठी आणि त्यांचेशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरीता शासन निर्णय क्र. युएसजी २००६/(२५४/०६)विशि-४/भाग-२, दिनांक २९ मे २०13 नुसासर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

राज्य शासन हे प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणावर मोठया प्रमाणावर खर्च करीत आहे आणि उच्च शिक्षणावरील वाढता व अधिकचा खर्च करण्यासाठी शासनावर मर्यादा आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात विद्यार्थ्यांना उत्तमोत्तम उच्च शिक्षण मिळून शिक्षण हे कालोचित (Relevant), भविष्यात्मक (Futuristic) आणि जागतिक दर्जाचे (Golblly Competitive) होणे आवश्यक आहे. त्यामुळे उच्च शिक्षणाचेही आधुनिकीकरण करुन या शिक्षणाच्या कक्षा रुंदावणे आवश्यक आहे. त्याबरोबरच नवनवीन विषयावरील व आधुनिक पाठयक्रम (Modern Syllabi) सुरु करुन उच्च दर्जाचे शिक्षण देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. जेणे करुन आपले विद्यार्थी जागतिकीकरणाच्या काळामध्ये या नवनवीन पाठयक्रमामधून पदवी व पदव्युत्तर शिक्षण प्राप्त करुन ते सर्व स्तरावरील स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी सक्षम बनतील. त्याचबरोबर त्यांना जे शिक्षण दिले जात आहे व ते शिक्षण देणाऱ्या संस्था यांचा दर्जाही उच्च प्रतीचा असला पाहिजे. त्यासाठी नवीन शैक्षणिक पाठयक्रम व उपक्रमामध्ये नामांकित खाजगी संस्था स्वत:ची गुंतवणूक करुन उच्च शिक्षणाच्या उपलब्धीसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देत असतील तर अशा संस्थाना एक विधीवत संधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जर खाजगी संस्था उच्च शिक्षणाच्या नवीन क्षेत्रामध्ये आवश्यक त्या पायाभूत सुविधा स्वखर्चाने निर्माण करीत असतील तर जे विद्यार्थी आज उच्च शिक्षणसाठी परदेशात जात आहे, त्यांना उच्च शिक्षणाचा सुविधा राज्यातच उपलब्ध होतील. जर या खाजगी संस्थेच्या माध्यमातून देणारे शिक्षण

उच्च दर्जाचे (Higher Quality Education) आणि रोजगार (Employable) उपलब्ध करुन देणारे असेल तर त्यासाठी अशा संस्थांमध्ये परदेशातील विद्यार्थीही आकर्षित होऊन त्याद्वारे परकीय चलन राज्यामध्ये येईल. यासाठी राज्यामध्ये अशाप्रकारचे शैक्षणिक वातावरण व कायदेशिर मार्ग उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

यामुळे महाराष्ट्राच्या शैक्षणिक वैभवात मोलाची भर पडणार आहे. नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमांचे संचालन करण्याच्या दृष्टिने सर्वंकष उपाय योजना करुन महाराष्ट्र शासनाला अभिप्रेत असणाऱ्या जागतिक स्पर्धेला यशस्वीपणे तोंड देऊ शकतील अशी क्षमता तरुणांमध्ये निर्माण करण्याचा संकल्प आहे.

............

## राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी प्रवेश नियमावली आणि शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी प्रशिक्षण शुल्क नियमावली लागू करणे.

शासन निर्णय क्र.: संकीर्ण ३३१५/प्र.क्र.१७/व्यशि-३, दिनांक १४ मे, २०१५.
शासन शुध्दीपत्रक क्र.: संकीर्ण ३३१५/प्र.क्र.१७/व्यशि-३, दिनांक २५ जून, २०१५.

राज्य शासनाच्या अधिपत्याखालील संचालक( प्रशिक्षण ), व्यवसाय प्रशिक्षण संचालनालय यांच्या माध्यमातून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया online पध्दतीने आयोजित करण्यात आली होती. सदर online प्रवेस प्रक्रियेच्या अनुभवाच्या आधारे सन २०१४-१५ पासून राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील प्रवेश प्रक्रिया online पध्दतीने राबविण्यास दि. २४ जून, २०१४ च्या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली. त्यानंतर दि.जी.ई.टी, नवी दिल्ली यांच्या सूचनांनुसार खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी प्रवेश नियमावली व प्रशिक्षण शुल्क निश्चित करण्यासाठी दि. ३ जुलै,२०१४ च्या शासन निर्णयानुसार समिती गठीत करण्यात आली. समितीने सादर केलेल्या शिफारशी आणि संचालनालयाने प्रस्तावित केल्यानुसार ऑगस्ट २०१५ पासून राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील online प्रवेशासाठीच्या प्रवेश नियमावलीस तसेच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी प्रशिक्षण शुल्क नियमावलीस दि. १४ मे, २०१५ च्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आली. प्रवेश प्रक्रिया online पध्दतीने राबविण्याची जबाबदारी संचालक (प्रशिक्षण ) व्यवसाय प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांची आहे.

.................

# महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५

महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि पात्र व्यक्तींना लोकसेवा देणाऱ्या शासकीय विभागांमध्ये व अभिकरणांमध्ये आणि इतर सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये पारदर्शकता व उत्तरदायित्व आणण्यासाठी आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठीचा कायदा दिनांक २१ ऑगष्ट, २०१५ च्या शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आला आहे. या अधिनियमातील काही मुख्य तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत :-

कलम ३:- प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी त्याने पुरवावयाच्या लोकसेवांची सूची, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपील प्राधिकारी आणि व्दितीय अपील प्राधिकारी इत्यादी तपशील कार्यालयाच्या सूचना फलकावर आणि तसेच त्याच्या संकेतस्थळावर किंवा पोर्टलवर, कोणतेही असल्यास, प्रदर्शित करील किंवा प्रदर्शित करण्याची व्यवस्था करील.

कलम ४:- (१) प्रत्येक पात्र व्यक्तीस, कायदेशीर, तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यतेच्या अधीन राहून, या अध्यादेशानुसार राज्यातील लोकसेवा नियत कालमर्यादेच्या आत प्राप्त करण्याचा हक्क असेल.

(२) सार्वजनिक प्राधिकरणाचा प्रत्येक पदनिर्देशित अधिकारी, कायदेशीर, तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यतेच्या अधीन राहून, नियत कालमर्यादेच्या आत पात्र व्यक्तीला लोकसेवा देईल:

परंतु, निवडणुकीच्या कालावधीत त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्तीच्या वेळी, विहित केल्याप्रमाणे नियत कालमर्यादा राज्य शासनास वाढवता येईल.

कलम ५:- (१) लोकसेवा प्राप्त करण्यासाठी सर्व बाबतीत परिपूर्ण असलेला आवश्यक तो अर्ज, प्राप्त झाल्यानंतर नियत कालावधीत लोकसेवा पुरविणे बंधनकारक.

(२) पदनिर्देशित अधिकारी, पोट -कलम (१) अन्वये अर्ज मिळाल्यावर नियतकालमर्यादेत एकतर थेट लोकसेवा देईल किंवा ती सेवा मंजूर करील किंवा फेटाळण्याची कारणे लेखी नमूद करून अर्ज फेटाळील.

कलम ६:- कोणत्याही लोकसेवांसाठी अर्ज केलेल्या प्रत्येक पात्र व्यक्तीला, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडून एक विशिष्ट अर्ज क्रमांक देण्यात येईल, जेणेकरुन जेथे ऑनलाईन प्रणाली कार्यान्वित असेल तेथे, तो आपल्या अर्जाच्या स्थितीची, ऑनलाईन पाहणी करु शकेल.

कलम ७:- शासन, नियत कालमर्यादेत संबंधित लोकसेवा पुरविण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्याकरिता सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना प्रोत्साहन व प्रेरणा देईल.

कलम ८:- अर्ज फेटाळल्याच्या किंवा त्या लोकसेवा देण्यास विलंब केल्याच्या विरूध्द त्याने दाखल केलेल्या अपिलाची सुनावणी करण्यासाठी आणि निर्णय देण्यासाठी प्रथम अपील प्राधिकारी म्हणून कार्य करण्याकरिता पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा वरिष्ठ दर्जा असलेल्या, गट “ब” दर्जाच्या किंवा त्याच्या समकक्ष दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल.

कलम ९:- कलम ५ च्या पोट-कलम (२) अन्वये जिचा अर्ज फेटाळण्यात आला असेल किंवा जिला नियत कालमर्यादेच्या आत लोकसेवा दिली नसेल अशा कोणत्याही पात्र व्यक्तीस, अर्ज फेटाळल्याचा आदेश मिळाल्याच्या किंवा नियत कालमर्यादा समाप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत प्रथम अपील प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करता येईल.

कलम १०:- (१)(क) जर पदनिर्देशित अधिकाऱ्याने, पुरेशा व वाजवी कारणाशिवाय लोकसेवा देण्यात कसूर केली आहे, असे प्रथम अपील प्राधिकाऱ्याचे मत झाले असेल तर , तो त्या पदनिर्देशित अधिकाऱ्यावर, पाचशे रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढी, किंवा राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेव्दारे वेळोवेळी सुधारणा करील अशा रकमेएवढी, शास्ती लादील.

परंतु, प्रथम अपील प्राधिकाऱ्यावर कोणतीही शास्ती लादण्यापूर्वी, त्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

कलम ११:- शास्तीच्या रकमेची वसुली करण्याची कार्यपध्दती या कलमात विहित केली आहे.

कलम १२:- वारंवार केल्या जाणाऱ्या कसुरीबद्दल पदनिर्देशित अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करण्याची कार्यपध्दती या कलमात विहित केली आहे.

कलम १३:- राज्य शासन, या अध्यादेशाच्या प्रयोजनांकरिता "महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग" या नावाने संबोधला जाणारा एक आयोग, राजपत्रातील अधिसूचनेव्दारे घटित करील.

कलम १४:- महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त आणि आयुक्त यांचा पदावधी व सेवेच्या शर्ती या कलमात विहित केल्या आहेत.

कलम १५.:- या कलमात मुख्य आयुक्त किंवा आयुक्ताना पदावरून दूर करण्याची तरतूद विहित केली आहे. हे अधिकार राज्यापालांना प्रदान करण्यात आले आहेत.

कलम १६:- या कलमामध्ये आयोगाचे अधिकार व कार्ये विहित केले आहे.

कलम १७:- राज्य शासन आयोगाने केलेल्या शिफारशीवर विचार करील आणि केलेल्या कार्यवाहीची माहिती तीस दिवसांच्या आत किंवा आयोगाशी विचार विनीमय केल्याप्रमाणे आयोगाकडे पाठवील.

कलम १८:- व्दितीय अपील प्राधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या पात्र व्यक्तीस किंवा पदनिर्देशित अधिकाऱ्यास, असा आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या कालावधीत आयोगाकडे अपील करता येईल.

कलम १९:- आयोग प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यानंतर मागील वर्षामधील आपल्या कार्याचा तसेच कामगिरीच्या मुल्यमापनाचा अहवाल राज्य शासनास सादर करील. राज्य शासन आयोगाने सादर केलेला वार्षिक अहवाल राज्य विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवेल.

कलम २३:- जर पात्र व्यक्ती, अर्जात जाणून बुजून खोटी किंवा चुकीची माहिती देत असेल किंवा अर्जासोबत खोटे दस्तावेज सादर करीत असेल आणि त्या आधारे लोकसेवा मिळवित असेल तर, अशा प्रकरणी आमलात असलेल्या दंडविधिच्या संबंधित तरतूदीनुसार त्याच्या विरुध्द कार्यवाही करण्यात येईल.

कलम २४:- या अध्यादेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी, सर्वसाधारण किंवा विशेष असे लेखी निदेश सार्वजनिक प्राधिकरणांला देण्याचे अधिकार राज्य शासनास असतील.

कलम २५:- या अध्यादेशाच्या तरतूदीनुसार किंवा नियमानुसार सदभावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृतीसाठी, कोणत्याही व्यक्तीविरुध्द दावा, खटला अथवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

कलम २६:- ज्या बाबींवर आयोगाला आणि अपील प्राधिकाऱ्यांना या अध्यादेशाव्दारे निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान केलेले असतील अशा कोणत्याही बाबीच्या संदर्भात कोणत्याही दिवाणी न्यायालयास, न्यायाधिकरणास किंवा अन्य प्राधिकरणास निर्णय करण्याची अधिकारीता असणार नाही.

कलम २८:- शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, पूर्वप्रसिध्दीच्या शर्तींच्या अधीन राहून, राजपत्रातील अधिसूचनेव्दारे , नियम करता येतील.

.................

# मानव विकास कार्यक्रम

शासन निर्णय, क्र.:- माविमि-२०१०/प्र.क्र. ८१/ का. १४१८, दि. १९/७/२०११

१. राज्यातील १२ अति मागास जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक उंचावण्याकरीता दि.२९ जून २००६ च्या निर्णयान्वये, महाराष्ट्र मानव विकास मिशनची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र मानव विकास मिशनने वरील जिल्ह्यांतील २५ तालुक्यांमध्ये गेल्या चार वर्षामध्ये स्थानिक गरजेनुसार आरोग्य, शिक्षण व उत्पन्नवाढ या बाबींशी संबंधित विविध योजना राबविल्या आहेत.
२. मानव विकास मिशनने राबविलेल्या योजनांचा फायदा लोकांना मिळून संबंधित जिल्ह्याच्या मानव विकासासंबंधीच्या अनेक निर्देशांकात लक्षणीय वाढ झाली. कार्यक्रमाचे चांगले परिणाम लक्षात घेऊन, मानव विकास ही संकल्पना जिल्ह्याऐवजी तालुका स्तरावर राज्यातील सुमारे १२५ तालुक्यांमध्ये राबविण्याचा निर्णय शासनाने शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक :- माविमि-२०१०/प्र.क्र. ८१/ का १४१८, दि. १९/७/२०११ अन्वये घेतलेला आहे.
३. सन २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्यातील स्त्री साक्षरतेचे प्रमाण व सन २००२ च्या सर्वेक्षणानुसार ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचे प्रमाण या दोन निर्देशांकाच्या आधारे राज्यातील ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, नागपूर, भंडारा, गोंदीया, चंद्रपूर व गडचिरोली या २२ जिल्ह्यातील १२५ तालुक्यांची निवड करण्यात आली आहे.
४. निवडलेल्या २२ जिल्ह्यांमध्ये मानव विकास कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत राबविण्यात येणार असून राज्यातील संपुर्ण कार्यक्रमाच्या संनियंत्रणाची जबाबदारी आयुक्त, मानव विकास आयुक्तालय, औरंगाबाद यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.
५. निवडलेल्या १२५ तालुक्यांमध्ये खाली दर्शविलेल्या योजना राबविण्यात येत आहेत :-

**शिक्षण**

१. इयत्ता १० वी आणि १२ वी मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग सुरु करणे.
२. “क” वर्ग नगरपालिका आणि मोठ्या गावांमध्ये अभ्यासिका स्थापन करणे.
३. ग्रामीण भागातील सर्वच मुलींना इ. १२ वी पर्यंत शिक्षण घेणे शक्य व्हावे याकरिता गाव ते शाळा यादरम्यान वाहतूकीची सुविधा उपलब्ध करून देणे.
४. माध्यमिक / उच्च माध्यमिक शासकीय / अनुदानित शाळांमध्ये प्रयोगशाळांकरिता साहित्य पुरविणे.
५. तालुक्याच्या ठिकाणी बालभवन - विज्ञान केंद्र स्थापन करणे.
६. कस्तुरबा गांधी बालिका योजनेची व्याप्ती इयत्ता १० वी पर्यंत वाढविणे.
७. इयत्ता आठवी ते बारावी मध्ये शिक्षण घेत असलेल्या आणि शाळेपासून ५ कि.मी. अंतराचे आत राहणाऱ्या गरजू मुलींना सायकलींचे वाटप करणे.
८. अंगणवाडीसाठी नवीन इमारतीचे बांधकाम करणे.

**आरोग्य व बालकल्याण**

९. तज्ञ महिला डॉक्टरकडून गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी करणे तसेच ० ते ६ महिने वयोगटातील बालकांची व मातांची तपासणी करणे आणि औषधोपचार करणे.

१०. किशोरवयीन मुलींना आरोग्यविषयक बाबींचे प्रशिक्षण देणे.

११. अनु.जाती /अनु.जमाती /दारिद्रय रेषेखालील बाळंत महिलेला बुडीत मजूरी देणे.

१२. आरोग्य उपकेंद्राच्या नवीन इमारतीचे बांधकाम करणे.

**उत्पन्नवाढीच्या योजना**

१३. फिरती माती परीक्षण प्रयोगशाळा सुरु करणे.


१४. ग्रामीण भागातील युवकांना/किशोरवयीन युवतींना स्वयंरोजगाराकरिता व्यवसाय कौशल्याचे प्रशिक्षण देणे.

६. दि. १२ जुलै, २०१२ च्या शासन निर्णयान्वये मानव विकास कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्यात आली असून सदरचा कार्यक्रम “क” वर्ग नगरपालिकांमध्येही राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय, दि.२१ ऑगस्ट, २०१४ च्या शासन निर्णयान्वये "गौण वनोपजांचा उपभोग घेण्यासाठी बीज भांडवल म्हणून ग्रामसभांना एकवेळचे अर्थसहाय उपलब्ध करुन देणे", या योजनेचा मानव विकास कार्यक्रमांतर्गत नव्याने समावेश करण्यात आला आहे.

...............

# वार्षिक योजना

राज्याच्या सर्वसाधारण आर्थिक विकास साधनांमध्ये पंचवार्षिक व वार्षिक योजना आखणे व त्या अंमलात आणणे हे एक महत्वाचे साधन आहे. नियोजनाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे रोजगारांच्या संधी निर्माण करणे, दारिद्रय रेषेखाली असलेल्या लोकसंख्येचे जीवनमान उंचावणे आणि स्वयंनिर्भरता आणि पायाभूत सोयी निर्माण करणे हे होय.




वार्षिक योजनेमधून आदिवासी उपयोजना, अनुसूचित जाती उपयोजनेकरीता निधी उपलब्ध करून देण्यात येतो. सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येच्या प्रमाणात वार्षिक योजनेच्या आकारमानाच्या ११.८% निधी अनुसूचित जाती उपयोजनेसाठी व ९.४% निधी आदिवासी उपयोजनेसाठी उपलब्ध करून देण्यात येतो.

**जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण):-** जिल्हा योजनांसाठी उपलब्ध होणारा निधी पुढील सूत्राच्या आधारे जिल्ह्यांना वितरीत करण्यात येतो :-

| अ.क्र. | बाब | एकूण वाटपातील % |
|---|---|---|
| १ | जिल्ह्याची एकूण सर्वसाधारण लोकसंख्या | ३० |
| २ | जिल्ह्याची ग्रामीण सर्वसाधारण लोकसंख्या | २० |
| ३ | जिल्ह्याचे क्षेत्रफळ | ३० |
| ४ | मानव विकास निर्देशांक | २० |
| | एकूण | १०० |

**अनुसूचित जाती उपयोजना -** अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत व्यक्तिगत लाभांच्या योजनांचा अनुसूचित जातींना प्रत्यक्ष लाभ देणे, पायाभूत सेवा व सुविधा पुरवून वस्त्यांच्या विकासाचा कार्यक्रम, शैक्षणिक विकासाचा कार्यक्रम, अस्वच्छ कामाचे निर्मूलन, आरोग्यात सुधारणा करण्याचा कल्याणकारी कार्यक्रम व किमान गरजा भागविण्याचा कार्यक्रम हे विशिष्ट धोरण आहे. अनुसूचित जाती उपयोजना ही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येते.

**आदिवासी उप योजना –** राज्यातील ५०,७५८ चौ.कि.मी. म्हणजेच १६.५ टक्के क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली आहे. राज्यात एकूण ४७ अनुसूचित जमाती आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील आदिवासींची एकूण लोकसंख्या १०५.१० लक्ष आहे व ती राज्याच्या १,१२३.७४ लक्ष या एकूण लोकसंख्येच्या ९.४ टक्के आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, माडा, मिनीमाडा क्षेत्रात पायाभूत सोयी सूविधा करुन देणे, तसेच आदिवासी क्षेत्रातील व आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी यांच्यासाठी वैयक्तिक लाभाच्या योजना राबविणे इत्यादींचा आदिवासी उपयोजनेत समावेश आहे. आदिवासी लोकांना एकत्रित तसेच व्यक्तिगत फायदेशीर ठरतील अशा योजना आदिवासी उपयोजनेत घेण्यात येतात. ग्रामीण विकास, आदिवासी उप योजना जिल्ह्यातील डोंगरी भागाचा विकास, लघुपाटबंधारे, रस्ते विकास, शिक्षण, आरोग्य आणि पाणीपुरवठा इत्यादीसाठी पुरेशा प्रमाणात नियतव्यय ठेवण्यात येतो. वार्षिक योजनेत उपलब्ध करुन देण्यात येणा-या निधीपैकी ६० टक्के निधी जिल्हा राज्य योजना व ४० टक्के निधी राज्य योजनांना देण्यात येतो.

**वार्षिक योजनेच्या नियतव्ययाचे वाटप खालीलप्रमाणे क्षेत्रानिहाय केले जाते:-**

१. कृषि व संलग्न सेवा
२. ग्रामीण विकास
३. विशेष क्षेत्र विकास कार्यक्रम
४. जलसंपदा व पूरनियंत्रण
५. ऊर्जा विकास
६. उद्योग व खनिकर्म
७. परिवहन व दळणवळण
८. विज्ञान व तंत्रज्ञान व पर्यावरण
९. सामान्य आर्थिक सेवा
१०. सामाजिक व सामूहिक सेवा
११. सर्वसाधारण सेवा

पंचवार्षिक व वार्षिक योजना तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये योजनेसाठी उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचे मूल्यमापन करण्यासंदर्भात वित्त विभागाचाही अत्यंत निकटचा सहभाग असतो. खालील बाबींच्या आधारे साधनसंपत्तीचे मूल्यमापन केले जाते.

- चालू महसूलातील शिल्लक.
- सार्वजनिक उपक्रमाव्दारे अंशदान.
- राज्य भविष्यनिर्वाह निधी.
- अल्पबचतीवरील कर्ज.
- संकीर्ण भांडवली आवक (निव्वळ).
- अतिरिक्त अर्थबळ उभारणी.
- बॉंड/कर्जरोखे.
- सुरुवातीच्या शिलकीचे समायोजन.
- खुल्या बाजारातील कर्ज.
- करारानुसार कर्ज (एलआयसी, जीआयसी, नाबार्ड, हुडको इ.).
- केंद्रीय सहाय्य - अ) सर्वसाधारण, ब) बाहय सहाय्यित प्रकल्प, क) एक वेळ केंद्रिय अर्थसहाय्य. ................

# नियोजन प्रक्रिया

राज्याकडे उपलब्ध साधनसंपत्तीचे क्षेत्रनिहाय वाटप करण्यापूर्वी, त्यातून साध्य करावयाच्या भौतिक उद्दिष्टांचा प्रथम विचार करुन त्या अनुरूप कार्यवाही करणे ही मूलत: नियोजन प्रक्रिया आहे. नियोजन प्रक्रियेत साधारणत: खालील ४ टप्प्यांबाबत विचार करण्यात येतो.

- उपलब्ध साधनसंपत्ती
- अपेक्षित उद्दिष्टे
- उद्दिष्टपूर्तीसाठी आवश्यक बाबी
- प्रत्यक्ष प्रगती

**नियोजन यंत्रणा:-**

**निती आयोग** ( National Institution for Transforming India)

सन १९५०, मध्ये केंद्र शासनाने देशात उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचा कार्यक्षम वापर करुन, जनतेचे राहणीमान उंचावणे, उत्पादन क्षमता वाढविणे व रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे यासाठी योजना आयोगाची स्थापना केली होती. या योजना आयोगाचे पारंपारिक स्वरुप बदलून नविन व्यवस्था म्हणून केंद्र शासनाने दिनांक १/१/२०१५ च्या अधिसूचनेद्वारे निती आयोगाचे गठन केले आहे.

निती आयोगात मा.पंतप्रधान, अध्यक्ष, सर्व राज्यांचे मुख्यमंत्री व केंद्रशासित प्रदेशांचे उप राज्यपाल सदस्य राहणार आहेत. एकापेक्षा अधिक राज्यांच्या संबंधित मुद्याबाबत निर्णय घेण्यासाठी विशिष्ट कालावधीसाठी क्षेत्रिय परिषदेची स्थापना करण्यात येणार आहे. यामध्ये संबंधित राज्याचे मुख्यमंत्र्यांचा सदस्य म्हणून समावेश असणार आहे. या परिषदेची अध्यक्षता निती आयोगाचे अध्यक्ष सांभाळणार आहेत. मा.पंतप्रधान हे विशिष्ट क्षेत्राच्या तज्ञ व्यक्तींना निती आयोगात विशेष आमंत्रित म्हणून नेमणूक करु शकतील. मा.पंतप्रधान यांच्यामार्फत उपाध्यक्षांची नेमणूक तसेच अन्य पूर्णवेळ सदस्य व विश्वविद्यालय, मान्यवर संस्था या मधून जास्तीत जास्त दोन सदस्य नियतकालासाठी अंशकालिक सदस्य म्हणून नेमणूक करण्यात येते. केंद्रीय मंत्री परिषदेतून जास्तीत जास्त ४ सदस्य मा. पंतप्रधान नेमणूक करतील. केंद्र शासनाचे सचिव स्तरावरील अधिकाऱ्याची नेमणूक मा. पंतप्रधान ठराविक कालावधीसाठी करतील. याबाबत बहुतांश नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

**निती आयोगाची उद्दीष्ट्ये खालीलप्रमाणे राहतील:-**

- राज्यांच्या सक्रीय सहभागाने राष्ट्रीय उद्दीष्ट्ये नजरेस ठेवून देशाच्या विकासाच्या प्राथमिकता, क्षेत्र व धोरण निश्चित करुन राष्ट्रीय विषयपत्रिका तयार करणे.
- सशक्त राज्य हे सशक्त राष्ट्र निर्माण करु शकतात. या तत्वाचा स्वीकार करुन राज्यांसमवेत सहकारी तत्वावर संरचनात्मक सहयोग व तंत्राच्या माध्यमाद्वारे देशाचा विकास करणे.
- ग्रामस्तरावर विश्वसनीय अचूक योजना तयार करण्यासाठी तंत्रज्ञान विकसित करणे व ते शासनाच्या वरिष्ठ स्तरापर्यंत पोहोचवणे.
- आयोगाकडे सोपविण्यात आलेल्या विशिष्ट क्षेत्राचा राष्ट्रीय सुरक्षा हीत लक्षात घेऊन आर्थिक उपाययोजना व योजना सुनिश्चित करणे.
- आर्थिक प्रगतीपासून वंचित असलेल्या समाजाच्या विशिष्ट भागासाठी विशेष लक्ष देऊन त्यांना मुख्य प्रवाहात सामील करण्यासाठी आवश्यक उपाययोजना.

- दीर्घकालिन उपाययोजनेसाठी योजनाबध्द उपाययोजना करुन त्याची वेळोवेळी होणारी प्रगती आणि क्षमता याची तपासणी करुन त्यानुसार योजनेमध्ये बदल घडवून आणणे.
- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय थींक टँक तसेच शैक्षणिक आणि निती संशोधन संस्थेसोबत विचारविनियम करणे व भागीदारीसाठी प्रोत्साहन देणे.
- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विशेषतज्ञ तसेच अन्य भागीदारांच्या समवेत सहकार्याने नाविन्यपूर्ण सहाय्यकारी प्रणाली तयार करणे.
- विकास आधारित मुद्दे त्वरित कार्यान्वित करताना आंतरक्षेत्रीय आणि आंतरविभागीय मुद्यांच्या समाधानासाठी मंचाची स्थापना करण्याबाबत.
- सुशासन आणि न्यायसंगत विकासासाठी सर्वोत्कृष्ट कार्यप्रणाली संशोधन करण्यासाठी अत्याधुनिक संशोधन केंद्र तयार करुन त्यात संबंधित भागधारकांचा समावेश करणेबाबत.
- सफलपूर्वक सेवा देण्यासाठी आवश्यक साधनसंपत्तीचा शोध घेऊन कार्यक्रम आणि उपाय यांचे कार्यान्वय सक्रीय मुल्यांकन आणि संवर्धन करणे.
- राष्ट्रीय विकास कार्यक्रम आणि वरील उद्देश अंमलात आणण्यासाठी विविध उपक्रमाचे कार्यान्वयन करणे.

**महाराष्ट्रातील नियोजन यंत्रणा** :-

राज्य स्तरावर मंत्रीमंडळ नियोजन उपसमिती आणि राज्य नियोजन मंडळ या दोन उच्चस्तरीय संस्था आहेत. मा.मुख्यमंत्री हे दोन्ही संस्थांचे अध्यक्ष असून मंत्री, वित्त व नियोजन हे सदस्य आहेत. राज्याच्या विविध भागांचे प्रतिनिधित्व करणारे आणि महत्वाचा कार्यभार सांभाळणारे काही मंत्री नियोजन उपसमितीचे सदस्य असतात. नियोजन उपसमिती राज्यस्तरीय नियोजनाच्या सर्व बाबींबाबत अंतिम निर्णय घेते. राज्य नियोजन मंडळ, ही राज्य शासनाला नियोजनविषयक धोरणांबाबत सल्ला देणारी समिती आहे. राज्य योजनांना विधानमंडळाची मान्यता घेण्यात येते.

राज्य शासनाचा नियोजन विभाग राज्यातील योजना तयार करणे व त्या संबंधीच्या सर्व बाबींचे नियंत्रण करतो. नियोजन विभागाची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

- वार्षिक/पंचवार्षिक योजनेची धोरणे ठरविण्याबाबत शासनास मदत करणे.
- राज्याची पंचवार्षिक/वार्षिक/यथार्थदर्शी योजना तयार करणे.
- योजना तयार करुन त्याची अंमलबजावणी व संनियंत्रण करणे.
- योजनेच्या साधनसंपत्तीचे मूल्यांकन.
- योजनेचे मूल्यमापन.
- वित्तीय संस्थामार्फत वित्त पुरवठयाचे समन्वयन (बाह्य सहाय्यित प्रकल्पांसह)

मुख्य सचिव हे मुख्य विकास आयुक्त तर नियोजन विभागाचे सचिव हे विकास आयुक्त असतात. विकास आयुक्त म्हणून राज्याची पंचवार्षिक/वार्षिक/यथार्थदर्शी योजना तयार करुन सदर योजनांची अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन यावर देखरेख करण्याची जबाबदारी नियोजन सचिवांची असते. त्यांना योजना तयार करण्याच्या व ती राबविण्याच्या संदर्भात योजना आयोग व मंत्रालयातील विविध विभाग यामध्ये समन्वय साधण्याचे कामही करावे लागते. प्रत्येक जिल्हयामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन समिती कार्यरत असते.

## राज्य नियोजन प्रक्रिया-

आर्थिक धोरणाचे उदारीकरण लक्षात घेऊन तत्कालीन योजना आयोगाने आपली भूमिका निर्देशक नियोजनापुरती मर्यादित केली होती. राज्याला उपलब्ध साधन संपत्तीच्या आधारे योजना तयार करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. त्यानुसार, विविध प्रशासकीय विभागांकडून वार्षिक योजनांचे प्रस्ताव मागविण्यात येतात. या माहितीच्या आधारे वार्षिक योजना तयार केली जाते. सन २००९-१० पासून नियोजन विभागाने महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर योजना माहिती प्रणाली (MPSIMS) विकसित केली आहे. त्याद्वारे प्रशासकीय विभागांकडून ऑन लाईन माहिती प्राप्त झाल्यानंतर नियोजन विभागामार्फत संस्कारित केली जाते.

महाराष्ट्राच्या नियोजन प्रक्रियेची वैशिष्टये खालीलप्रमाणे नमूद करता येतील.

- योजनेचे विकेंद्रीकरण
- आदिवासी उपयोजना तसेच अनुसूचित जाती उपयोजनांसाठी नियतव्यय उपलब्ध करण्याकरिता विनिर्दिष्ट तरतुदी
- जिल्हास्तरीय योजनांसाठी जिल्हानिहाय स्वतंत्र नियतव्यय देण्यात येत असून त्यात दरवर्षी भरीव वाढ करण्यात येत आहे.
- भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) अनुसार वैधानिक विकास मंडळांची स्थापना.

## जिल्हा योजना

सन १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर शासनाने "जिल्हा" हा नियोजनाचा घटक धरुन जिल्हयाची वार्षिक व पंचवार्षिक योजना तयार करुन समतोल विकास घडवून आणण्याचे धोरण स्विकारले. त्यासाठी प्रत्येक जिल्हयात जिल्हा नियोजन व विकास मंडळाची स्थापना करण्यात आली होती. संविधानाच्या ७४ व्या घटना दुरुस्तीतील कलम २४३-झेड डी नुसार सन-१९९८ पासून राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये जिल्हा नियोजन व विकास मंडळाऐवजी “जिल्हा नियोजन समित्या” स्थापन करण्यात आल्या आहेत. जिल्हयातील जिल्हापरिषद व नगरपालिका / महानगरपालिका यांनी तयार केलेल्या जिल्हा वार्षिक योजनांचा आराखडा व मागणी विचारात घेऊन संपूर्ण जिल्हयाकरिता विकास योजनेचा एकत्रित मसुदा तयार करुन राज्य शासनास सादर करणे हे या समितीचे काम आहे.

## जिल्हा नियोजन समितीची रचना-

जिल्हयातील लोकसंख्येच्या प्रमाणात जिल्हा नियोजन समितीतील सदस्यांची संख्या अवलंबून आहे. जिल्हा नियोजन समितीमध्ये २० लाखापर्यंत लोकसंख्या असलेल्या जिल्हयासाठी ३० सदस्य, २० ते ३० लाखापर्यंत लोकसंख्या असलेल्या जिल्हयामध्ये ४० सदस्य व ३० लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या जिल्हयांमध्ये ५० सदस्य असतात.

जिल्हयाचे पालकमंत्री हे जिल्हा नियोजन समितीचे पदसिध्द अध्यक्ष असतात. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष हे पदसिध्द सदस्य असतात. तर जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे सदस्य सचिव म्हणून काम पहातात.

राज्यपालांनी संबंधित विभागीय संविधानिक विकास मंडळाच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेला एक सदस्य, जिल्हयातील आमदार व खासदार यामधून पालकमंत्र्यांनी नामनिर्देशित केलेले

दोन सदस्य व जिल्हा नियोजन समितीच्या ४० व ५० सदस्य असलेल्या समितीवर जिल्हा नियोजनाचे ज्ञान असलेल्या अनुक्रमे २ व ४ व्यक्तींना शासन नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्त करते.

वरील सदस्यांव्यतिरिक्त अन्य आमदार/ खासदार, विभागीय आयुक्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय आयुक्तांच्या कार्यालयातील विशेष कार्य अधिकारी, जिल्हा नियोजन अधिकारी, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष / सदस्य यांचेमधून एक सदस्य, पालकमंत्र्यांनी नामनिर्देशीत केलेल्या सदस्यांना विशेष निमंत्रित म्हणून जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यांना बोलाविण्यात येते.

जिल्हा नियोजन समितीच्या एकूण सदस्यांपैकी किमान ८०% पेक्षा कमी नसतील इतके सदस्य हे जिल्हयातील ग्रामीण व नागरी क्षेत्राच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जिल्हा परिषदेच्या व नगरपंचायती , नगरपरिषदा व महानगरपालिका यांच्या निर्वाचित सदस्यांमधून जिल्हा नियोजन समितीवर सदस्य म्हणून निवडून दयावयाचे आहेत. दिनांक २४ डिसेंबर,२०१२ च्या अधिसुचनेद्वारे महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, १९९८ यामध्ये सुधारणा करुन जिल्हा नियोजन समितीतील निवडून येणा-या सदस्यांमध्ये स्त्रियांकरीता ५०% आरक्षण ठेवण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हा नियोजन समितीवर रिक्त जागा भरणेसाठी जिल्हा परिषदेच्या व नगर पंचायती, नगर परिषदा व महानगरपालिका यांच्या नवनिर्वाचित सदस्यांमधून निवडणुकीने सदस्यांची नियुक्ती करण्याकरीता सर्व संबंधित जिल्ह्यात फेब्रुवारी-मार्च, २०१३ मध्ये जिल्हा नियोजन समितींच्या निवडणुका घेण्यात आल्या आहेत.

**जिल्हा नियोजनामध्ये जिल्हा नियोजन समितीची भूमिका-** जिल्हयातील पंचायत राज संस्था आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी तयार केलेल्या वार्षिक योजना आणि पंचवार्षिक योजना एकत्र करुन सर्व जिल्हयांसाठी सर्व समावेशक विकास योजनेचा मसुदा तयार करुन राज्य शासनास सादर करणे हे जिल्हा नियोजन समितीचे महत्वाचे काम आहे. जिल्हयाचा योजना आराखडा तयार करताना ज्या क्षेत्रांसाठी राज्य किंवा केंद्र शासनाच्या योजनांतून निधी मिळत नाही अशा क्षेत्रावर जिल्हा योजनेतून निधी उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. जिल्हयाचा आराखडा तयार करताना जिल्हयाचा मानव विकास निर्देशाक, जिल्हयाची सामाजिक व भौगोलिक स्थिती व जिल्हयाच्या गरजा यांचा प्राथम्याने विचार होणे आवश्यक आहे. जिल्हयाच्या गरजा निश्चित होण्यासाठी सर्वात खालच्या पातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्थापासून नियोजनामध्ये सहभाग असणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून आलेल्या सदस्यांनीही संबंधित संस्थांचे प्रतिनिधीत्व करुन त्यांच्या भागातील गरजांबाबत समितीमध्ये चर्चा करुन त्याची सोडवणूक करण्यासाठी उपाययोजना सुचविणे आवश्यक आहेत. असे झाले तरच ख-या अर्थाने सहभागातून नियोजन (Participative planning) होण्यास मदत होणार आहे व योग्य व आवश्यक क्षेत्रासाठी निधी उपलब्ध होऊन जनतेस लाभ होणार आहे.

**सुधारित कार्यपध्दती-** सन २००८-०९ पासून जिल्हा वार्षिक योजनेच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा केली असून जिल्हा नियोजन समितीने तयार केलेल्या आराखडयास राज्य शासनाची मान्यता मिळाल्यानंतर तो आराखडा नियोजन विभागांतर्गत अर्थसंकल्पीत करण्यात येतो. अर्थसंकल्पीत झालेला निधी जिल्हाधिका-यांमार्फत कार्यान्वयीन यंत्रणांना वितरीत केला जातो. जिल्हा वार्षिक योजनेतील स्थानिक स्वराज्य संस्थांकडील योजना वगळता अन्य योजनांना प्रशासकीय मान्यता

देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. यासाठीचे प्रस्ताव शासन स्तरावर पाठविण्याची आवश्यकता नसल्याने निधी त्वरीत खर्च होण्यास मदत होत आहे.

जिल्हा वार्षिक योजना सन २०१०-११ पासून जिल्हयांना त्यांच्या एकूण नियतव्ययापैकी ०.५ %इतका नियतव्यय मुल्यमापन, संनियंत्रण, डाटाएट्रीसाठी खर्च करता येईल. तसेच "जिल्हयातील नाविन्यपूर्ण योजना" या नावाची नविन योजना सुरू करण्यात आली असून त्याअंतर्गत जिल्हयांना एकूण नियतव्ययापैकी ३.५% इतक्या मर्यादेत स्थानिक गरजेनूसार अनेक योजना / कामे घेता येतील.

**अनुसूचित जाती योजना-**

अनुसूचित जाती या प्रामुख्याने समाजातील दुर्लभ घटकात येतात. यासाठी केंद्र शासनाने अनुसूचित जाती या वर्गाचा जलद विकास होण्यासाठी अनुसूचित जाती उपयोजना कार्यान्वित केली आहे. या घटकांकडे स्वत:ची मालमत्ता अत्यल्प असून हे लोक साधारणत: शेतमजूरी व इतर कमी उत्पन्नाच्या व्यवसायावर अवलंबून असतात. बहुतेक लोक पारंपारिक व्यवसाय करतात आणि निरनिराळया आर्थिक विकासाच्या कार्यक्रमामुळे निर्माण होणाऱ्या नव्या रोजगार संधीचा स्वत:साठी उपयोग करुन घेण्यास असमर्थ असतात. त्यामुळे अनुसचित जाती / नवबौध्द यांचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास व त्यांच्या किमान गरजांची पूर्तता करण्यासाठी समन्वित दृष्टीकोन ठेवून विविधांगी कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता जाणवली.

**राज्य शासनाचा दृष्टीकोन-**

केंद्र शासनाने निर्देशित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचा अभ्यास करुन राज्य शासनामार्फत पुढील बाबींचा अवलंब केला जातो :-

(अ) अनुसूचित जाती उपयोजनेत फक्त अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या व्यक्तिंना/ कुटुंबांना किंवा त्यांच्या वस्त्यांना थेट व जास्तीत जास्त लाभ देणाऱ्या योजना घेण्यात याव्यात.

(ब) "अविभाज्य" क्षेत्राखालील कार्यक्रमांची संबंधित असलेल्या विभागाने अनुसूचित जातीकरिता निश्चित निधी उपलब्ध करुन देण्याच्या योजनांची अंमलबजावणी करण्याची शक्यता पडताळून पहावी.

(क) केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या विशेष केंद्रिय अर्थसहाय्याचा उपयोग अनुसूचित जातीतील दारिद्रय रेषेखालील असणाऱ्या व्यक्तिंना दिल्या जाणाऱ्या सहाय्यात वाढ करण्याकरिता केला जावा. विशेष केंद्रीलय सहाय्यांतर्गत कोणत्याही कार्यक्रमासाठी दिले जाणारे कमाल अनुदान त्या कार्यक्रमाच्या/प्रकल्पाच्या एकूण किंमतीच्या ५० टक्क्यापेक्षा जास्त असणार नाही व ही ५० टक्के रक्कम रु. १०,०००/- पेक्षा अधिक असणार नाही.

<u>लोकसंख्या</u>-

सन २०११ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जातीची लोकसंख्या १,३२,७५,८९८ आहे. त्यापैकी ६७,६७,७५९ पुरुष आणि ६५,०८,१३९ स्त्रिया आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येशी टक्केवारी ११.८१टक्के आह सन १९९५-९६ पासून अनुसूचित जाती उपयोजना तयार करण्याची जबाबदारी सामाजिक न्याय विभागावर सोपविण्यात आली आहे. नियोजन विभागाकडून सामाजिक न्याय विभागाला अनुसूचित जाती उपयोजना तयार करण्यासाठी नियतव्यय कळविण्यात येतो.

**<u>विशेष केंद्रीय सहाय्य</u>-** अनुसूचित जाती उपयोजनेला पूरक म्हणून दरवर्षी केंद्र शासनाकडून विशेष केंद्रीय सहाय्याच्या रुपाने, पूरक नियतव्यय उपलब्ध करुन दिला जातो.

## आदिवासी उपयोजना-

महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रफळ ३,०७,७१३ चौ. कि.मी असून त्यापैकी ५०,७५८ चौ. कि.मी. म्हणजे १६.५ टक्केक्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली आहे. राज्यात एकूण ४७ अनुसूचित जमाती आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार राज्यात आदिवासींची एकूण लोकसंख्या १०५.१० लक्ष आहे व ती राज्याच्या १,१२३.७४ लक्ष या एकूण लोकसंख्येच्या ९.४ टक्के आहे. राज्यात भिल्ल, गोंड, महादेव कोळी, पावरा, ठाकूर आणि वारली या मुख्य आदिवासी जमाती आहेत. कोलम, कातकरी आणि माडिया गोंड या तीन जमाती आदिम जमाती म्हणून अधिसूचित करण्यात आल्या आहेत. राज्यातील १०५.१० लक्ष आदिवासीपैकी ५१ टक्के आदिवासी उपयोजना क्षेत्रात राहतात व ४९ टक्के आदिवासी उपयोजनेच्या बाहेरील क्षेत्रात राहतात.

आदिवासी लोकसंख्या राज्याच्या १५ जिल्हयांमध्ये एकत्रित झालेली आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, माडा व मिनीमाडा क्षेत्रात पायाभूत सोय सुविधा करुन देणे, तसेच आदिवासी क्षेत्रातील व आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी यांच्यासाठी वैयक्तिक लाभाच्या योजना राबविणे इत्यादींचा आदिवासी उपयोजनेत समावेश आहे.

**उद्दिष्टे-** राज्यातील बिगर आदिवासी लोकसंख्या यांच्यातील आथिक व मनुष्य बलाचा विकास यांच्यातील असलेली दरी दूर करण्यासाठी उपयोजना तयार करण्यात आली.

(१) राज्यातील आदिवासी क्षेत्रे व इतर क्षेत्रे यांच्या विकासातील अंतर भरुन काढणे.

(२) आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा सुधारणे,

(३) त्यांना भेडसावणा-या व महत्वाच्या समस्यांची सोडवणूक करणे आणि त्यांची पिळवणूक थांबविणे,

(४) त्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासाची गती वाढविणे.

सुखथनकर समितीच्या शिफारशीप्रमाणे आदिवासी उपयोजना तयार करण्याचे काम आदिवासी विकास विभागाला सन १९९३-९४ पासून सोपविण्यांत आले आहे. राज्य योजनेतील ठराविक रक्कम नियोजन विभागातफे आदिवासी उपयोजना तयार करण्यासाठी आदिवासी विकास विभागाला देण्यात येते. आदिवासींना प्रत्यक्ष लाभदायी असलेल्या भिन्न योजनांवरील नियतव्यय आता आदिवासी विकास विभागामाफत अंतिमत: निश्चित करण्यांत येतो. आदिवासी लोकांना एकत तसेच व्यक्तिगत फायदेशीर ठरतील अशा योजना आदिवास उपयोजनेत घेण्यांत येतात. ग्रामीण विकास, आदिवासी उपयोजना जिल्ह्यातील डोंगरी भागाचा विकास, लघु पाटबंधारे, रस्ते विकास, शिक्षण, आरोग्य आणि पाणीपुरवठा इत्यादीसाठी पुरेशा प्रमाणात नियतव्यय ठेवण्यांत येतो.

....................

# केंद्रीय सहाय्य/ वित्तीय संस्थाद्वारे वित्त पुरवठा / बाहयसहाय्यित प्रकल्प

राज्याच्या वार्षिक योजनेची आखणी करताना, राज्याच्या साधन संपत्तीचे अंदाज लक्षात घेऊनच योजना तयार केली जाते. योजनेसाठी राज्याच्या आर्थिक स्त्रोताव्यतिरिक्त, केंद्र शासनाकडून, खालीलप्रमाणे केंद्रीय सहाय्य व कर्ज सहाय्य प्राप्त होत असते.

- केंद्रीय सहाय्य
- आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांचे सहाय्य
- देशांतर्गत वित्तीय संस्थाचे कर्ज सहाय्य.

**केंद्रीय सहाय्य-**

राज्यांना केंद्र शासनाकडून पंचवार्षिक/वार्षिक योजनेसाठी चार प्रकारे अर्थ सहाय्य प्राप्त होते.

- नियमित केंद्रीय सहाय्य
- बाहय सहाय्यित प्रकल्पासाठी प्राप्त होणारे अतिरिक्त केंद्रीय सहाय्य.
- केंद्र पुरस्कृत व केंद्र सहाय्यित योजनांसाठी सहाय्य
- राज्याच्या विशेष महत्वांच्या प्रकल्पांसाठी एकवेळ अतिरिक्त केंद्रीय अर्थसहाय्य.
  चौथ्या पंचवार्षिक योजनेपासून (१९६९-७४) नियमित केंद्रीय सहाय्य देण्यात येते.

**केंद्र पुरस्कृत योजना:-**

केंद्र पुरस्कृत योजनांच्या पुनर्रचनेची आवश्यकता विचारात घेऊन बी. के. चतुर्वेदी समितीच्या शिफारशींच्या आधारे केंद्र पुरस्कृत योजनांची पुनर्रचना करण्यात आली आहे. पुनर्रचित केंद्र पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी सन २०१४-१५ पासून करण्यात आली. पुनर्रचित केंद्र पुरस्कृत योजनांची ठळक वैशिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

- केंद्र पुरस्कृत योजनांची संख्या १४७ वरुन ६६ इतकी निश्चित करण्यात आली आहे.
- अनेक लहान योजना एका योजनेंतर्गत विलीन करण्यात आल्या आहेत. सन २०१४-१५ पासून त्या योजनांखालील स्त्रोतांच्या उपयोगासाठी योग्य त्या मार्गदर्शक सूचना विहित करण्यात आल्या आहेत.

***(सन २०१५-१६ पासून १४व्या वित्त आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने केंद्र शासनाने केंद्रीय सहाय्यामध्ये बदल प्रस्तावित केले आहेत.)**

**बाह्य सहाय्यित प्रकल्पांसाठी अतिरिक्त केंद्रीय सहाय्य-**

गेली दोन दशके राज्य शासनाला विविध विकास क्षेत्रातील प्रकल्पांसाठी अन्य देशांकडून आर्थिक सहाय्य मिळत आहे. या बाह्य सहाय्यित एजन्सीकडून मिळणा-या सहाय्याचा विनियोग मुख्यत्वे रस्ते विकास, पाटबंधारे, पाणीपुरवठा, जलविद्युत आणि औष्णिक विद्युत प्रकल्प यांसारख्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी केला जातो. जागतिक बँक, युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटी, जेबीआयसी, जपान आणि केएफडब्ल्यु, जर्मनी यांसाख्या एजन्सीकडून आतापर्यन्त आर्थिक सहाय्य मिळविण्यात आलेले आहे.

जेव्हा बाह्य एजन्सीकडून सहाय्य घेतले जाते तेव्हा त्या प्रकल्पाकरिता पुरेशा निधीची तरतूद करणे आणि सहाय्य देणा-या एजन्सीच्या दृष्टीकोनातून समाधानकारक असा सक्षम तांत्रिक कर्मचारी

वर्ग प्रकल्पाच्या कार्यान्वयनासाठी उपलब्ध करणे, ही राज्य शासनाची प्राथमिक जबाबदारी असते. बाह्य एजन्सीकडून मिळणारे सहाय्य हे अनुदान किंवा कर्ज या प्रकारचे किंवा दोन्हीही प्रकारचे असते. त्याचप्रमाणे बाह्य सहाय्याची रक्कम ही त्या प्रकल्पाचा संपूर्ण खर्च भागेल इतकी किंवा प्रकल्पाच्या अंदाजित एकूण खर्चाच्या काही टक्के असते. प्रकल्पाकरिता मिळणारे सहाय्य हे राज्य सरकारला परस्पर दिले जात नाही तर ते केंद्र शासनामार्फत दिले जाते. केंद्र शासन बाह्य सहाय्यित प्रकल्पासाठी राज्य शासनाला योजनेंतर्गत अतिरिक्त केंद्रीय सहाय्य देते. ऑगस्ट, १९९२ पासून बाह्य सहाय्यित प्रकल्पासाठी बाह्य एजन्सीकडून मिळणारे १००% सहाय्य राज्य शासनाला दिले जाते.

**देशातंर्गत वित्तीय संस्थांचे कर्ज सहाय्य:-**

राज्य शासनाला महसूलाद्वारे मिळणारे उत्पन्न व विकास कामासाठी आवश्यक असणारा निधी यामध्ये नेहमी काही प्रमाणात पोकळी असते. सदर पोकळी भरण्यासाठी राष्ट्रीय वित्तीय संस्थाकडून कर्ज घेणे भाग पडते. नाबार्ड, हुडको, एलआयसी सारख्या वित्तीय संस्था राज्यांना विकास कामांसाठी कर्ज उपलब्ध करुन देण्यात नेहमी अग्रेसर राहिलेल्या आहेत.

राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बॅंकेकडून सर्व राज्यांना विविध विकासक्षेत्रात विकास कामांसाठी कर्ज स्वरुपात निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. नाबार्डच्या कर्जाच्या सहाय्याने राज्यात जलसंपदा, पाणी पुरवठा, जलसंधारण, रस्ते व पूल या विकास क्षेत्रामध्ये कामे घेण्यात येतात. सन २०१०-११ मध्ये अंगणवाडी बांधकाम व मच्छिमार बंदरे व जेट्टीचा विकास कार्यक्रम व सन २०११-१२ मध्ये गोदाम बांधकाम या कार्यक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. नाबार्ड सहाय्य अंतर्गत घेण्यात येणारे प्रकल्प साधारणत: तीन वर्षात पूर्ण करावे लागतात. पहिल्या वर्षी मोबीलायझेशन अग्रिम म्हणून मंजूर प्रकल्प रक्कमेच्या २०% रक्कम मिळते. त्यानंतर खर्च जसा होईल त्याप्रमाणे प्रतिपूर्ती देयकाद्वारे पैसे मिळतात.

..............

# जिल्हा नियोजन समिती

**घटनात्मक तरतूद:-** जिल्हयामधील पंचायती व नगरपालिकांनी तयार केलेल्या जिल्हा वार्षिक योजना विचारात घेऊन त्याचे एकत्रितकरण करुन संपूर्ण जिल्हयासाठी विकास योजनेचा मसुदा तयार करण्यासाठी संविधानाच्या ७४व्या घटना दुरुस्तीतील कलम २४३ झेड डी नुसार राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये जिल्हा नियोजन समित्या स्थापन करण्यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे. या कलमातील तरतूदीनुसार जिल्हा नियोजन समितीच्या एकूण सदस्यांपैकी कमीत कमी ८० टक्के सदस्य निर्वाचित असणे आवश्यक आहे.

**जिल्हा नियोजन समित्यांची राज्यांमध्ये स्थापना:-** महाराष्ट्र राज्यांमध्ये १९७४ पासून जिल्हा नियोजनाची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. संविधानाच्या उपरोक्त तरतूदीस अनुसरुन राज्य शासनाने महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम १९९८ तयार करुन त्याची अंमलबजावणीची दिनांक १५ मार्च, १९९८ पासुन सुरू झाली आहे.

राज्यामध्ये आतापर्यंत पदसिध्द व नामनिर्देशित सदस्यांची जिल्हा नियोजन समिती सर्व जिल्हयांमध्ये कार्यरत होती.

**जिल्हा नियोजन समितीची रचना:-** महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम-१९९८ मध्ये प्रत्येक जिल्हयासाठी एक जिल्हा नियोजन समिती असावी अशी तरतूद आहे. जिल्हयाची लोकसंख्या, त्यानुसार नियोजन समितीची एकुण सदस्य संख्या व त्यापैकी निवडून द्यावयाचे सदस्य याची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

| जिल्हयाची लोकसंख्या | एकुण सदस्य | त्यापैकी निवडुन द्यावयाचे सदस्य |
|---|---|---|
| **२० लाखापर्यंत** | **३०** | **२४** |
| **२० लाख ते ३० लाखापर्यंत** | **४०** | **३२** |
| **३० लाखापेक्षा अधिक** | **५०** | **४०** |

**जिल्हा नियोजन समितीची रचना खालील प्रमाणे आहे:-**

**(अ) पदसिध्द सदस्य** -

| | |
|---|---|
| १) जिल्हयाचे पालकमंत्री | अध्यक्ष |
| २) जिल्हा परिषदेचे अध्यक्ष | सदस्य |
| ३) जिल्हाधिकारी | सदस्य सचिव |

**(ब) नामनिर्देशित सदस्य-**

| | |
|---|---|
| १) शासनाने जिल्हयातील नामनिर्देशित करावयाचे मंत्री (जास्तीत जास्त ६) | सहअध्यक्ष |
| २) राज्यपालांनी संबंधित विभागीय विकास मंडळाच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेला एक सदस्य | सदस्य |
| ३) जिल्हयातील आमदार व खासदार यामधून पालकमंत्र्यांनी नामनिर्देशित केलेले दोन सदस्य | सदस्य |
| ४) जिल्हा नियोजन समितीच्या ४० व ५० सदस्य असलेल्या समितीवर अनुक्रमे २ व ४ व्यक्तींचे शासनाने केलेले नामनिर्देशन | सदस्य |

**(क) विशेष निमंत्रित-**

१) वरील "ब" मधील १ व ३ येथील सदस्य वगळून जिल्हयातील आमदार / खासदार
२) संबंधित जिल्हयाच्या विभागाचे विभागीय आयुक्त
३) जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४) विभागीय आयुक्तांच्या कार्यालयातील विशेष कार्य अधिकारी
५) जिल्हा नियोजन अधिकारी
६) राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष / सदस्य यांचेमधून एक सदस्य
७) पालकमंत्र्यांनी ३०, ४० व ५० सदस्य संख्या असलेल्या समितीवर अनुक्रमे ९,११ व १४ व्यक्तीचे केलेले नामनिर्देशन

**(ड) निवडणूकीने निवडून द्यावयाचे सदस्य:-**

जिल्हा नियोजन समितीमधील एकूण सदस्यांच्या ४/५ पेक्षा कमी नसतील इतके सदस्य हे जिल्हयातील ग्रामीण क्षेत्राची लोकसंख्या आणि नागरी क्षेत्राची लोकसंख्या यांच्यामधील गुणोत्तराच्या प्रमाणात जिल्हा परिषदेच्या व नगरपंचायती, नगरपरिषदा,नगरपालिका,महानगरपालिकांच्या निर्वाचित सदस्यांमधून निवडून द्यावयाचे असतात.

**जिल्हा नियोजन समितीची कामे:-** महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम १९९८ नुसार सदर समितीची कामे पुढील प्रमाणे विहीत केलेली आहेत :-

(१) जिल्हयातील पंचायतींनी व नगरपालिकांनी तयार केलेल्या जिल्हा वार्षिक योजना विचारात घेणे आणि एकत्रित करणे व संपूर्ण जिल्हयाकरिता विकास योजनेचा मसुदा तयार करणे.

(२) पंचायतींनी आणि नगरपालिकांनी तयार केलेल्या पंचवार्षिक योजना आणि सम्यकदर्शी योजना विचारात घेणे आणि संपूर्ण जिल्हयासाठी पंचवार्षिक योजना आणि सम्यकदर्शी योजना मसुद्याचे समन्वयन करणे व तो तयार करणे.

(३) जिल्हा वार्षिक योजनेच्या प्रगतीचा आढावा घेणे, सनियंत्रण करणे आणि राज्य शासनाने घालून दिलेल्या जिल्हा वार्षिक योजनेच्या मंजूर तरतूदींचे पुनर्विनियोजन करण्याची सूचना करणे.

(४) विकास योजनेच्या मंजूर मसुद्याची अध्यक्षांमार्फत राज्य शासनाकडे शिफारस करणे.

जिल्हा नियोजन समितीची उपरोक्त कामे लक्षात घेता जिल्हयातील पंचायतींनी म्हणजे ग्राम पंचायती , पंचायत समिती व जिल्हा परिषद आणि नगरपालिकांनी तयार केलेल्या योजनांचा विचार करुन संपूर्ण जिल्हयातील एकत्रित योजनेचा मसुदा तयार करावयाचा आहे. जिल्हा नियोजन समितीवर ८० टक्के सदस्य लोकसंख्येच्या प्रमाणात ग्रामीण व नागरी स्थानिक संस्थांच्या निर्वाचित सदस्यांमधून निवडून येणार आहेत. ते आपआपल्या संस्थेचे प्रतिनिधीत्व जिल्हा नियोजन समितीमध्ये करणार असून त्यांच्या मागण्या मांडणार आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने सर्वांच्या सहभागाने ( participative planning ) जिल्हा नियोजन होण्यास मदत होईल असा विश्वास वाटतो.

**महाराष्ट्र जिल्हा नियोजन समितीची निवडणूक:-**

जिल्हा नियोजन समितीवर निवडून द्यावयाच्या सदस्यांच्या निवडीसाठी राज्य शासनाने महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (निवडणूक) नियम १९९९ तयार करुन ते २० सप्टेंबर, १९९९ पासून अंमलात आणले आहेत. त्यामध्ये दिनांक ५/५/२०००, दि.९/४/२००७ व दिनांक ८/८/२००८ च्या अधिसुचनेन्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत.

...................

# महाराष्ट्र नियोजन योजना माहिती व्यवस्थापन प्रणाली (MPSIMS)

## Maharashtra Plan Scheme Information Management System (MPSIMS)

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने विकास हा केंद्रबिंदू मानून पंचवार्षिक योजना तयार करण्याबाबतचे धोरण निश्चित केले. यास अनुसरुन राज्यात पंचवार्षिक योजना व वार्षिक योजना तयार करणे व त्याचे संनियंत्रण करण्याची जबाबदारी नियोजन विभागाकडे सोपविण्यात आली. पंचवार्षिक योजनेच्या संनियंत्रणाच्या दृष्टीने केंद्र शासनाने अनुक्रमे कृषी व संलग्न सेवा, ग्रामविकास, विशेष क्षेत्र विकास, पाटबंधारे व पूरनियंत्रण, ऊर्जा , उद्योग व खाणकाम, वाहतुक, दळणवळण, विज्ञान व तंत्रज्ञान पर्यावरण, सामान्य आर्थिक सेवा, सामाजिक व सामूहिक सेवा, सामान्य सेवा आणि इतर कार्यक्रम असे एकूण १३ विकास क्षेत्र घोषित केले आहेत. प्रत्येक विकास क्षेत्रांतर्गत उपक्षेत्रनिहाय विविध विकासाच्या योजना तयार करुन राज्य शासनामार्फ़त दरवर्षी राबविण्यात येतात. प्रशासकीय सोयीसाठी ४७ विविध शासकीय विभागांमार्फ़त सदर योजनांतर्गत योजना राबविण्यात येतात. वार्षिक योजनेचे राज्यस्तरीय योजना व जिल्हास्तरीय योजना असे दोन भाग असून सर्वसाधारणपणे जिल्हा योजनांचे प्रमाण १५ ते २० टक्के इतके असते. योजनांतर्गत योजनांचे सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना, बिगर आदिवासी उपयोजना असे योजनेच्या प्रकारानुसार वर्गीकरण करण्यात आले आहे. पुढील वित्तीय वर्षासाठी राज्यातील उपलब्ध होणा-या साधन संपत्तीचा अंदाज लक्षात घेऊन प्रारुप वार्षिक योजना आराखडा नियोजन विभागामार्फ़त तयार करण्यात येऊन योजना आयोग, भारत सरकार यांच्याकडे मंजूरीसाठी सादर केला जातो. क्षेत्र, उपक्षेत्र, विभाग, योजनाप्रकार, योजनेचा स्रोत व योजनानिहाय नियोजन प्रक्रिया अतिशय क्लिष्ट असून याद्वारे राज्याच्या भौगोलिक स्थितीनुसार विकासाचा समतोल राखण्याची पण काळजी घ्यावी लागते. पूर्वी ही प्रक्रिया संगणकाचा वापर न करता करण्यात येत होती. याकरिता बरेच मनुष्यबळ व वेळ लागत होता. तसेच योजनांतर्गत नियतव्ययाची वित्त विभागाने विकसित केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि संनियंत्रण प्रणालीशी (BEAMS) सांगड घालणे शक्य होत नव्हते, ज्यामुळे खर्चाचा मेळ घालणेही अत्यंत जिकिरीचे होत होते.

वरील सर्व बाबींचा विचार करुन नियोजन प्रक्रीया जलद व पारदर्शी होण्याच्या दृष्टीने नियतव्यय वितरण, खर्च संनियंत्रण व वार्षिक योजना प्रकाशने यासाठी नियोजन विभागाच्या अधिपत्याखालील अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत "**महाराष्ट्र योजना माहिती व्यवस्थापन प्रणाली**" (Maharashtra Plan Schemes Information Management System - MPSIMS) ही संगणक आज्ञावली विकसित केली आहे. सन २००८-०९ अखेर संपूर्ण योजना प्रक्रियेचे संगणकीकरण रॅपीड प्रोटोटाईप मॉडेल या पद्धतीचा अवलंब करुन विकसित करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला. सुरुवातीच्या काळात म्हणजे योजना वर्ष २००९-१० मध्ये पारंपारिक पध्दत बंद करुन त्याऐवजी MPSIMS या आज्ञावलीद्वारे योजना पुस्तिका तयार करण्याचे सिमित उद्दीष्ट ठेवण्यात आले होते याकरिता आवश्यक ते महत्वाचे मोड्युल्स विकसित करुन योजना आयोग, भारत सरकार यांनी विहित केलेल्या नमुन्यात संपूर्ण योजना पुस्तिका इंग्रजी व मराठी भाषेत SAS प्रणालीचा वापर करुन छापण्यात आली.

MPSIMS ही आज्ञावली वेबबेस्ड (http://mahades.maharashtra.gov.in/MPSIMS ( स्वरुपाची असून यात शासनाचे विविध विभाग व जिल्हास्तरीय यंत्रणांद्वारे ऑनलाईन पद्धतीने योजनांसंबंधीची माहिती नोंदणी करण्यात येते. ही वेब आधारीत आज्ञावली वरील संकेतस्थळाद्वारे जनतेसाठीही उपलब्ध करण्यात आली आहे. ही आज्ञावली विकसित करण्यात नियोजन विभाग व अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील संगणक प्रशिक्षित अधिकारी /कर्मचारी यांचा सक्रिय सहभाग आहे. संपूर्ण नियोजन प्रक्रियेवर सविस्तर विचार विनिमय करुन योजनेची रुपरेषा, विभागाकडून नियतव्ययाची मागणी नोंदविणे, योजनेच्या प्रकारनिहाय नियतव्ययाचे वितरण, केंद्र पुरस्कृत योजनांचा नियतव्यय, भौतिक उद्दीष्टे इ. माहिती ऑनलाईन पद्धतीने प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतंत्र मोड्युल्स विकसित करण्यात आले. अशा त-हेने संपूर्ण योजना प्रक्रिया संगणकीकृत करण्यात आली. पूर्वीच्या काळात नियोजन पुस्तिका तयार करण्यात सर्व विभागांच्या अर्थसंकल्प शाख़ेच्या अधिकारी /कर्मचारी यांना शासकीय मुद्रणालयात हजर रहावे लागत होते व तेथे प्रुफ़ रिडींग करावे लागत होते. MPSIMS आज्ञावलीतून SAS या अत्याधुनिक प्रणालीद्वारे संपूर्ण योजना पुस्तिका PDF स्वरुपात तयार करण्यात येऊन थेट शासकीय मुद्रणालयात सॉफ़्ट कॅापी देण्यात येते त्यामुळे प्रुफ़ रिडींग वगैरे काहीच प्रक्रिया करावी लागत नाही. अशाप्रकारे बिझनेस प्रोसेस रिईंजिनिरींग साध्य झाले आहे.

MPSIMS आज्ञावलीमुळे निर्णय प्रक्रिया तसेच राज्य व जिल्हास्तरीय योजनांचे संनियंत्रणासाठी अतिशय सुलभ अशी यंत्रणा राज्यात अस्तित्वात आली आहे. या आज्ञावलीची थेट पद्धतीने वित्त विभागाच्या BEAMS आज्ञावलीशी जोडणी करण्यात आली असून राज्याच्या सर्व योजनांतर्गत योजनांवरील खर्चाचे दैनंदिन स्तरावर अतिशय सोप्या पद्धतीने नियंत्रण करणे वरिष्ठ पातऴीवरील अधिकारी यांना सुकर झाले आहे.

मंत्रीमंडळाच्या बैठकीपूर्वी आदल्या दिवशीच्या खर्चाच्या माहितीवर आधारित अहवाल उच्चस्तरीय अधिका-यांना ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध होतो. पंचवार्षिक योजना व वार्षिक योजना तयार करण्यासाठी नियतव्यय मागणीबाबतच्या विभागनिहाय बैठकांकरिता MPSIMS आज्ञावलीद्वारे ऑनलाईन पद्धतीने तयार करण्यात येतात व प्राप्त अहवालावर विभागनिहाय बैठका घेऊन योजना आराखड्याचे प्रारुप अंतिम केले जाते हे या आज्ञावलीचे मोठे यश आहे. या आज्ञावलीद्वारे सर्व विभागांच्या अर्थसंकल्प शाखेतील अधिकारी /कर्मचारीवृंदाचे काम सुलभ झाले असून विविध प्रकारचे अहवाल ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध होत असल्याने अगदी बैठकीच्या वेळेपर्यंतच्या खर्चाची आकडेवारी प्राप्त होते.

केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या निधीवर नियंत्रण ठेवणे यापूर्वी फ़ार अडचणीचे होते त्यामुळे बराचसा निधी अखर्चित रहात होता. MPSIMS आज्ञावलीतील या सुविधेमुळे सर्व विभागांना केंद्राकडून प्राप्त होणा-या निधीवर संनियंत्रण ठेवण्याची सुविधा प्राप्त झाली असून याचा वापर शासनात उच्च स्तरावर होणा-या मासिक खर्चाच्या आढावा बैठकीदरम्यान होत असल्याने आपोआपच सदर निधीबाबत जागरुकता निर्माण झाली आहे.

MPSIMS आज्ञावलीद्वारे भौतिक साध्याचे प्रमाणीकरण करण्यात येऊन यावर संनियंत्रण ठेवणे अतिशय सुलभ झाले असून योजनांतर्गत योजनांद्वारे राज्यात निर्माण होणा-या भौतिक मत्तेबाबत एकत्रित आकडेवारी प्राप्त होते, ही या प्रकल्पाची एक महत्वाची फ़लनिष्पत्ती आहे.

.................

# अर्थसंकल्पीय अंदाज नियतवाटप व्यवस्थापन पध्दती

( Budget Estimation Allocation Management Systems - BEAMS )

शासन निर्णय क्र.:-संकीर्ण-१००६/प्र.क्र.१३१/कोषा प्रशासन ५ दि.१५ मे, २००७.

पुर्वीच्या पध्दतीनुसार आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना देयक सादर करण्यापूर्वी निधी मंजूरीचे आदेश प्रत्यक्ष प्राप्त करुन घ्यावे लागत. हे आदेश मिळण्यास बराच कालावधी लागतो व त्यामुळे विहीत वेळेत देयक सादर करता येत नव्हते. परिणामी, योजनेसाठी तातडीणे खर्च करण्यास अडचणी निर्माण होवून अर्थसंकल्पीय तरतूदींच्या आहरण व संवितरण अधिकारी निहाय वितरणाचे तपशील एकत्रितरीत्या उपलब्ध होत नसल्याने हे अधिकारी तरतूदींच्या/मासिक निधी विवरणपत्राच्या (Monthly Cash Flow Statement) मर्यादेत खर्च करीत आहेत किंवा कसे याची पडताळणी करणे शक्य होत नव्हते. हे लक्षात घेता सर्व विभागांमध्ये आर्थिक शिस्त व सुयोग्य नियंत्रण येण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र, पूणे यांच्या सहकार्याने वित्त विभागाने “संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणाली” विकसीत केली आहे. या प्रणालीचा मुख्य उद्देश शासनाच्या विविध विभागातील आहरण व संवितरण अधिकारीनिहाय अर्थसंल्पीय अनुदानाच्या तरतूदी इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून सर्व कोषागार अधिकारी/अधिदान व लेखाअधिकारी व इतरांना उपलब्ध व्हाव्यात तसेच आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना अर्थसंल्पीय अनुदानातून देयकांव्दारे रकमा आहरित करणे सुलभ व्हावे हा आहे.

बीम्स प्रणालीवर नियंत्रक अधिकाऱ्यांना निधीचे पुनर्विनियोजन निधीच्या मर्यादेत Online करता येते. या प्रणालीमध्ये काही प्रमाणात Cash-Flow सुधारीत करता येतो. या प्रणालीवर MIS विभागामध्ये निधीच्या संदर्भात खर्चाचे योजनानिहाय, CRC निहाय रिपोर्टस उपलब्ध होतात.

बीम्स मध्ये login केल्यानंतर D.D.O. Code व Password टाकल्यानंतर Submission केल्यावर उद्दिष्ट निहाय उपलब्ध अनुदान दिसते. त्यानुसार त्या उद्दिष्टांवर Click केल्यावर Bill Entry Form उपलब्ध होतो. त्यावर Bill Type Select केल्यानंतर त्यावरील माहिती भरुन व D.D.O. Select करुन Add करुन Submit केल्यावर Approved Draft येतो. त्यावर Approved Click केल्यावर B.D.S. चे प्राधिकार पत्र तयार होते. व त्यामध्येच Object साठी उपलब्ध अनुदानातून बिलाची रक्कम वजा होते व ते देयक कोषागारात सादर केले जाते.

..................

# राष्ट्रीय मानवी हक्क आयोग

मानवी हक्कांचे अधिक चांगल्या रीतीने संरक्षण करण्यासाठी राष्ट्रीय मानवी हक्क आयोग आणि राज्यांमध्ये राज्य मानवी हक्क आयोग व मानवी हक्क न्यायालये गठीत करण्याकरीता आणि त्यांच्याशी संबंधित/अनुषंगिक बाबींकरीता मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३ केंद्र शासनाने पारीत केला. सदर अधिनियम २८ सप्टेंबर १९९३ पासून अंमलात आला. सदर अधिनियमातील कलम ३ नुसार केंद्र शासन राष्ट्रीय मानवी हक्क आयोग गठीत करते. आयोगाचे मुख्यालय दिल्ली येथे असून आयोग केंद्र सरकारची पूर्व परवानगी घेवून भारतामध्ये कोणत्याही ठिकाणी कार्यालये स्थापन करू शकतो. मानवी हक्क म्हणजे व्यक्तीस जन्मापासून प्राप्त झालेले हक्क यामध्ये संविधानाद्वारे हमी दिलेले किंवा आंतरराष्ट्रीय प्रसंविदेमध्ये समाविष्ट केलेले व्यक्तीचे जीवन, स्वांतत्र्य, समानता व प्रतिष्ठा या संबंधातील हक्क होय.

राष्ट्रपती हे आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य यांची नियुक्ती पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशीनुसार करतात. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांशी विचारविनिमय केल्याखेरीज, सर्वोच्च न्यायालयाच्या विद्यमान किंवा उच्च न्यायलयाच्या विद्यमान मुख्य न्यायाधीशांची नियुक्ती आयोगाच्या सदस्यपदी करता येत नाही. आयोगाच्या अध्यक्ष आणि सदस्यांची नियुक्ती ही, केवळ समितीमध्ये कोणतेही पद रिक्त झाल्याच्या कारणावरुन अवैध ठरत नाही.

**आयोगाची रचना :-**

अ)सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश :- अध्यक्ष.

आ)सर्वोच न्यायालयामध्ये कार्यरत असलेले न्यायाधीश अथवा माजी न्यायाधीश:- सदस्य.

इ)उच्च न्यायालयाचे माजी अथवा कार्यरत मुख्य न्यायाधीश :- सदस्य.

ई)मानवी हक्कासंबंधातील बाबींची माहिती असलेला किंवा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या व्यक्तीमधून नियुक्त दोन व्यक्तीं :- सदस्य.

राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग व अनुसूचित जमाती आयोग, राष्ट्रीय महिला आयोग या आयोगांचे अध्यक्ष हे, अधिनियमाच्या कलम १२ च्या खंड ( ख ) ते ( त्र) मध्ये नमूद केलेली कामे पार पाडण्यासाठी आयोगाचे सदस्य असल्याचे मानण्यात येते.

आयोगाचा महासचिव हा त्या आयोगाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असतो.

आयोगाच्या अध्यक्ष पदी नियुक्त झालेली व्यक्ती, ती ज्या दिनांकास आपले पद ग्रहण करील तेव्हापासून पाच वर्षाच्या कालावधीपर्यंत किंवा ती व्यक्ती सत्तर वर्षे वयाची होईपर्यंत पद धारण करते.

**आयोगाची कामे:-** अधिनियमातील कलम १२ नुसार राष्ट्रीय मानवी हक्क आयोगास पुढील कार्ये पार पाडावी लागतात.

क) खालील तक्रारीमध्ये स्वत:हून, किंवा बळी ठरलेल्या व्यक्तीने किंवा तिच्या वतीने इतर कोणत्याही व्यक्तीने विनंती अर्ज केल्यावरुन चौकशी करील:-

१) मानवी हक्कांचा भंग किंवा त्यास प्रोत्साहन, किंवा अशा हक्कभंगास प्रतिबंध करण्यास लोक सेवकाकडून झालेला निष्काळजीपणा.

ख) मानवी हक्काचा भंग झाल्याचा आरोप असलेल्या व कोणत्याही न्यायलयात प्रलंबित असलेल्या कार्यवाहीत त्या न्यायालयाच्या संमतीने हस्तक्षेप करील,

ग) राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या ज्या कोणत्याही तुरुगांत किंवा अन्य एखादया संस्थेत उपचाराच्या, सुधारण्याच्या किंवा सुरक्षिततेच्या प्रयोजनार्थ व्यक्तीस स्थानबध्द केलेले किंवा ठेवून घेण्यात आलेले असेल त्या तुरुंगाला वा संस्थेला त्या निवासी व्यक्तीच्या जीवन परिस्थितीचा अभ्यास करुन त्यावर शिफारशी देण्यासाठी, राज्य शासनास सूचना देवून भेट देईल.

घ) संविधानाव्दारे किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये मानवी हक्काचे संरक्षण करण्यासाठी पुरवण्यात आलेल्या संरक्षण उपायांचा आढावा घेणे/अंमलबजावणीसाठी शिफारशी करील.

ङ) मानवी हक्काच्या वापरात विघ्न आणणाऱ्या घटकांचे पुनर्विलोकन करुन त्यावर उचित उपाययोजनांची शिफारस करणे.

च) मानवी हक्कांबाबतचे तह व इतर आंतरराष्ट्रीय संलेख यांचा अभ्यास करुन त्यांचा त्यांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी शिफारस करणे.

छ) मानवी हक्कांच्या क्षेत्रात संशोधन कार्य हाती घेऊन त्यास चालना देणे.

ज) समाजाच्या विविध वर्गात मानवी हक्कांबाबत जाण निर्माण करणे.

झ) मानवी हक्कांच्या क्षेत्रांतील प्रयत्नांना उत्तेजन देणे.

ञ) मानवी हक्कांच्या प्रचलनासाठी आवश्यक वाटतील अशी इतर कार्ये करणे.

आयोगास या अधिनियमाखालील तक्रारीची चौकशी करताना दिवाणी न्यायालयाप्रमाणे अधिकार आहेत.

...............

# राज्य मानवी हक्क आयोग

मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ च्या कलम २१ नुसार राज्यात "राज्य मानवी हक्क आयोग" स्थापन करण्यात येतो. राष्ट्रीय मानवी हक्क आयोग आणि केंद्र सरकार यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र राज्यात शासन निर्णय क्र.:-एचआसी१०९९/३७८/पोल-१४,दि.१५/०१/२००० अन्वये महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना दिनांक ६ मार्च, २००१ रोजी केली असून ती स्वायत्त वैधानिक यंत्रणा आहे.

राज्य मानवी हक्क आयोगावर पुर्वी १ अध्यक्ष व ४ सदस्य नेमले जात होते. तथापि, केंद्र शासनाने मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ च्या कलम २१ मध्ये दुरुस्ती करुन राज्य आयोगाची रचना १ अध्यक्ष व २ सदस्य अशी विहित केली आहे. सदर दुरुस्ती राज्य शासनानेही दि. ६ जुलै, २००९ च्या अधिसूचनेद्वारे राज्य मानवी हक्क आयोगास लागू केली आहे. त्यानुसार आता राज्य मानवी हक्क आयोगाची रचना एक अध्यक्ष व दोन सदस्य अशी निश्चित करण्यात आली आहे. आयोगाचे एक सदस्य हे न्यायिक संवर्गातील तर दुसरे पद मानवी हक्क आयोग या विषयाचे तज्ञ असलेले किंवा प्रत्यक्ष कार्यानुभव असलेले असावेत अशी तरतूद आहे.

**राज्य मानवी हक्क आयोगाची कार्ये** :- (कलम १२)

(१) भारतीय घटना आणि समाजातील सर्व घटकांच्या मानवी हक्कांचे संरक्षण वृध्दिंगत करण्यासाठी असलेले कायदे तसेच संरक्षक उपाययोजना या सर्व बाबी अभ्यासणे, तपासणे आणि पुनर्विलोकन करुन परिणामकारक अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शिफारशी करणे.

(२) मानवी हक्क जोपासणे आणि वृध्दिंगत करणे याबाबत अस्तित्वात असलेल्या घटनात्मक व वैधानिक तरतूदींचा अभ्यास करणे, पुनर्विलोकन करणे आणि त्यासंबंधात उणिवा, अपुरेपणा, वैगुण्ये असल्यास विधिविधानात तसा बदल सुचवून त्यावर मात करणे.

(३) समाजातील सर्व घटकांच्या मानवी हक्कांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी, कायदयाच्या चौकटीला, साचाला अधिक बळकटी आणणे आयोगाला आवश्यक वाटेल तेव्हा नवीन कायदयाची विधिनियमितीची शिफारस करणे.

(४) मानवी हक्क संरक्षणाबाबत करण्यात आलेले कायदे व मानवी हक्कांच्या पायमल्लीला अटकाव करण्यासाठी करण्यात आलेले कायदे तसेच नागरिकांच्या मानवी हक्कांसंबंधी घेण्यात आलेले धोरणात्मक निर्णय, मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी होत नसल्याबाबत किंवा मानवी हक्कांपासून वंचित केल्याबद्दल तक्रार प्राप्त झाल्यास किंवा स्वत:हून या सर्व प्रकरणांची दखल घेणे.

(५) नागरी आणि राजकीय हक्कांच्या पायमल्लीच्या तक्रारी, पायमल्लीस प्रोत्साहन देण्याबाबत किंवा नागरी आणि राजकिय हक्कांबाबतची कर्तव्ये पार पाडताना दुर्लक्ष करणे, या सर्व बाबतीत स्वत:हून किंवा त्या व्यक्तीच्या वतीन प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी करणे.

(६) आयोगाच्या मतानुसार अतिसंवेदनक्षम व मानवी हक्कांच्या पायमल्लीस प्रवण असलेले विशिष्ट ठिकाण व परिस्थितीचे विशेष अध्ययन करणे व तपास हाती घेणे व त्याबाबतचा अहवाल तयार करणे व संबंधित प्राधिकरणाकडे शिफारशी पाठविणे.

(७) मानवी हक्कासाठी आदर वाढविणे तसेच समाजातील सर्व घटकांमध्ये व प्रशासकीय यंत्रणेतील सर्व स्तरांवर सन्मान वाढविणे. यासाठी मानवी हक्काच्या साक्षरतेचा प्रचार करणे व त्याअनुषंगिक देशातील मानवी हक्काबाबतच्या स्थितीची जाणीव करुन देण्याकरिता प्रोत्साहनात्मक व शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करणे.

(८) प्रशासकीय वर्ग आणि जनता यांच्यासाठी प्रशिक्षण व दिशादर्शक कार्यक्रम आयोजित करणे.

(९) मानवी हक्कांचे उल्लंघनास प्रतिबंध करण्यासंदर्भात फौजदारी प्रशासन प्रणाली व कारागृह सुधारणा, इत्यादीबाबत अभ्यास करुन शिफारशी करणे.

(१०) आंतरराष्ट्रीय करार, प्रसविदा आणि मानवी हक्कांशी संबंधित अभ्यास करुन समाजातील सर्व घटकामध्ये आणि प्रशासनात आवश्यक तो समंजसपणा वाढेल अशा शिफारशी करणे.

(११) आंतरराष्ट्रीय संबंधित साधने किंवा घोषणा किंवा प्रसंविदांच्या तरतूदीचे पालन करण्याकरिता देशातील मानवी हक्कांच्या परिस्थितीची जाणीव करुन देऊन सामंजस्य वाढविण्यासाठी शासनाला सल्ला देणे व उपाययोजना सुचविणे.

(१२) आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय मानवी हक्क संघटनांशी संपर्क साधण्यासाठी माध्यमे स्थापन करणे.

(१३) मानवी हक्कांशी संबंधित संशोधन व कार्यक्रम हाती घेणे किंवा प्रायोजित करणे.

(१४) मानवी हक्काच्या अविभाज्य स्वरुपात जोपासना व संरक्षण करण्यासाठी कायदयानुसार आवश्यक असलेली कर्तव्ये पार पाडणे व इतर कार्यवाही करणे.

.................

# शासकीय विधेयके व नियम यांचे मसुदा लेखन

शासकीय विधेयकांचे मसुदा लेखन करत असताना पुढील बाबी प्राथम्याने लक्षात घेणे आवश्यक आहे.

विधेयकाचे संक्षिप्त नाव :- विधेयकाची उद्दीष्टे लक्षात घेऊन त्याचे संक्षिप्त नाव देण्यात यावे. तसेच प्रस्तावित विधेयक राज्याच्या कोणत्याही एका भागास किंवा संपूर्ण राज्यभर लागू असेल ती व्याप्ती नमूद करण्यात यावी. प्रस्तावित विधेयक कधीपासून अंमलात येईल याबाबतची तारीख नमूद करण्यात यावी. विधेयकाच्या तरतुदी वेगवेगळ्या दिनांकास अंमलात आणावयाच्या असल्यास त्याबाबतची स्पष्ट तरतूद विधेयकामध्ये असणे आवश्यक आहे. विधेयकाच्या सर्व किंवा काही तरतूदी भूतलक्षी (Retrospective) प्रभावाने अंमलात आणावयाच्या असल्यास त्यासंदर्भात स्पष्ट उल्लेख असणे भाग आहे. मात्र अशा तरतुदींना भूतलक्षी प्रभाव देत असताना , असा प्रभाव दिला गेल्यामुळे कोणतेही vested rights यांना बाधा पोचणार नाही अशी खबरदारी घेणे आवश्यक आहे. तसेच संविधानाच्या अनुच्छेद २० मध्ये तरतूद केल्याप्रमाणे ज्या दिनांकास अशी कृती हा त्या दिवशी विद्यमान असलेल्या कायद्यानुसार गुन्हा नसेल तर अशी भूतलक्षी तरतूद केल्याच्या परिणामी गुन्हा असणार नाही अशीही तरतूद असणे आवश्यक आहे.

व्याख्या.- विधेयकामध्ये पुन्हा पुन्हा वापरल्या गेलेल्या शब्दप्रयोगांची पुनरुक्ती टाळण्याच्या दृष्टीने व्याख्या देण्यात येतात.

विधेयकाच्या सर्वसाधारण तरतुदी.- यामध्ये विधेयक अधिनियम अंमलात आणत असताना केल्या जाणा-या तरतुदींच्यासाठी सहाय्यकारी प्रशासकीय यंत्रणा, अशा यंत्रणेचे घटन, तिचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये, या प्रशासकीय यंत्रणेसाठी येणा-या खर्चविषयक तरतुदी ज्यायोगे राज्याच्या एकत्रीकृत निधिवर भार येणार असल्यास अशा भाराचा तपशील, अधिनियमातर्गत नियम करणे, आदेश काढणे इ. अधिकार याबाबत तरतुदी.

निरसन व व्यावृत्ती.- विधेयकाद्वारे यापूर्वीचा अधिनियम निरसित करावयाचा असल्यास त्याबाबतच्या तरतुदी, संक्रमणकालीन तरतुदी इ.

...............

# अशासकीय विधेयकांबाबतची कार्यपध्दती

महाराष्ट्र विधान परिषद नियम १०७ ते १५४, महाराष्ट्र विधान सभा नियम यामधील नियम १११ ते १५९.

विषयाची मुद्देसूद माहिती.- जेव्हा राज्य विधानमंडळाचा अशासकीय सदस्य विधेयकाची नोटीस देतात त्यावेळी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय अशा विधेयकाची एक प्रत संसदीय कार्य विभागाला पाठविते. संसदीय कार्य विभाग त्यानंतर अशा विधेयकाची व उद्देश व कारणे याच्या प्रतीसह एक प्रत मा. मुख्यमंत्री यांना सादर करतो. तसेच अशी एक प्रत ज्या विभागाशी हे विधेयक संबंधित आहे त्या विभागाकडे सुद्धा पाठवतो.

महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीचा अनुदेश ३७ ते ४०:-

३७. (१) जेव्हा विधान मंडळाचे सदस्य अशासकीय विधेयक मांडण्यासाठी नोटीस देतात, अशा वेळी विधानमंडळाचे सचिव विधेयकाची प्रत, विधि व न्याय विभागाकडे पाठवितात. त्यानंतर विधि व न्याय विभाग सदर विधेयकाची प्रत, उद्देश व कारणे नमुद करून मुख्यमंत्री व संबंधित विभागाकडे ताबडतोब पाठवितात.

(२) अशा अशासकीय विधेयकावर विधि व न्याय विभाग कार्यवाही करील. या बाबत राज्य विधिमंडळाची क्षमता व राष्ट्रपतींची मंजुरी आवश्यक आहे काय? या बाबी तपासून प्रकरण ज्या विभागाशी संबंधित आहे, त्या विभागाच्या अभिप्रार्याथ सादर करण्यात येईल.

(३) विधेयक संबंधित विभागाने तपासल्यानंतर विविध विभागांशी संबंधित असल्यास त्यांचे अभिप्राय घेवून विधेयकाची प्रत मंत्री व राज्यपाल यांच्याकडे फिरविण्यात यावी.

(४) वित्त विषयक बाब असल्यास प्रकरण वित्त विभागास दाखवून विधेयकाच्या बाबतीत वित्तीय विवरणपत्र तयार करण्यात येईल.

३८. धनविधेयकाच्या बाबतीत (विनियोजन अधिनियम, विनियोजन लेखानुदान अधिनियम इत्यादी) विधेयक वित्त मंत्री यांना सादर करणेत यावे. अन्य विधेयकाबाबत प्रकरण संबंधित विभागाच्या सचिवांमार्फत वित्त विभागाकडे व त्यानंतर वित्त मंत्र्यांकडे सादर करण्यात यावे.

३९. विधेयाकामध्ये विधानमंडळाच्या सदस्यांनी सुधारणा करण्यासाठी नोटीस दिली असल्यास विधेयकाच्या विचार विनीयम करण्याच्या वेळी विचारात घेण्यात याव्यात.

४०. विधेयकाचा मसुदा सादर करतांना विधेयक कोणत्या तरतूदीवर आधारीत आहे, याबाबत समासामध्ये तरतूदी नमूद कराव्यात परंतू राज्यपाल व राष्ट्रपती यांच्या मंजूरीसाठी विधेयक पाठवितांना समासातील संदर्भ काढून टाकण्यात यावे.

**विधेयकास विधिमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर त्यावर करावयाची कार्यवाही याबाबत तरतूद अनुदेश क्रमांक ४१ मध्ये देण्यात आली आहे.**

४१. विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी विधेयकास मान्यता दिल्या नंतर विधानमंडळ सचिवालयाकडून विधेयकाची अधिकृत प्रत विधि व न्याय विभाग व संबंधित विभाग यांच्याकडे तपासण्यासाठी पाठविण्यात येते. विधेयकास राज्यपालांची व प्रकरणपरत्वे राष्ट्रपतींची मान्यता घेण्यासाठी राज्यपाल यांच्याकडे सादर करण्यात येते . राज्यपाल यांच्या मंजूरीसाठी पाठविण्यात आलेल्या विधेयकात राज्यपालांनी काही सुधारणा/संदेश किंवा अनुदेश दिले असतील तर राज्यपाल

यांचे सचिव, विधि व न्याय विभागचे सचिव आणि इतर विभागाचे सचिव यांच्याशी विचार विनिमय करुन पुढील कार्यवाही करतील.

विधी व न्याय विभागात असे अशासकीय विधेयक तांत्रिकदृष्ट्या तपासले जाते जसे की, विधेयकाला भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०४ च्या खंड (ख) च्या परंतुकानुसार मा. राष्ट्रपतींची पूर्वमंजूरी आवश्यक आहे किंवा कसे? या विधेयकासंदर्भात, संविधानाच्या अनुच्छेद २०७ (१) किंवा (३) यानुसार मा. राज्यपालांची शिफारस आहे किंवा कसे? असे विधेयक पारित करण्याबाबत राज्य विधानमंडळ संविधानातील तरतुदींसार सक्षम आहे किंवा कसे? असे विधेयक राज्य विधानमंडळाने संमत केल्यास त्यास मा. राज्यपालांची अनुमती आवश्यक राहील किंवा मा. राष्ट्रपतींची अनुमती आवश्यक राहील या बाबतचे अभिप्राय संबंधित प्रशासकीय विभागाला कळविण्यात येतात.

महाराष्ट्र विधानमंडळाची अशासकीय विधेयकांबाबतची समिती अशा विधेयकाच्या बॅलटद्वारा प्राथम्यक्रम ठरवून ते विधेयक कोणत्या दिवशी चर्चेस येईल हे ठरविते तसेच त्याबाबत कालावधी नेमून देते. अशा वेळी, विधेयक चर्चेला आल्यानंतर संबंधित विभागांचे मंत्री अशा विधेयकासंदर्भात शासनाची भूमिका सभागृहासमोर मांडतात व ते अशासकीय विधेयक संमत होते किंवा यथास्थिति, फेटाळले जाते. सभागृहात मांडण्यात आलेल्या विधेयकाचा प्रस्ताव शासनास तत्वतः मान्य असल्यास, ते विधेयक मागे घेण्याची विनंती संबंधित मंत्री संबंधित सभासदास करतात. संबंधित विधेयक दोन्ही सभागृहात संमत झाल्यास त्यासंदर्भात पुढील कार्यवाही विधि व न्याय विभागामार्फत, शासकीय विधेयकासंदर्भातील कार्यवाहीप्रमाणे करण्यात येते.

..................

## अधिनियम व नियमात सुधारणा करण्यासंबंधी कार्यपद्धती

महाराष्ट्र शासन कार्यनियमावली अनुदेश क्रमांक ३१ ते ४४.

ज्यावेळी अधिनियमात सुधारणा करण्याचा प्रस्ताव असेल अशा वेळी , अधिनियमाशी संबंधित प्रशासकीय विभाग त्याबाबतचा प्रस्ताव तयार करुन तो प्रस्ताव विधि व न्याय विभागाकडे अशा प्रस्तावाची कायदेशीर तपासणी करण्याकरिता पाठवितो. या तपासणी वेळी विधि व न्याय विभाग या प्रस्तावाची कायदेशीर तपासणी, तसेच अशा स्वरुपाचा अधिनियम करण्याकरिता राज्य विधानमंडळ सक्षम आहे का? अशा विधेयकास मा. राष्ट्रपतींच्या पूर्वमंजुरीची आवश्यकता आहे का? या प्रस्तावाच्या तरतूदी मूलभूत अधिकारांवर अतिक्रमण करणा-या आहेत किंवा कसे? याबाबतचे वैधानिक मत देतो. त्यानंतर प्रशासकीय विभाग सर्व संबंधित प्रशासकीय विभागांशी विचारविनिमय करून त्यासंदर्भातील प्रस्तावास मंत्रिमंडळाची मान्यता घेतो. त्यानंतर असा प्रस्तावास विधि व न्याय विभागामार्फत वैधानिक रुप दिले जाते. त्यास विधेयक असे म्हणतात. विधेयकास त्याचे उद्देश व कारणे सांगणारे निवेदन जोडले जाते. व विधेयकास आवश्यक ते वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन तसेच वित्तीय विवरणपत्र जोडले जाते. व विधेयक विधानमंडळात सादर केले जाते. विधेयकास दोन्ही सभागृहानी मान्यता दिल्यानंतर ते राज्यपाल/ राष्ट्रपती यांना सादर केले जाते व त्यानंतर ते अधिनियम म्हणून राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येते.

नियमात सुधारणा करण्याचा प्रस्ताव असल्यास त्यासंबंधी एक प्रारुप प्रशासकीय विभागामार्फत करण्यात येते. त्याची विधि व न्याय विभाग़ामार्फत तपासणी करण्यात येते. या तपासणी वेळी प्रस्तावित तरतुदी या अधिनियमातील तरतुदींशी विसंगत नाही ना किंवा कसे याची विशेषकरुन तपासणी होते.त्यानंतर विभागामार्फत संबंधित मंत्री यांची मान्यता घेऊन ते राजपत्रात प्रसिद्ध केले जातात. अधिनियमात नियमांच्या पूर्वप्रसिद्धिची अट असल्यास त्यासंबंधी एक प्रारंभिक मसुदा वरील प्रमाणे राजपत्रात प्रसिद्ध केला जातो. यावरील हरकती व सूचना विचारात घेऊन वरीलप्रमाणे कार्यपद्धतीचे पालन करून ते नियम अंतिम करण्यात येतात. व ते राज्य विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्याकरिता प्रशासकीय विभागामार्फत सादर करण्यात येतात.

.................